# 'मी'

('मी' कादंबरीचा सविस्तर रसास्वाद)

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३५८

मति विकास माला

REFBK-0005233

प्रो. गो. वि. तुळपुळे, एम्. ए.

किंमत १ रु.

दा. म
४२३३

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नि. नं. ८२८
ता.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ४१८८
ठाणे.

मति-विकास-माला

# हरिभाऊंचा "मी"

('मी' कादंबरीचा सविस्तर रसास्वाद)



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 5233

REFBK-0005233

लेखक-प्रो. गोपाळ विष्णु तुळपुळे, एम्. ए.,
नौरोसजी वॉडिआ कॉलेज, पुणें.

१९३९

किंमत १ रुपया.

# प्रस्तावना.

श्री. वाग्भट नारायण देशपांडे ह्यांनीं हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचा विशेष अभ्यास करून " आठवणी व कादंबऱ्या " हें सुंदर पुस्तक लिहिलें. त्यांतच त्यांनीं " 'मी' कादंबरीवर चार विचार " ह्या आपल्या व्याख्यानाचा समावेश केला आहे. त्याचप्रमाणें कु. वेणुताई पानसे ह्यांनीं लिहिलेल्या हरिभाऊंच्या विस्तृत चरित्रांत 'मी' कादंबरीवर जागोजागीं मार्मिक विचार प्रदर्शित केले आहेत. असें असतांना पुन्हां ह्या 'सविस्तर रसास्वादा'चें प्रयोजन काय, असा प्रश्न येण्याचा संभव आहे. त्याला एक उत्तर असें देतां येईल कीं, उत्कृष्ट अभिजात ग्रंथांचें विवेचन अनेकदां झालें, तरी तें फायदेशीरच असतें. एक तर त्याच्या योगानें त्या ग्रंथांची स्मृति कायम राहते, व ते ग्रंथ पुन्हा वाचण्याची किंवा अभ्यासण्याची इच्छा उत्पन्न होते. शिवाय विवेचकांचे दृष्टिकोन भिन्न असल्यामुळें वाचकही त्या ग्रंथांकडे निरनिराळ्या दृष्टीनें पहाण्यास शिकतो. शेक्सपिअर, मिल्टन, टेनिसन, स्कॉट, डिकन्स वगैरे प्रख्यात ग्रंथकारांच्या टीकात्मक ग्रंथांवर दरवर्षी किती तरी प्रबंध प्रसिद्ध होत आहेत. वास्तविक आपल्याकडेही विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, टिळक, रानडे, वैद्य, कोल्हटकर वगैरे प्रसिद्ध लेखकांच्या ग्रंथांवर असे टीकात्मक ग्रंथ किती तरी व्हावयास पाहिजेत. अशा विवेचक ग्रंथांचीही मूळ उत्कृष्ट ग्रंथांप्रमाणें वाङ्मयवृद्धीला मदत होते. अशा प्रकारच्या सर्वच ग्रंथांत नवीन नवीन विचार येतात असें नाहीं. तथापि विचार तेच असले, तरी त्यांची मांडणी निराळी असते.

'मी' कादंबरी हरिभाऊंच्या उत्कृष्ट कादंबऱ्यांपैकीं एक आहे. ललितवाङ्मयाचे प्रमुख गुण तर तिच्यांत आहेतच, परंतु त्यांबरोबरच देशहित व समाजसुधारणा यांविषयींच्या उदात्त विचारांनीं ती ओतप्रोत भरली आहे, ही कादंबरी लिहून जरी आज अडतीस वर्षे होऊन गेलीं व ह्या काळांत सामाजिक व राजकीय प्रगतीच्या दृष्टीनें आपलें पाऊल बरेंच पुढें पडलें आहे, तरीसुद्धां तिच्यांत निदर्शित झालेले विचार आजच्या तरुणांनाही मननीय व

मार्गदर्शक होतील यांत शंका नाहीं. यास्तव अशा अभिजात कादंबरीचें पुनः पुनः विवेचन झालें तरी तें नीरस होण्याची भीति नाहीं.

प्रस्तुत पुस्तकांत ह्या कादंबरीचें निरीक्षण विशेष विस्तारानें केलें आहे. तें विद्यार्थिवर्गास मार्गदर्शक होईल अशी आशा आहे. शिवाय वाङ्मयाच्या अभ्यासाची दिशा माहीत नसलेल्या इतर वाचकांसही एखादी कादंबरी वाचतांना तिचा रसास्वाद कसा घ्यावा ह्याचें ज्ञान होऊन त्यांच्यांत मार्मिकता व रसिकता उत्पन्न होण्यास मदत होईल अशी आशा आहे.

पुणें, १२ फेब्रुवारी सन १९३५. } गोपाळ विष्णु तुळपुळे.

# अनुक्रमाणिका.


| भाग | विषय | पृष्ठांक. |
|---|---|---|
| १ | कथानक .... .... .... | १ |
| २ | कथानक-रचना .... .... .... | ८ |
| ३ | पात्रयोजना व स्वभावनिदर्शन .... .... | २३ |
| ४ | कादंबरीचे अंतर्गुण .... .... .... | ८२ |
| ५ | बाह्यस्वरूप .... .... .... | १०६ |
| ६ | कादंबरींतील विनोद .... .... .... | ११७ |
| ७ | समाज व शिकवण .... .... .... | १२३ |
| ८ | कांहीं इतर प्रश्न .... .... .... | १३६ |
| ९ | हरिभाऊंची योग्यता .... .... .... | १४२ |

# हरिभाऊंच्या "मी"

## भाग पहिला

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ७९८८
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

## कथानक.

नेहमींच्या पद्धतीला अनुसरून कथानक हा शब्द ह्या भागाला योजिला असला तरी 'मी' कादंबरीचें कथानक एखाद्या गोष्टीच्या स्वरूपाचें नाहीं. ही कादंबरी आत्मचरित्राच्या रूपानें लिहिली असल्यामुळें तिच्यांत कादंबरीचा नायक भावानंद यानें स्वतां आपलें चरित्र लिहिलें आहे असें दाखविलें आहे. आपल्या चरित्राशीं निगडित झालेली आपली बहीण ताई, गुरु शिवरामपंत, वडील, आई, आजी, मामा वगैरे मंडळींची माहिती व त्यांचा आपल्या चरित्रावर झालेला बरावाईट परिणाम त्यानें वर्णिला आहे. भावानंद मरणासन्न झाला असतांना त्यावेळची व त्याच्या मृत्यूनंतरची हकीकत त्याचा पट्ट शिष्य रामानंद यानें अगदीं थोडक्यांत सांगितली आहे. भावानंदाच्या चरित्राचा सारांश असा:—

भावानंदानें आपलें चरित्र आठव्या वर्षापासून सांगण्यास सुरुवात केली आहे. त्या पूर्वींचा बालपणींचा भाग त्याला आठवत नाहीं. तो सुमारें आठ वर्षांचा असतांना त्याच्या वडिलांचे मुंबईचे स्नेही नानासाहेब आपल्या नादी व विक्षिप्त स्नेह्याचें बिऱ्हाड थाटून देण्याच्या इच्छेनें भाऊची आई, आजी व स्वतां भाऊ यांना मुंबईस आणतात. ह्या वृत्तांतापासून चरित्रकथनाला आरंभ होतो. नानासाहेब मुंबईस

आपल्या घरीं येऊन शेजारींच राहणाऱ्या रावजींच्या—भाऊच्या वडिलांच्या—खोलीकडे पाहतात, तों त्यांना खोलीला कुलूप ठोकून रावजी बाहेर गेल्याचें आढळून येतें. स्वाभाविकपणेंच रावजींची मंडळी नानासाहेबांच्या घरीं चार दिवस राहून त्यांची वाट पाहतात. एक दिवस रावजींचा मारवाडी सावकार जप्ती आणून त्यांच्या खोलींतील सामान जप्त करून नेतो. कर्मधर्मसंयोगानें त्याच वेळीं शिवरामपंत नांवाच्या एका सुशील सद्गृहस्थाचें कुटुंब ह्या रिकाम्या झालेल्या खोलींत रहावयास येतें. बालस्वभावानुसार भाऊ तेथें जातो, तेव्हां त्या ठिकाणीं शिवरामपंतांची दोन अडीच वर्षांची लहान सुंदरी त्याच्या दृष्टीस पडते व त्या दोघांची ओळख होते. रावजींची बरेच दिवस वाट पाहून ते परत न आल्यामुळें त्यांची मंडळी परत पुण्यास येतात. नंतर लवकरच भाऊ एका तात्यापंतोजीच्या शाळेंत जाऊं लागतो.

ही मंडळी परत आल्यानंतर थोड्याच दिवसांनीं शिवरामपंतांची बदली पुण्यास होऊन योगायोगानें ते भाऊच्याच घरांत बिऱ्हाडाला जागा घेतात. त्यामुळें भाऊ व सुंदरी यांची मैत्री दृढ होते. सुंदरीच्या गृहशिक्षणाचा व लिहिण्यावाचण्याचा भाऊच्या मनावर अनुकूल परिणाम होऊन त्याचा द्वाडपणा नाहींसा होतो, व त्याला स्वतांला लिहिण्यावाचण्याची गोडी लागते. शिवरामपंत, त्यांची पत्नी व सुंदरी ह्यांचें एकमेकांवरील प्रेम, शांत स्वभाव, मधुर भाषण, घरांतील टापटिपीची रहाणी इत्यादि गोष्टींचा भाऊच्या मनावर परिणाम होऊन त्याच्या स्वभावाला व चरित्राला निराळें वळण लागतें. तो सुंदरीबरोबर तिच्या आईजवळ शिकण्यास बसतो व लवकरच मामाच्या घरीं गेलेल्या आपल्या मैत्रिणीला पत्र लिहिण्याइतकी त्याची तयारी होते.

एकदां भाऊची दीड-दोन वर्षांनीं वडील असलेली बहीण ताई त्यानें सुंदरीला लिहिलेल्या पत्राचे गहाळ झालेले कागद वाचतांना त्याच्या दृष्टीस पडते. हिनेंच आपले कागद दडविले अशा समजुतीनें रागावून

नाऊन तो तिला एक चपराक मारतो. यावर ती त्याला, " भाऊ, तूं फार चांगला, फार चांगला म्हणून सुंदरी म्हणते तो असाच कां रे चांगला ? " असें विचारते. लहानपणापासून सुंदरीवर त्याचें फार प्रेम असल्यामुळें व तिच्या स्वतांच्या सुविनीत व आज्ञाधारक वर्तनामुळें तिनें आपल्याला वाईट म्हणूं नये अशी त्याची मनापासून इच्छा असते. एखादी अनुचित गोष्ट करतांना ' सुंदरी काय म्हणेल ? ' हा प्रश्न नेहमीं त्याच्या मनांत येतो. मनाच्या या ठेवणीमुळें ताईच्या प्रश्नाचा मनावर तत्काल परिणाम होऊन त्याचें अंतःकरण मृदु होतें व यानंतर तो तिच्याशीं प्रेमळपणानें वागूं लागतो. ताईचेंही सुंदरीवर भाऊइतकेंच प्रेम असतें, व यामुळें त्या तिघांचें छान त्रिकूट जमतें. ताई आईला व आजीला चोरून वाचण्यास शिकते. ही गोष्ट सहज एकदां तिच्या आईच्या नजरेस येते व ती तिला मुळींच पसंत पडत नाहीं. पुढें तत्कालीन रूढीला अनुसरून ताईचें लग्न करून टाकावें असें तिच्या आईच्या मनांत येतें व कोणाचें न ऐकतां हट्टानें ती एका वृद्ध विधुराशीं तिचें लग्न करून टाकते.

ताईच्या लग्नानंतर थोड्याच दिवसांनीं भाऊचा स्नेही विनायक त्याला आपलें सुंदरीशीं लग्न ठरल्याचें सांगतो. भाऊला ही बातमी दुःसह होतें व रात्रींच्या अनवरत विचारानें व जागरणानें तो सडकून आजारी पडतो. आजाराला थोडा उतार पडूं लागल्यावर रावजींचा फेरा येतो. ते दोन दिवस नवीन निराळें बिऱ्हाड थाटतात, परंतु बरोबर आणलेली पुंजी संपल्याबरोबर पैशाबद्दल नवराबायकोंत बेबनाव होऊन ते निघून जातात. भाऊची आई भाऊला घेऊन पुन्हा माहेरीं आपल्या आईजवळ राहण्यास जाते.

ताईकरितां स्थळें पहात असतांना शिवरामपंतांनीं तिच्या आईला एका गरीब परंतु सुशिक्षित मुलाचें स्थळ सुचविलें होतें. परंतु कांहीं स्वार्थी लोकांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून ' तो गृहस्थ सुधारक आहे,

आम्हांला त्या ठिकाणीं मुलगी द्यावयाची नाहीं' असें ताईच्या आजीनें स्वच्छ सांगितलें, व 'आम्हांला शिवरामपंतासारख्या बाटग्या सुधारकाचें बिऱ्हाडच नको' असें म्हणून त्यांना बिऱ्हाड सोडावयास लावलें. त्याप्रमाणें ते दुसऱ्या बिऱ्हाडीं रहाण्यास जातात, तथापि त्यांचें भाऊ व ताई या मुलांवरचें प्रेम कायम टिकतें. मुलांचाही आपल्या घरच्या मंडळीपेक्षां शिवरामपंतांकडेच अधिक ओढा राहतो. भाऊ नियमानें त्यांच्याकडे जात असल्यामुळें त्याच्या घरची सर्व हकीकत त्यांना कळत असते. प्रसंगानें ते एकदां भाऊला त्याची सर्व परिस्थिति समजून सांगतात. त्यानें यापुढें कसें वागलें पाहिजे, त्याची जबाबदारी किती मोठी आहे, त्यानें आपल्या पायांवर उभें राहणें किती अवश्य आहे, याविषयीं त्याला ते कळकळीचा उपदेश करतात, व शेवटीं "कांहींही झालें तरी इतक्यांत लग्न करण्याची घाई करूं नकोस, ह्या बाबतींत कोणाच्याही आग्रहाला किंवा हट्टाला बळी पडूं नकोस," असें बजावून सांगतात. आधींच तयार झालेल्या मनोभूमींत हें उपदेशाचें बीज चांगलें रुजतें, व चार वर्षांनंतर फार हुशार व सुविनीत मुलगा म्हणून भाऊचा शाळेंत लौकिक होतो. आजी त्याच्या लग्नाची गोष्ट काढते, परंतु अगदीं अनपेक्षितपणें त्याची आईच तिला पूर्ण नकार दर्शविते. भाऊ अनायासेंच विवाहाच्या संकटांतून बचावतो.

ताईचा विवाह सुखावह होत नाहीं. तिच्या पतीला बाहेरख्यालीचें व्यसन असल्यामुळें बाजारबसव्या बायांची तिच्या घरीं नेहमीं येजा सुरू असते. तिचें सासरचें आयुष्य अत्यंत कष्टमय होऊन तिला नवऱ्याच्या घरीं राहणें दुःसह होतें. शेवटीं एक दिवस ती माहेरीं राहण्यास येते. त्याच रात्रीं तिचा नवरा आपल्या दिवाणजीस घेऊन तिला घरीं घेऊन जाण्याकरितां येतो, पण परत जाण्याचें ती साफ नाकारते, व तो तिच्या आईबापांचा उद्धार करून रागारागानें अद्वातद्वा शिव्या देत निघून जातो. या दुरुक्ती तिच्या आईला दुःसह होऊन ती घेरी येऊन

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. विभाग ८७८
मराठी ... नोंद नं. १८८



पडते व त्या आजारांतच तिचा अंत होतो. मामी ताईला नवऱ्याच्या घरीं राहण्यास सुचवितात, पण भाऊला तें पसंत पडत नाहीं. शेवटीं मामा ताईला आपल्या नोकरीच्या गांवीं घेऊन जातात.

आईच्या मृत्यूनंतर भाऊ शिवरामपंतांच्या इच्छेप्रमाणें शिक्षणाकरितां त्यांच्याच घरीं राहतो. त्याचे मामा नियमानें दर महिन्यास खर्चाकरितां त्याला थोडेसे पैसे पाठवितात. ताईला मामांच्या इथें रहाण्यानें दुःसह त्रास होतो असें भाऊला दिसूं लागतें, व पुढें सुंदरीला तिच्याकडून आलेल्या पत्रावरून त्याची खात्री होते. शिवरामपंतांच्या सल्लयानें तो तिला पुण्यास आणतो, व ती सुंदरीबरोबर शाळेंत जाऊं लागते. असें चाललें असतां भाऊचे वडील रावजी एकदां पुण्यास येतात व ताईला नवऱ्याच्या घरीं रहाण्यास सांगतात. ती तें साफ नाकारते. रावजी रागारागानें निघून जातात.


थोडेंसें शिक्षण झाल्यावर ताई व सुंदरी शेजारपाजारच्या स्त्रियांच्या घरीं जाऊन त्यांना लिहिणें, वाचणें, वीणकाम वगैरे शिकविण्याचें ठरवितात. भाऊ एल्‌एल्. बी.च्या अभ्यासाकरितां मुंबईस राहतो. ताईचें स्त्रियांना शिकविण्याचें काम चाललें असतांना एक दिवस तिच्या घरचा गडी येऊन तिला नवरा अर्धांगानें एकाएकीं आजारी पडल्याची बातमी सांगतो. ती आपलें कर्तव्य ओळखून तांतडीनें घरीं जाऊन नवऱ्याची शुश्रूषा करूं लागते, व त्याप्रमाणें भाऊला मुंबईस पत्र लिहिते. ताईचा नवरा मृत्यु पावतो. ती सासरची निरवानिरव करून पुन्हां आपल्या शिक्षणाच्या कामाला लागते.

भाऊ एल्‌एल. बी. ची परीक्षा पास होतो व बहिणीला घेऊन निराळें बिऱ्हाड थाटतो. भाऊच्या मनांत प्रथमपासून शिवरामपंतांच्या शिकवणीनें लोकसेवेचें बीज रुजलें असल्यामुळें आपल्या कामास कशी सुरवात करावी, त्याची रूपरेखा कशी असावी ह्याचा विचार करतो, व तो करतांना शिवरामपंतांचाही सल्ला घेतो. तो प्रथम लोकांना—विशेषतः

तरुणांना–विविध विषयांवर व्याख्यानें देण्यास सुरवात करतो. मत-प्रसारार्थ आपलें एखादें वर्तमानपत्र काढतां आल्यास चांगलें असें त्यास वाटूं लागतें, परंतु द्रव्याभावीं त्याला कांहींही करतां येत नाहीं. इतक्यांत सुदैवानें एखादें चांगलें विचारप्रवर्तक वर्तमानपत्र काढण्याचें एका सद्‌गृहस्थाचे मनांत येऊन तो भाऊला द्रव्यसहाय्य करण्याचें अभिवचन देतो. त्याच्या अनुमतीनें भाऊ "नवे विचार" नांवाचें पत्र काढूं लागतो. अशा रीतीनें लोकसेवेचा आरंभ झाला असतां एक दिवस त्याचें मन देशोन्नति कशी करतां येईल ह्या प्रश्नाचा विचार करीत असतें. या विचारप्रवाहांत वहात जाऊन तो भावनावश होतो, व अविवाहित राहून नवा पंथ स्थापण्याची शपथ घेतो. इतक्यांत शिवरामपंत त्याच्या खोलींत येतात व त्यानें सुंदरीशीं लग्न करावें अशी इच्छा दर्शवितात. भाऊचें सुंदरीवर फार प्रेम असतें, व त्याला तिच्याशीं लग्न करण्याची मनांत इच्छाही असते; परंतु अविवाहित राहून लोकसेवा करण्याची शपथ घेतल्यामुळें मोठ्या कष्टानें त्याला शिवरामपंतांची सूचना नाकारावी लागते. त्याचे मामाही आपल्या रीतीनें त्याला विवाह करण्याचा आग्रह करतात, पण त्याचा उपयोग होत नाहीं. तो आतां संन्यासदीक्षा घेऊन भावानंद हें नांव धारण करतो व आपल्या नवीन पंथाच्या मठाची स्थापना करतो. या कार्याला त्याच्या इतक्याच कळकळीचे पांच चार सुशिक्षित अनुयायी मिळतात. या नवीन पंथाचा मतप्रसार व लोककल्याण यांकरितां तो अविरत श्रम करतो. त्याचा अनिष्ट परिणाम होऊन थोडक्याच दिवसांत त्याला क्षयाची भावना होते व मठकार्याला आरंभ होतो न होतो तोंच त्याला आपली इहलोकची यात्रा संपवावी लागते.

भावानंद मृत्युशय्येवर पडल्यानंतरची व त्याच्या मृत्यूनंतरची हकीकत त्याच्या आत्मचरित्रांत येणें अशक्य झाल्यामुळें ती त्याचा पट्टशिष्य रामानंद ह्यानें लिहिली आहे. त्यांत त्यांनीं आपले गुरु मरणा-

सन्न झाले असतांसुद्धां जिवाकडे न पाहतां, कोणाचेंही न ऐकतां आपलें ज्ञानप्रसाराचें व लोकसेवेच्या सत्कार्याचें काम रात्रंदिवस कसे करीत राहिले हें सांगितलें आहे. त्याचप्रमाणें मरणसमयीं ताईशीं झालेलें त्यांचें भाषण, कांहीं शुद्धींत व कांहीं वाताच्या लहरींत त्यांच्या मुखावाटे बाहेर पडणारे उदात्त व ओजस्वी विचार, त्यांनीं रामानंद, ताई व सुंदरी यांना लिहिलेलीं तीन पत्रें, त्यांपैकीं दोन पत्रांतील मजकूर व तीं वाचतांना या मंडळींची झालेली मन:स्थिति या सर्वांचें हृदयस्पर्शी वर्णन या लेखांत करून व आदरपूर्वक आपल्या गुरूविषयींचें मत प्रदर्शित करून रामानंद आपला चरित्र भाग संपवितो.



# भाग दुसरा.

# कथानक-रचना.

कादंबरीवाङ्मय ललितवाङ्मयांत मोडत असल्यामुळें इतर ललित-कलांप्रमाणें मनोरंजन हा त्याचा मुख्य हेतु आहे. नित्यव्यवसायानंतर करमणुकीकरितां आपण एखादें नाटक, कादंबरी किंवा गोष्टींचें पुस्तक वाचावयास घेतों. कादंबरीचा मनोरंजन हा प्रधान हेतु असला तरी कादंबरीकार पुष्कळ वेळां तिचा लोकशिक्षणाच्या कामीं उपयोग करून घेतात. केवळ ज्ञानप्रद, तात्विक वाङ्मयांतील रुक्ष तत्त्वें वाचण्याचा पुष्कळांना कंटाळा असतो. तींच तत्त्वें नाटक किंवा कादंबरी यांच्या द्वारें त्यांच्या पुढें मांडलीं म्हणजे त्यांच्या पचनीं पडतात. कादंबरीकार कुशल व परिणामकारक लेखक असेल, तर त्याच्या एका कादंबरीनें सुद्धां समाजांत महत्त्वाची क्रांति घडून येण्यास चांगली मदत होते. मिसेस स्टोच्या ' अंकल टॉम्स कॅबिन ' ह्या १८५२ सालीं लिहिलेल्या कादंबरीनें अमेरिकेंतील गुलामगिरीचा नायनाट करण्यास किती उत्कृष्ट मदत केली, हें इंग्लिश वाङ्मयाच्या वाचकांस माहीत असेल. हरिभाऊ आपट्यांनीं समाजांतील गुणदोष आपल्या सामाजिक कादंबऱ्यांत किती परिणामकारक रीतीनें दाखविले आहेत व आपलीं समाजसुधारणेचीं मतें किती कुशलतेनें वाचकांच्या पुढें मांडलीं आहेत हें मराठी वाचकांस चांगलें ठाऊक आहे.

कादंबरी केवळ मनोरंजनाकरितां लिहिण्यापेक्षां कांहीं तरी लोकशिक्षणाचें किंवा तत्त्वविवेचनाचें ध्येय धरून लिहिणें अधिक कठिण आहे. पहिल्या प्रकारांत लेखकाला फक्त मनोरंजनाच्या दृष्टीनेंच कादंबरी-लेखनाचें तंत्र सांभाळावयाचें असतें. परंतु दुसऱ्या प्रकारांत त्याला हें

तंत्र सांभाळून शिवाय आपला कादंबरी लिहिण्यांतला विशिष्ट हेतु उत्तम प्रकारें कसा सिद्धीस जाईल ह्याचा विचार करावा लागतो. यामुळें त्याला दोन तंत्रें सांभाळणें भाग पडतें.

हरिभाऊंनीं 'मी' कादंबरी आपल्या इतर सामाजिक कादंबऱ्यां- प्रमाणें लोकशिक्षणाच्या हेतूनें लिहिली. समाजसेवा सफल होऊन देशाची सामाजिक व राजकीय प्रगति व्हावयाची असल्यास अत्यंत स्वार्थत्यागी अशा तरुणांची देशाला फार अवश्यकता आहे हें त्यांना या कादंबरींत दाखवावयाचें होतें. हें ध्येय त्यांना तरुणांपुढें ठेवावयाचें होतें. कादंबरीची मुख्य शिकवण ही होती. हिच्या अनुषंगानें त्यांनीं गृहशिक्षण, प्राथमिक शिक्षण, बालविवाह, स्त्रीशिक्षण वगैरे सामाजिक प्रश्न घेऊन त्यांत सुधारणा झाल्याशिवाय कुटुंबाची व समाजाची उन्नति होणें नाहीं हें वाचकाच्या निदर्शनास आणून दिलें.

ही शिकवण मनोरंजक व परिणामकारक होण्याकरितां हरिभाऊंनीं प्रस्तुत कादंबरीच्या कथानकाची रचना फार कुशलतेनें केली आहे. एकच गोष्ट दोन माणसें दोन प्रकारांनीं सांगतात. एक गोष्ट सांगत असतांना आपलें मनोरंजन होतें, दुसऱ्याला तें साधत नाहीं. तो ती गोष्ट सांगतो व आपण ती ऐकतों येवढेंच ! शेवटीं आपण पहिल्याला गोष्टी सांगण्याची कला माहीत आहे, त्याला ती साधते असें म्हणतों. चांगल्या गोष्टी सांगणारा गोष्ट कशी सांगावयाची, तिला आरंभ कोठून करावयाचा, तिच्या निरनिराळ्या भागांची मांडणी कोणत्या क्रमानें करावयाची, व तिचा शेवट कसा करावयाचा ह्याचा विचार करून गोष्ट सांगतो. कादंबरीकारालाही हेंच करावें लागतें. 'मी' कादंबरीचें कथानक अगदीं साधें, सामान्य असें आहे. त्याचा केवळ सांगाडा पाहिला तर त्यांत आपल्या डोळ्यांपुढें नेहमीं घडून येणाऱ्या गोष्टींपेक्षां दुसरें विशेष असें कांहीं नाहीं. तथापि ह्या साध्या सांगाड्यावर हरि- भाऊंनीं आपल्या कादंबरीची मनोहर इमारत उभारली आहे.

ध्येयाच्या दृष्टीनें या कादंबरीला आत्मचरित्राचें रूप देण्यांत हरिभाऊंची योजना चांगली दिसते. कादंबरीची उभारणी जरी असत्याच्या किंवा कल्पनेच्या पायावर होत असते, तरी कलाकृति या दृष्टीनें तिच्यांत सत्याभास उत्पन्न व्हावा लागतो. तो निर्माण करण्यासाठीं हरिभाऊंनीं निरनिराळ्या युक्त्या योजिल्या आहेत. त्यांपैकींच आत्मचरित्राची योजना ही एक आहे. भाऊ किंवा भावानंद यानें स्वतां आपलें चरित्र लिहिलें आहे. बालवयांतील त्याचा मुंबईचा प्रवास, त्याच्यावर मुंबईस आलेलें विघ्न, लखोटयाची हकीगत, पुण्यांतील सदाशिव पेठेंतील त्याचें रहातें घर, त्याच्या बहिणीचे झालेले हाल, त्याला समाजसेवेच्या आरंभीं आलेले बरेबाईट अनुभव, संन्यासपंथांतील त्याची अविरत कामागिरी इत्यादि अनेक गोष्टी तो स्वतां अगदीं स्वाभाविकपणें सांगत असल्याकारणानें आपण काल्पित कादंबरी वाचीत आहोंत हें क्षणभर विसरून जातों. आपल्यापुढें भावानंदाचें खरेंखुरें चरित्र असून उत्सुकतेनें आपण त्याचीं पानें उलटीत आहोंत असें वाटूं लागतें. कादंबरीला आत्मचरित्राचें रूप दिल्यामुळें सत्याभासनिर्मितीचें कार्य सुकर होतें, कादंबरीचा लोकशिक्षणाचा हेतु साध्य होण्यालाही चांगली मदत होते व ' आधीं केलें, मग सांगितले ' अशी भावानंदाची भूमिका असल्यामुळें त्याचा स्वार्थत्यागाचा उपदेश मनावर ठसून परिणामकारक होतो.

आत्मचरित्रपर कादंबरी अशा रीतीनें जरी फायदेशीर असली, तरी तिच्यांत दोष उत्पन्न होण्याचा संभव असतो. हे दोष टाळण्याची कादंबरीकाराला काळजी घ्यावी लागते. ह्या प्रकारच्या कादंबरीलेखनांत लेखकाच्या लेखणीला स्वैरपणें खेळतां येत नाहीं. तिला विवक्षित मर्यादेंतच वावरावें लागतें. नाटककाराला ज्याप्रमाणें नाटकांत प्रत्यक्ष कोणताही भाग घेतां येत नाहीं, सर्व गोष्टी पात्रांकरवीं घडवून आणाव्या लागतात, त्याप्रमाणेंच आत्मचरित्रपर कादंबरी लिहिणारास काल्पित

स्थळ प्रत
सं.
ता.
नोंद नं.



व्यक्तीच्या कडून प्रत्येक वृत्तांत लिहवावा लागतो. प्रत्यक्षपणें त्याला स्वतांला कांहीं एक सांगतां येत नाहीं. काल्पित चरित्रलेखकाशीं तादात्म्य पावून प्रत्येक गोष्ट त्यानें पाहिली आहे, प्रत्येक प्रसंग अनुभविला आहे असा भास उत्पन्न करावा लागतो. या नियमाकडे दुर्लक्ष झाल्यास विसंगति व कृत्रिमता उत्पन्न होण्याचा संभव असतो.

चरित्ररूपी कादंबरी लिहितांना, मग ती आत्मचरित्रपर असो किंवा दुसऱ्यानें लिहिलेल्या चरित्रासारखी असो, दुसरी एक अडचण उत्पन्न होते. चरित्र म्हटलें म्हणजे त्यांत मनुष्याच्या जीवनक्रमांतील निरनिराळे भाग येणार. त्यांत मनोरंजक, चटकदार व कादंबरीला साजेसे भाग थोडे. अशा परिस्थितींत या जीवनचरित्रांत नाविन्य व चित्ताकर्षकत्व उत्पन्न करणें कांहींसें कठिण पडतें. लेखकाला आपल्या प्रतिभेचा उपयोग करून चटकदार प्रसंग, नाट्य प्रसंग, विनोद, सरस संभाषणें वगैरे कादंबरीला लागणारी सामुग्री निर्माण करावी लागते. कथापर कादंबरींत बहुधा नाविन्य मुळांतच असतें. तिच्यांत एक मध्यवर्ती मुख्य वृत्तांत असून त्याच्या भोंवतीं इतर धागेदोरे गुंफलेले असतात. चरित्ररूपी कादंबरींत नायकाच्या किंवा नायिकेच्या बाल्यावस्थेपासून मृत्यूपर्यंत जीवनक्रमाशिवाय दुसरें काय येणार ? अशा चरित्रांत वर सांगितल्याप्रमाणें अद्भुत, गूढ, कादंबरीला अनुरूप असे प्रसंग थोडे असावयाचे. तथापि हे सामान्य प्रसंग सुद्धां प्रतिभासंपन्न लेखकाला सरस करतां येतात. तो आपल्या प्रतिभेनें सरस व अद्भुत प्रसंग, गूढें, विनोदस्थळें वगैरे कादंबरीचीं चित्ताकर्षक अंगें निर्माण करूं शकतो. लोकशिक्षणाचें ध्येय धरणाऱ्या कादंबरीकाराला या अंगांच्या केवळ मनोरंजकपणाचा विचार करून चालत नाहीं, तर आपल्या ध्येयसिद्धीलाही तीं उपकारक कशीं होतील याचा त्याला विचार करावयाचा असतो.

या भागाची येवढी प्रस्तावना करून प्रस्तुत कादंबरीच्या कथानकरचनेचा विचार करूं.

कादंबरी मनोरंजनाचें साधन असल्याकारणानें तिचा पहिला गुण म्हणजे ती आरंभापासून चित्ताकर्षक असावी. शेंपन्नास पानें वाचल्यानंतर रंग येणारी कादंबरी कोण हातांत धरणार ? हीं इतकीं पानें वाचीपर्यंत दम तरी कोणाला निघणार ? चांगल्या कादंबरीचा दुसरा गुण असा कीं, आरंभीं चढलेला रंग एकसारखा वाढत जाऊन शेवटपर्यंत टिकला पाहिजे. 'मी' कादंबरींत वाचक पहिल्याच प्रकरणांत रंगून जातो. मुंबईच्या प्रवासाचें सहजसुंदर वर्णन, भाऊच्या आईची कावलेली मनःस्थिति, आई–आजीचीं स्वभावनिदर्शक संभाषणें, स्टेशनाचें व चाळीचें वर्णन, प्रसंगनिष्ठ विनोद, बालस्वभावनिदर्शन इत्यादि गोष्टींनीं पहिलेंच प्रकरण सरस वठलें आहे. तें वाचूं लागतांच वाचकाच्या मनावर कादंबरीची पकड बसून तो पुढील पानें उत्कंठेनें उलटूं लागतो. ' पण लक्ष्यांत कोण घेतो ? ', ' यशवंतराव खरे ' इत्यादि कादंबऱ्यांचीं पहिलीं प्रकरणें अशींच चित्ताकर्षक झालेलीं पाहिलीं म्हणजे कथानकाचा आरंभ कसा करावा हें हरिभाऊंना पूर्णपणें माहीत होतें असें म्हणावें लागतें. दुसऱ्या प्रकरणांत भाऊ आपल्या वडिलांच्या खोलींत अडकून पडतो तेव्हां त्या विनोदी प्रसंगाचें वाचकास हंसू येऊन थोडीशी गंमत वाटते, तोंच संध्याकाळ होऊन अंधार पडूं लागल्यामुळें भाऊची खोलीच्या बाहेर येण्याची धडपड व केविलवाणी स्थिति पाहून त्याला त्याची कींव येऊं लागते व पुढें खोलींतील जाळ पहातांच मनाची विनोदी वृत्ति नाहींशी होऊन भाऊच्या जिवाची काळजी वाटूं लागते; व पुढें त्याचें काय झालें हें समजण्याची उत्कंठा उत्पन्न होऊन तो कादंबरी पुढें वाचूं लागतो. ह्याप्रमाणें कथानकाचे पुढें येणारे बरेच भाग अधिकाधिक चित्ताकर्षक होतील असे योजिले आहेत.

भावानंदाचें चरित्र रंगवितांना प्रथम त्याच्या जीवनक्रमांतील विशिष्ट प्रसंगांची योजना मोठ्या कुशलतेनें झाली आहे. ह्या प्रसंगांत स्वतां भाऊ, ताई, शिवरामपंत व त्यांची मुलगी सुंदरी ह्या व्यक्ती मुख्य असून त्यांच्या कृती, स्वभाव, विचार वगैरेनीं ते प्रसंग चित्ता-कर्षक झाले आहेत. या प्रसंगांनीं कथानकाला–भावानंदाच्या चरित्राला–सौंदर्य आलें आहे; व हेच कादंबरीकाराचें ध्येय उत्तम प्रकारें साध्य करण्यास मदत करतात. ह्या प्रसंगांच्या निर्मितीनें हरिभाऊंची कल्पनाशक्ति व कथानकरचनेचें कौशल्य चांगलीं निर्दिष्ट होतात. ह्या प्रसंगांपैकीं मुख्य प्रसंगांचा खालीं थोडक्यांत निर्देश केला आहे. त्यावरून कादंबरीला मनोहर रूप देण्यास व कादंबरीकाराचें ध्येय साधण्यास त्यांचा कसा उपयोग झाला आहे हें समजून येईल.

अगदीं पहिला प्रसंग म्हणजे शिवरामपंतांची पत्नी व त्यांची मुलगी सुंदरी यांची व भाऊची प्रथम ओळख झाली तो. भाऊच्या वडीलांच्याच मुंबईच्या रिकाम्या झालेल्या खोलींत शिवरामपंत रहावयास येतात व बालस्वभावानुसार भाऊ तेथें गेला असतांना ही ओळख होते. हा मनोवेधक प्रसंग कथानक–रचनेच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. सुंदरीची आई व आपली आई यांच्या स्वभावांतील व मुलांशीं वागण्यांतील विरोध पाहून भाऊच्या मनावर फार परिणाम होतो, सुंदरीची व त्याची ओळख होते व ह्याच ओळखीचें पुढें स्नेहांत व प्रेमांत रूपांतर होतें. भाऊचा स्वभाव, विचार व जीवनक्रम यांना पुढें अगदीं निराळें वळण लागलें, ह्याचें बीज ह्याच ओळखींत आहे. ह्याच कारणानें हा भाग महत्त्वाचा आहे. शिवाय त्यांत भाऊ व सुंदरी यांचा बालस्वभाव, सुंदरीच्या आईचें तिच्यावरील प्रेम, तिच्या स्वभावांतील प्रेमळपणा, वत्सलरसाचा परिपोष, दोन आयांतील स्वभावविरोध इत्यादि कारणांनीं हा कथाभाग फार चित्ताकर्षक होतो.

यानंतर थोड्याच दिवसांनीं शिवरामपंतांची पुण्यास बदली होऊन

ते योगायोगानें भाऊच्याच घरांत राहण्यास येतात. हा भागही वरच्यासारखा इतका महत्त्वाचा व मनोहर आहे. शिवरामपंतांच्या कुटुंबांतील मंडळींचा भाऊवर आतां चांगलाच परिणाम होतो. ह्या मंडळींचें एकमेकांवरील प्रेम, त्यांचा शांत स्वभाव, टापटिपीचा रहाणी व सुंदरीचें गृहशिक्षण ह्या गोष्टी पाहून भाऊला लिहिण्यावाचण्याची गोडी लागते व सद्वर्तनाचा कित्ता मिळतो. सुंदरीविषयीं स्नेह उत्पन्न होऊन प्रत्येक गोष्ट करतांना ती तिला आवडेल कीं नाहीं हा विचार त्याच्या मनांत येतो ह्या सर्वांचा त्याच्या वर्तनावर फार चांगला परिणाम होऊन तो कर्तव्यक्षम बनतो. हा सर्व भाग चटकदार उतरला आहे. ' इहलोकचा स्वर्ग ' हें यथार्थ नांव देऊन ह्या आदर्शभूत कुटुंबाचें हरिभाऊंनीं काढलेलें शब्दचित्र फार सुंदर साधलें आहे.

भाऊच्या स्वभावावर दुसऱ्या एका प्रसंगानें आणखी एक इष्ट परिणाम घडून येतो. सुंदरी आपल्या मामाच्या घरीं गेली असतांना भाऊनें तिला लिहिलेल्या पत्राचे हरवलेले कागद वाचतांना त्याची बहीण ताई त्याच्या दृष्टीस पडते. हा प्रसंग हरिभाऊंनीं कथानकांत मोठ्या कुशलतेनें आणला आहे. आपले कागद ताईला वाचतांना पाहून भाऊ रागानें लाल होऊन तिला शिव्या देतो व एक चपराक मारतो. ती त्याला उलट शिव्या वगैरे न देतां किंवा रडून आरडाओरड न करतां अश्रू गाळीत एकदम विचारते, " भाऊ, तूं फार चांगला, फार चांगला म्हणून सुंदरी नेहमीं म्हणते तो असाच कां रे चांगला ? " सुंदरीच्या नांवाच्या उल्लेखानें व ताईनें डोळ्यांत अश्रू आणून शांत व केविलवाण्या मुद्रेनें उच्चारलेल्या ह्या शब्दांनीं भाऊच्या मनावर जादूसारखा परिणाम होतो. आपल्या कठोरपणाचा पश्चात्ताप होऊन तो तिची क्षमा मागतो. अशा रीतीनें दोघांच्या अंतःकरणाचे पडदे उघडून तीं दोघें एकजीव होतात. भाऊच्या अंतःकरणांत भगिनीप्रेमाची जागृति झाल्याकारणानें पुढील कार्यभागांत त्यांचें एकमेकांना चांगलें साहाय्य होतें.

पुढें ताईच्या लग्नाच्या प्रसंगाची संधि आणून हरिभाऊंनीं बालविवाहाच्या अनिष्ट चालीच्या परिणामाचें अत्यंत हृदयद्रावक चित्र काढलें आहे. हीं सर्वच प्रकरणें करुणरसानें ओथंबलेलीं आहेत. त्यांत विवाहाचा प्रश्न निघतांच ताईच्या मनाची झालेली करुणास्पद स्थिति, तिला अकालीं आलेला पोक्तपणा, ‘ कराला देवीचा नवा अवतार ’ हें रूपक योजून बालविवाहाच्या रूढीवर मारलेले प्रखर तडाखे, ‘ बाबारे! आम्ही घरांत बांधलेलीं मुकीं जनावरें ’ ह्या दगडाला पाझर फोडणाऱ्या ताईच्या अर्थपूर्ण उद्‌गारानें उपवर बालिकांची दिसून येणारी असहाय्य व केविलवाणी परिस्थिति, लग्नानंतरची तिची अमानुष छळणूक इत्यादि ताईच्या चरित्रांतील भाग उद्बोधक होऊन मनावर परिणाम केल्याशिवाय रहात नाहींत. या भागांत हरिभाऊंनीं आयुष्यांतील नेहमींचे साधेच प्रसंग घेऊन ते कादंबरींत उत्तमप्रकारें कसें रंगावितां येतात हें कृतीनें दाखविलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या ठिकाणीं भाऊच्या आत्मचरित्राच्या धाग्यांत ताईच्या चरित्राचे धागे गुंफण्यास सुरुवात करून पुढें हा गोफ विणीत विणीत ह्या धाग्यांचा शेवटीं एकजीव केला आहे. ताईच्या या चरित्रानें पुढें भाऊला त्याच्या देशसेवेच्या कामीं चांगली मदत होते.

भाऊची स्वार्थत्यागाची भूमिका तयार करण्यांत त्याचे गुरु शिवरामपंत ह्यांचा सर्वांत अधिक उपयोग होतो. त्यांची स्वतांच्या प्रेमळ वागणुकीनें व उपदेशानें कशी मदत झाली, किंबहुना भाऊचा भावानंद शिवरामपंतांशिवाय झालाच नसता, हें हरिभाऊंनीं शिवरामपंत व त्यांचें कुटुंब यांचें चरित्र योजून व त्याकारितां कांहीं प्रसंग निर्माण करून दाखविलें आहे. हे सर्व प्रसंग सुसंस्कृत विचारांचें उदात्त वातावरण निर्माण करून भाऊच्या मनोभूमींत सत्य, सद्विचार, स्वार्थत्याग, देशसेवा वगैरे अमोल गुणांचें बीजारोपण करतात. सांगितलेले उपदेशाचे चार शब्द कळतील इतका भाऊ मोठा झाल्याबरोबर पहिल्याच संधीचा फायदा

घेऊन शिवरामपंतांनीं भाऊला त्याची परिस्थिति समजावून देऊन प्रेमळपणें केलेला उपदेश, त्यांच्या घरीं एक दिवस भाऊ जेवावयास गेला असतां त्यांचे सुंदरीच्या शिक्षणाविषयींचे त्याच्या कानांवर पडलेले बेत, 'बोले तैसा चाले' या न्यायाची त्यांची सुंदरीला लोकनिंदा सहन करून शाळेंत घालण्यांत दिसून येणारी वागणूक, प्रेसिडेंट गार्फील्डचें चरित्र संपविण्याच्या इच्छेनें एक दिवस भाऊनें शाळा बुडविली त्यावेळीं त्याला प्रेमानें केलेला उपदेश, हे सर्व भाग भाऊच्या कर्मयोगी भूमिकेची तयारी करण्याकरितां योजिले आहेत. हें योजण्यांत हरिभाऊंची केवळ प्रतिभाच नव्हे तर उदात्त संस्कृतिही व्यक्त होते. 'मी' कादंबरीच्या कथानकांत हे भाग फार महत्त्वाचे व मनोरंजक आहेत. त्यांच्या योगानें केवळ भाऊचीच मनोभूमि तयार झाली असें नाहीं. कांहीं वाचकांच्या मनावरही त्यांचा परिणाम झाला असल्यास नवल नाहीं.

केवळ रूढीला संभाळण्याकरितां हट्टानें व उतावीळपणानें केलेल्या विवाहाचे अनिष्ट परिणाम कोठपर्यंत जातात, हें दाखविण्याकरितांच कीं काय भाऊच्या आईच्या मृत्यूचा प्रसंग वर्णिला आहे. हा भाग अत्यंत करुणास्पद व काळजाला घरें पाडणारा आहे. ह्या प्रकरणापासून पुढें आलेले भाग एकापेक्षां एक सरस वठले आहेत. ह्या प्रसंगाची योजना करणारा व ते यथायोग्य रंगविणारा कादंबरीकार फार मोठ्या दर्जाचा असला पाहिजे अशी हे भाग आपण वाचूं लागलों म्हणजे खात्री होते. आईच्या मृत्यूनंतर ताई मामांच्या गांवीं जाण्यास निघते तेव्हां भाऊ तिला स्टेशनवर पोंचविण्यास जातो. ती गेल्यानंतर त्याचें अंतःकरण अत्यंत उदास होऊन आपण अगदीं एकटे, आपल्याला आतां कोणी नाहीं असें त्याला वाटूं लागतें. अशा मनःस्थितींत तो बंडगार्डनवर गेला असतांना तेथें त्याला अकस्मात् बालपणींचा एक श्रीमंत स्नेही भेटतो. त्याच्याबरोबर त्याच्या घरीं जाऊन जेवण झाल्यावर तो घरीं येतो. मध्यरात्रींच्या सुमारास तो जागा होतो तों आपली आई आपल्याजवळ

बसली आहे व तिनें आपला हात आपल्या कपाळावर ठेवला आहे असा त्याला भास होतो. अशा स्थितींत त्याला थोडीशी गुंगी येते तों आईच्या शवावर हात ठेवून ताईच्याविषयीं घेतलेली शपथ त्याला आठवते व आपण एकटे नाहीं असें त्याला वाटूं लागतें. एकूणचाळीसावें व चाळीसावें हीं दोन प्रकरणें अत्यंत सरस प्रकरणांपैकीं आहेत. ह्या दोन प्रकरणांत भाऊच्या मनाची आरंभींची निराशापूर्ण मनःस्थिति व आपण आतां अगदीं एकटे राहिलों हा मनाला उदासीन करणारा विचार कमी कमी होऊन शेवटीं आपल्याला आपली ताई आहे, आपण एकटे नाहीं, असें वाटून त्याच्या मनांत आशा उत्पन्न होऊं लागते. हें मनःस्थितीचें वर्णन फार चित्ताकर्षक झालें आहे. हीं प्रकरणें रंगविण्यांत हरिभाऊंनीं आपलें कौशल्यसर्वस्व खर्चीं घातलें आहे असें म्हणावेंसें वाटतें.

ह्यानंतर ताई मामांच्या गांवीं रहात असतांना तिला तेथं फार त्रास होत असावा अशी भाऊला शंका येते व ती खरीही ठरते. शेवटीं तो तिला पुण्यास घेऊन येतो. ती सुंदरीबरोबर शाळेंत जाऊं लागते. पुढें शिवरामपंतांच्या सह्यानें सुंदरी व ती घरोघर जाऊन तेथील स्त्रियांना लिहिणें-वाचणें, शिवणकाम, वीणकाम वगैरे शिकविण्यास सुरुवात करतात. हा सर्व भाग वाचतांना वाचकाचें चांगलें मनोरंजन होतें. ह्या कालांत भाऊ मुंबईला राहून एल्एल्. बी. चा अभ्यास करीत असतो. असे कांहीं थोडे शांततेचे दिवस जातात तोंच एक मोठें विघ्न उपस्थित होतें. ताईचा नवरा अर्धांगवायूनें आजारी पडल्यामुळें ती एकदम त्याची शुश्रूषा करण्याकरितां आपल्या घरीं जाते व तसें भाऊला मुंबईला पत्र लिहिते. भाऊला ह्या तिच्या अनपेक्षित वागणुकीचें आश्चर्य वाटतें व तिच्याविषयीं गैरसमज होऊन पत्र पुरें न वाचतां तो उतावीळपणानें तिला रागाचें पत्र लिहितो. त्या पत्राचें ताई सविस्तर उत्तर पाठविते. पुढें ताईचा पति मृत्यु पावल्यानंतर घरची निरवानिरव

करून ताई आपल्या पूर्वकर्तव्याला लागते. हा सर्व भाग अतिशय करुणास्पद असून त्यांत भाऊचा उतावीळपणा व ताईचे कर्तव्यदक्षता, दयाळुपणा, विचारी व करारी स्वभाव वगैरे अनेक गुण फार कुशलतेनें दाखविले आहेत. हीं प्रकरणें वाचीत असतांना आपल्याला ताई-विषयीं आदरपूर्वक कौतुक वाटतें, व शेवटपर्यंत पुस्तक खालीं ठेव-वत नाहीं.

पुढें लवकरच भाऊ बी. ए., एल्एल्. बी. होऊन ताईला घेऊन पुण्यास बिऱ्हाड थाटतो व आपलें लोकसेवेचें व ज्ञानप्रसाराचें काम सुरू करतो. हीं प्रकरणेंही सरस वठलीं आहेत. ताईच्याविषयीं निंदकांनीं उठविलेल्या कंड्यांवर विश्वास ठेवून तिची आजी तिला आपल्या गांवीं नेण्याकरितां पुण्यास येऊन त्रागा करते. या प्रकरणांत जुन्या रूढींत वाढलेल्या आजीचें मनश्चित्र फार सुंदर काढलें आहे. पुढच्या प्रकरणांत समाजकार्यकर्त्यांनीं पूर्वतयारी कशी करावी या विषयींचे शिवराम-पंतांनीं प्रदर्शित केलेले विचार, 'नवे विचार' पत्राची स्थापना, प्रति-पक्षीयांची टवाळी इत्यादि भाऊच्या समाजकार्याच्या आरंभींच्या गोष्टींचें सुंदर वर्णन आलें आहे. तेथून भाऊच्या कार्याला सुरवात होते, व कादंबरीला पूर्वींपेक्षांही अधिक रंग चढतो.

यानंतरचा कादंबरीचा अवशिष्ट भाग सर्व दृष्टींनीं उत्कृष्ट उतरला आहे. कथानकाचा हा भाग कादंबरीचा कळसच आहे असें म्हणावेंसें वाटतें. ';समुद्र जितका शांत दिसतो तितका तो नसतो !' ह्या बासष्टाव्या प्रकरणापासून ह्या कथाभागाला सुरवात होते. आपल्या समाजकार्यांतील अडचणी व त्या कार्याची दिशा यांचा विचार करीत असतां भाऊचें डोकें तापून जातें व रात्रीं झोंप येत नाहीं म्हणून दोन अडीच वाज-ण्याच्या सुमारास तो बागेंत हिंडत असतां त्याला ताई कुंजांतून बाहेर येतांना दृष्टीस पडते. हा अद्भुत नाट्यप्रसंग, त्यांतील करुण रस, या दोघां बहिणभावंडांची मनःस्थिति वगैरे भाग नितांत रमणीय व हृदय-

स्पर्शी असून कादंबरीकाराचे सर्व गुण येथें व पुढील प्रकरणांत एकवटले आहेत असें वाटतें. त्याच्याच पुढल्या प्रकरणांत एक प्रसंग कथानकाच्या दृष्टीनें फार चांगला योजला आहे. आपल्या अंगीकृत कार्याला अनुयायी मिळवून मिशनरी लोकांप्रमाणें आत्मत्याग करून आपलें काम करतां येईल काय, असा प्रश्न भाऊच्या मनांत उत्पन्न होतो, व त्यावर विचार करीत असतांना एक नवा संन्यासपंथ स्थापन करण्याचा त्याच्या मनांत विचार आल्यावर शिवरामपंत व ताई यांच्या पायांची शपथ घेऊन तो पंथस्थापना करण्याचा निश्चय करतो. याच वेळी शिवरामपंत त्यानें सुंदरीशीं लग्न करावें अशी इच्छा प्रदर्शित करितात. सुंदरीवर अगदीं लहानपणापासून अत्यंत प्रेम व शिवरामपंतांसारख्या पूज्य गुरूंची इच्छा, असा योगायोग आला असतांना भाऊच्या कसोटीची वेळ येते व तो त्या कसोटीला उतरतो. शपथ घेतल्यामुळें तो विवाह करण्याचें नाकारतो. ह्या प्रसंगीं शिवरामपंतांचीही परीक्षा होते, परंतु ते आपल्या नेहमींच्या विचारी स्वभावाला अनुसरून, “ कांहीं झालें तरी सत्यव्रताचा मार्ग सोडूं नये, खरें सुख त्यांतच आहे,” असा भाऊला सल्ला देतात. याप्रमाणें गुरुशिष्यांच्या या अद्वितीय जोडीला कस लागून तिची परीक्षा होते. दोघांच्याही मनांत विचार व भावना यांची उडालेली खळबळ, सुंदरीच्या संबंधानें वाचकाच्या मनांत उत्पन्न होणारी अनुकंपा, भाऊचा अतुल स्वार्थत्याग वगैरे कारणांनीं हाही भाग पूर्वींप्रमाणें परिणामकारक व चित्ताकर्षक झाला आहे.

यापुढें भाऊचें चरित्र फारच थोडें राहिलें आहे. तो मठस्थापना करून आश्रमांत भावानंद हें नांव धारण करतो, व आपलें तनमन सर्वस्वीं लोककार्याला अर्पण करतो. अविरत श्रमामुळें त्याला आपली इहलोकची यात्रा अकालींच संपवावी लागते. ह्या शेवटच्या भागाचें हरिभाऊंनीं हृदयस्पर्शी शब्दचित्र काढलें आहे.

कादंबरीचा शेवट ‘ पण लक्ष्यांत कोण घेतो ’ सारखाच झाला

आहे. भावानंद मरणासन्न झाल्याकारणानें त्याचें अंत्यचरित्र व मृत्यूनंतरची हकीगत त्याचा पट्टशिष्य रामानंद ह्यानें आपल्या शब्दांनीं सांगितली आहे. हा कथानकाचा शेवट तर अत्यंत हृदयस्पर्शी आहे. त्यांत भावानंदानें लिहिलेलीं पत्रें, भोंवतालच्या मंडळींचा शोक, मृत्यूसमयीं त्यांचें सांत्वन करतांना भावानंदाच्या तोंडून निघालेले शब्द, वाताच्या लहरींत मुखावाटे बाहेर पडणारे सुसंगत विचार व शेवटीं रामानंदानें 'Behold the man !' ह्या लहानशा तीन शब्दी वाक्यानें केलेला त्या थोर पंथस्थापकाचा अर्थपूर्ण निर्देश, हे भाग वाचकाचें अंतःकरण आदर, आश्चर्य, पूज्यबुद्धि, करुणा इत्यादि विविध भावनांनीं भरून आणतात, व त्यानें पुस्तक मिटून खालीं ठेविलें तरी विचार व भावना यांचा खेळ त्याच्या मनांत चालूच रहातो.

कथानकांत चित्ताकर्षक प्रसंग योजून व त्यांची योग्य मांडणी करून हरिभाऊंनीं प्रस्तुत कादंबरी कशी मनोवेधक केली आहे व त्यांच्या योगानें इष्ट हेतुही कसा साधला आहे हें आतांपर्यंत पाहिलें. कादंबरी चटकदार व मनोवेधक करण्याकरितां कादंबरीकार आणखीही निरनिराळ्या योजना करतात. एक योजना अशी कीं, कथानकांत कांहीं गोष्टी प्रथम अर्धवट सांगून वाचकांची उत्कंठा वाढवावयाची व पुढें कुठेंतरी त्यांचा उलगडा करावयाचा. 'मी' कादंबरी चरित्रपर असल्यामुळें तिच्यांत फारशीं गूढें आलीं नाहींत. तथापि उत्कंठा वाढविणारीं कांहीं गूढें उल्लेख करण्यासारखीं आहेत. भाऊला रावजींच्या खोलींत सांपडलेला लखोटा, भाऊ व शिवरामपंत यांना लोकसेवेकरितां एका अज्ञात मनुष्यानें पाठविलेलें द्रव्यसाहाय्य व दिलेलें अभिवचन, व शेवटीं भाऊनें मृत्यूसमयीं भावानंदाच्या हातीं दिलेल्या तीन पत्रांपैकीं सुंदरीला लिहिलेलें पत्र, हीं तिन्हीं गूढें कादंबरींत उलगडलेलीं नाहींत. या तीन गूढांपैकीं शेवटच्या दोहोंचा उलगडा वाचक आपल्या मनानें अंदाजानें करूं शकतो. पहिल्याचा म्हणजे लखोट्याचा

उलगडा करतां येत नाहीं. तथापि त्यासंबंधीं वाचकाला आपलें समाधान करून घेतां येण्यासारखें आहे. लखोट्याची जिज्ञासा दोन विचारांनीं भागवितां येईल. अगदीं लहानपणीं भाऊसारख्या नादी मुलाचें एखाद्या वस्तूनें लक्ष वेधलें व कांहीं काळ तिच्यामागें लागून पुढें तिचा त्याला विसर पडला, असें समजणें वावगें होणार नाहीं. खोलींत पडलेलें एक जुनें पत्र पाहून आपल्या बापाचें तें पत्र म्हणून भाऊचें बाल मन तिकडे वळतें इतकेंच. दुसरें असें कीं, मनुष्याच्या आयुष्यांत उलगडा न झालेल्या अशा कांहीं गोष्टी घडून येतात. सत्याभास उत्पन्न करून कादंबरीला स्वाभाविकपणा आणण्याकरितां व थोडासा गूढ भाग आणून ती मनोवेधक करण्याकरितां हरिभाऊंनीं ह्या लखोट्याची योजना केली असावी असें वाटतें. भाऊनें बालपणीं सुंदरीला ती मामाचे घरीं गेली असतांना लिहिलेल्या पत्राचे कागद हरवतात. हा भाग जरी पूर्णपणें गूढ नसला, तरी वाचकाची त्यामुळें जिज्ञासा वाढून तो मनोवेधक होतो. शिवाय शेजारच्या बखळींत ते कागद पडले असावेत असा समज होऊन भाऊ ते आणण्याकरितां गेला असतां त्याच्यावर चोरीचा आळ येतो व त्यामुळें प्रसंगनिष्ठ विनोद उत्पन्न होऊन वाचकास मौज वाटते. ताईचा नवरा आजारी पडल्यामुळें ताई घरीं जाऊन भाऊला त्या हकीगतीचें पत्र लिहिते. त्या पत्राच्या पहिल्याच वाक्यानें भाऊप्रमाणें वाचकाच्या पुढें क्षणभर एक गूढ उत्पन्न होऊन त्याची जिज्ञासा वाढते व ताईच्या या अनपेक्षित वागण्यानें मनांत निरनिराळे विचार येऊं लागतात. “ मीं हें पत्र लिहिलें आहे तें आपल्या घरून; मी आपल्या घरीं आलें आहें. ” ह्या एका वाक्यानें वाचकाची जिज्ञासा कितीतरी वाढविली आहे.

कथानक चित्ताकर्षक करण्याची आणखी एक युक्ति म्हणजे अद्भुत प्रसंगांची योजना. अद्भुत प्रसंग आयुष्यांत क्वचित्‌च येत असल्यामुळें ते स्वाभाविकपणें चित्ताकर्षक होतात. हरिभाऊंनीं असे पुष्कळ प्रसंग

योजिले आहेत. रावजींच्या खोलींत आग उत्पन्न होऊन भाऊच्या जिवा-वर आलेला प्रसंग, पुढें सुंदरीच्या लग्नाचें भाऊला पडलेलें स्वप्न, 'समुद्र जितका शांत दिसतो तितका तो नसतो!' ह्या प्रकरणांतील ताई व भाऊ यांची कुंजांतील रात्रींची भेट, ताईला भाऊवर येणाऱ्या संकटाची सूचना देण्याकरितां झालेला आईचा दृष्टांत, हे प्रसंग अद्भुत असून सरस वठले आहेत. अशा प्रकारचे अद्भुत प्रसंग योजून कादंबरी चित्ताकर्षक करण्याची हरिभाऊंची नेहमींची पद्धति आहे.

प्रसंगनिष्ठ विनोद उत्पन्न करून कादंबरीला रंग आणतां येतो. कथानक-रचनेच्या दृष्टीनें असे प्रसंग योजणें व त्यांत स्वाभाविकपणा आणणें ह्यांत हरिभाऊंचें कौशल्य चांगलें निदर्शित होतें. भाऊचें रावजींच्या खोलींत अडकून पडणें, भाऊच्या शाळेच्या वर्णनांत भाऊचें व इतर मुलांचें वर्गांत भांडण चाललें असतांना त्या ठिकाणीं सर मास्तरांचें अनपेक्षित आगमन व त्यांचा प्रकोप, भाऊवर कवठांच्या चोरीचा आलेला आळ इत्यादि विनोदी प्रसंग फार सुंदर साधले आहेत. हें वाचीत असतांना वाचकांस हंसूं आल्यावांचून रहात नाहीं. असले विनोदी प्रसंग कादंबरीच्या पूर्वार्धांतच फारकरून आले आहेत. उत्तरा-र्धांत भावानंदाच्या चरित्रांतील गंभीर व करुणाजनक प्रसंग, त्याची लोककार्याची तयारी व त्यानें अविरतपणें केलेली लोकसेवा हे भाग आल्या कारणानें त्यांत विनोदाला अवकाश रहात नाहीं. शिवाय भावानंदाच्या चरित्राचा हा उत्तरार्ध वाचीत असतांना वाचकही विनोदाचा रसास्वाद घेण्याच्या मनःस्थितींत नसतो.

स्थळ प्रत
सं. निबंध...
ता. २४।...
टा नों.

भाग तिसरा.

# पात्रयोजना व स्वभावनिदर्शन

## १ पात्रयोजना.

कादंबरी मनोरंजक होण्यास पात्रांची योजना व त्यांचें स्वभाव-निदर्शन हीं योग्य प्रकारें व्हावीं लागतात. तत्त्वविवेचनाच्या किंवा लोकशिक्षणाच्या हेतूनें कादंबरी लिहीत असतांना कादंबरीकाराचें काम अधिक कठिण होतें. कथानकरचनेप्रमाणेंच पात्रयोजनाही मनोरंजन व शिकवण हे दोन्ही हेतू सिद्धीस जातील अशी करावी लागते. प्रस्तुत कादंबरींत हें पात्रयोजनेचें व स्वभावनिदर्शनाचें काम कसें पार पडलें आहे तें पाहूं.

'मी' कादंबरीची मुख्य शिकवण देशाची अनेकांगीं सुधारणा होण्यास स्वार्थत्यागाची अवश्यकता असते ही आहे. ती मनावर पूर्णपणें बिंबेल अशी पात्रांची योजना कशी झाली आहे हें पहाण्यासारखें आहे. कथानायक भावानंद याच्या स्वभावाचा विकास होत होत तो शेवटीं अत्यंत त्यागी बनून आपल्या पंथाकरितां अविरत श्रम करून प्राण अर्पण करतो. त्यागाचें हें मध्यवर्ति तत्त्व भावानंदाच्या विचारांत व कृतींत गोंवून त्याच्याचकडून आत्मचरित्राच्या रूपानें वदविल्यामुळें तें वाचकाच्या मनावर चांगलें बिंबतें. भावानंदाच्या मनांत आरंभीं या त्यागी वृत्तीचा विचार उत्पन्न होऊन त्याचा विकास होत होत तो दृढ कसा झाला, व पुढें कृतींत कसा उतरला, त्याच्या या विचाराला उपकारक व विरोधक परिस्थिती कशा निर्माण झाल्या वगैरे स्वाभा-

विकपणें मनांत येणारे प्रश्न कल्पून ते चांगले सोडवितां येतील अशीं इतर पात्रें हरिभाऊंनीं निर्माण केलीं आहेत.

भाऊला आपल्या जीवनक्रमांत ज्या व्यक्तींत वावरावें लागतें व ज्यांच्या विचारांचा आणि कृतींचा त्याच्यावर बराबाईट परिणाम होतो, त्या व्यक्तींची योजना कां केली आहे, याचा थोडक्यांत विचार करूं. भाऊची भूमिका सर्वतोपरि तयार करण्यास शिवरामपंतांचा फार उपयोग होतो. किंबहुना या उत्कृष्ट गुरूशिवाय भाऊचा भावानंद झालाच नसता, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. चित्ताकर्षकतेच्या दृष्टीनें विचार केला, तरी या थोर पुरुषाच्या निर्मितीनें सुसंस्कृत वाचकांचें चांगलें मनोरंजन होणारें आहे. याचा सविस्तर विचार पुढें प्रसंगानुसार होईलच. भावानंदाच्या पंथाला दृढता आणण्यास रामानंदाचा उपयोग चांगला होतो. शिवाय रामानंदासारखे कांहीं सुशिक्षित तरुण अनुयायी भावानंदाला मिळाल्याकारणानें त्याच्या मठ-स्थापनेच्या पूर्वतयारीचें फल प्राप्त होऊन त्याला पुढील कार्यांत त्यांची मदत होते. शिवाय भावानंदाच्या मरणासन्नस्थितींतील व मृत्यूनंतरची हकीगत सांगण्यास एकाद्या भावानंदाच्या विश्वासांतील लायक व्यक्तीची जरूरी आहे. शिवरामपंत व ताई हीं कांहीं संन्यासाश्रमांत नेहमीं त्याच्याजवळ नसतात, तेव्हां हें कार्य त्यांच्या हातून घडविणें शक्य नव्हतें. भाऊचे वडील रावजी, त्याचे मामा व ताईचा नवरा यांच्यायोगानें प्रातिकूल परिस्थिति निर्माण होते, व चरित्र नायकाला गृहशिक्षण कसें काय मिळालें, त्याची घरची परिस्थिति कशी होती व तिचा एकंदर त्याच्यावर काय परिणाम झाला हें निद-र्शित करतां येतें. भाऊच्या मामांची केवळ विरोधक म्हणूनच योजना झालेली नाहीं. ते आपल्या परीनें जुन्या पिढींतील माणसांचें गुणदोष व त्यांच्या अडचणी भाऊच्यापुढें समतोलपणानें मांडतात. भाऊचे वडील रावजी यांचे कांहीं गुणदोष त्याच्यांत उतरले आहेत असें

दाखविलें आहे. या नादी व्यक्तीचा कादंबरीला स्वभावनिष्ठ विनोद उत्पन्न करण्याला चांगला उपयोग होतो, ताईच्या नवऱ्याची योजना भावानंदाच्या चरित्रांतील दुसरा धागा म्हणजे ताईचें चरित्र रंगविण्याकरितां झाली आहे. त्याच्या योगानें स्त्रियांची केविलवाणी, दीन, असहाय स्थिति, त्यांचें शिक्षणाच्या अभावीं होणारें नुकसान, पुरुषवर्गाची अरेरावी वगैरे सामाजिक दोष उत्कृष्ट दाखवितां आले आहेत.

स्त्रियांत मुख्य भाऊची बहीण ताई. भावानंदाच्या खालोखाल ताईचें पात्र महत्त्वाचें आहे. तिच्या चरित्रानें वर सांगितल्याप्रमाणें भावानंदाच्या चरित्रांतील दुसरा धागा तयार होतो, या मुख्य धाग्याला म्हणजे भावानंदाच्या एकंदर चरित्राला उठाव मिळतो, भाऊच्या स्वभावविकासाला मदत होते, व तिच्या अत्यंत हृदयस्पर्शी जीवनक्रमानें समाजांतील स्त्रीजीवनाचें अंतःकरणविदारक चित्र रंगवितां येतें. भावानंदाच्या आईचा उपयोग अंशतः रावजींच्यासारखाच घरची परिस्थिति उत्पन्न करण्याकडे होतो. बापाप्रमाणेंच आईचेही कांहीं गुण तिच्या मुलांत उतरले आहेत. यापेक्षां तिचा विशेष उपयोग ताईच्या जीवनक्रमाचा धागा रंगविण्यास चांगला झाला आहे. शिवरामपंतांची मुलगी सुंदरी हिचा भाऊच्या बालपणीं त्याच्या स्वभावास चांगलें वळण लावण्यास पुष्कळ उपयोग होतो. प्रत्यक्ष कार्य करण्यांत तिचें फारसें अंग नाहीं, तरी शिवरामपंतांचे शिक्षणाविषयींचे विचार आचारांत आणण्याला, व भाऊच्या मनांत प्रेमज्योति उत्पन्न करून व वाढवून पुढें त्याच्या स्वार्थत्यागाला उदात्त स्वरूप देण्याला ती उपयोगीं पडते. सुंदरीच्या शिवाय भावानंद व शिवरामपंत फिके पडले असते.

याप्रमाणें निरनिराळीं पात्रें कोणत्या हेतूंनीं योजिलीं आहेत याचा थोडक्यांत विचार झाला. प्रत्येक महत्त्वाचें पात्र विचारपूर्वक योजिलें आहे. विनाकारण लुडबुडणारें अशी एकही व्यक्ति नाहीं. प्रत्येक पात्राच्या

योगानें भावानंदाच्या चरित्राला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें मदत होते. ह्या पात्रांचें स्वभावनिदर्शन यापुढें येणार असल्याकारणानें पात्र-योजनेविषयीं अधिक विस्तार करण्याचें कारण नाहीं.

## २ स्वभावनिदर्शन

**भाऊ ऊर्फ भावानंद**

चरित्रनायक भाऊ ऊर्फ भावानंद हा लहानपणीं अतिशय अनिष्ट परिस्थितींत वाढलेला आहे. नादी व भटके वडील, अत्यंत कावलेली वअशिक्षित आई, आईप्रमाणेंच आजी, अशा परिस्थितींत घरीं शिक्षण मिळून भाऊला योग्य वळण लागण्याची आशा नव्हती. वडिलांचा नादीपणा मात्र त्यांच्यांत चांगला उतरला आहे. "लहानपणापणापासून माझ्या मनाची प्रकृतिच कांहीं चमत्कारिक ! जें एकदां करावयाचें असें मनानें घेतलें, तें करून टाकल्याशिवाय मनाला समाधान वाटावयाचें नाहीं," [1] असें तो स्वतःच सांगतो. लखोट्याच्या हकीगतींत त्याचा हा नादीपणा प्रथम दिसूं लागतो. आपल्या मामाच्या घरीं गेलेल्या सुंदरीला पत्र लिहिण्यांत, त्या पत्राचे कागद हरवले असतां त्यांचा शोध करण्यांत, प्रेसिडेंट गार्फील्डचें चरित्र संपविण्याकरितां एक दिवस शाळा बुडविण्यांत, ही नादीपणाची छटा चांगली दृष्टीस पडते. भाऊचा हा दुर्गुण शेवटपर्यंत नाहींसा होत नाहीं, परंतु सुदैवानें शिवरामपंतांच्या सान्निध्यानें मनांत सद्विचार उद्भवून त्याला चांगलें वळण लागतें. पुढें लोकसेवेचें व्रत घेऊन ज्ञानप्रसार व लोकहित साधण्याकरितां त्यानें जिवाकडे न पहातां कसे अविरत श्रम केले हें पाहिलें म्हणजे वरील विधानाचें प्रत्यंतर येतें. मनुष्याच्या अंगांत अशा प्रकारचा थोडासा नादीपणा असल्याशिवाय त्याच्या हातून महत्कार्य फार करून घडत नाहीं.

---

१ पृ. १३.

घरच्या परिस्थितीमुळें भाऊला कांहीं दिवस गृहशिक्षण असें मिळालेंच नाहीं. आई नेहमीं दुःखीकष्टी व वैतागलेली असल्याकारणानें त्याला मातृप्रेमही लाभलें नाहीं. तिनें त्याला नेहमीं 'अपयशी,' 'पांढऱ्या पायाचा' असें म्हणावें व हिडीस पिडीस करावें. त्याला घरीं सुख किंवा लाड कधीं माहीत नव्हते. रीतीप्रमाणें भाऊ एका तात्यापंतोजीच्या गांवठी शाळेंत जाऊं लागतो. त्या शाळेचें व तेथील शिक्षकांचें वर्णन वाचलें म्हणजे त्याच्या शिक्षणाची प्रगति कशी झाली असेल याचा सहज अंदाज होतो. याप्रमाणें घ रीं दारीं सर्वस्वीं अनिष्ट स्थितींत भाऊ वाढत असतांना जर सुदैवानें योगायोग येऊन शिवरामपंत व त्यांची मंडळी यांचें सांनिध्य त्याला प्राप्त झालें नसतें, तर भाऊचा जीवनक्रम कसा झाला असता हें सांगणें कठिण नाहीं. 'मनुष्य परिस्थितीचा दास असतो,' ह्या विधानांत सर्वस्वी नसलें तरी विचार केल्यास पुष्कळसें सत्य आहे यांत शंका नाहीं. परिस्थितीला उत्पन्न करणारे पुरुष विरळा.

भाऊचें शिवरामपंतांशीं सांनिध्य आणण्यांत हरिभाऊंनीं मोठी कुशलता दाखविली आहे. पुढें त्याच्या कार्याला शिवरामपंतांची शिकवण व विचार फार उपयोगीं पडावयाचे असल्यामुळें त्यांच्याविषयीं भाऊच्या मनांत प्रेम व आदर जितकीं अधिक उत्पन्न होतील तितकीं चांगलीं. ह्या भावना उत्पन्न होण्यास रावजींच्या खोलींत सुंदरी व तिची आई यांच्या आणि भाऊच्या झालेल्या भेटीनें भाऊची मनोभूमि तयार होते. सुंदरीच्या आईचा प्रेमळ स्वभाव, तिचें सुंदरीशीं लाडाचें व कौतुकाचें भाषण, त्याबरोबरच त्याच खोलींत त्याच वेळीं स्वतःच्या आईच्या वागण्यांतील कठोरपणामुळें उत्पन्न होणारा विरोध, हीं त्याच्या मनावर फार परिणाम करतात. त्याच्या मनांत सुंदरीविषयीं स्नेह व शिवरामपंतांच्या एकंदर कुटुंबाविषयीं आवड उत्पन्न होते. पुढें योगायोगानें हें कुटुंब पुण्यास त्याच्याच घरांत बिऱ्हाडानें राहण्यास येतें. तेथें त्याचा व शिवरामपंतांचा परिचय वाढत जातो. पहिल्या दिवशींच सुंदरीची

आई सुंदरीला वाचायला शिकवीत आहे, हें पाहून त्याला फार आश्चर्य वाटतें. सुंदरीला वाचतां येतें, आपल्याला येत नाहीं, हें पाहून त्याचें मन ओशाळतें व आपणही लिहिण्यावाचण्यास शिकावें असें त्याच्या मनांत येतें. ह्या सर्व कारणांनीं भाऊच्या स्वभावाला अगदीं निराळें वळण लागून त्याच्या मनावर फार चांगला परिणाम होतो. एक दिवस सुंदरीच्या त्याला आईजवळ त्याची गोष्ट वाचून झाल्यावर सर्व मंडळी उठणार, इतक्यांत त्याला स्वप्नमय अवस्थेंतून प्रत्यक्षांत आणण्याकरितांच कीं काय, त्याची आई 'हा कुठें जाऊन बसला आहे ग कारटा ?' असें म्हणत त्याला ओढीत घेऊन जाते. येथेंही दोन आयांतील विरोध समोरासमोर दृष्टीस पडल्यानें हा परिणाम दृढ होण्यास मदत होते. ह्या दिवसाचा उल्लेख करतांना भावानंद म्हणतो, " तो दिवस माझ्या आयुःक्रमांत अत्यंत महत्त्वाचा होय असें मी समजतों. माझ्या आयुःक्रमरूप पुस्तकाचें प्रारंभींचेंच परंतु एक नवें खंड त्या दिवसापासून सुरू झालें."[1]

अशा रीतीनें भाऊला यापूर्वीं कधीं न मिळालेले गृहशिक्षणाचे प्रेमळ धडे मिळूं लागतात. शिवरामपंतांचेही मनांत त्याच्याविषयीं प्रेम-उत्पन्न होऊन ते त्याच्या अभ्यासाची चौकशी करून त्याला मोठ्या कुशलतेनें उपदेश करतात. त्यांचा प्रेमळ उपदेश व अनुकरणीय टिपींचा दिनक्रम ह्यांचा भाऊच्या मनावर वरच्याप्रमाणेंच चांगला परिणाम होऊं लागतो. ह्या स्वभावविकासाला सुंदरीचीही मदत होते. तिच्याविषयीं त्याच्या मनांत स्नेह असल्याकारणानें कोणतीहि गोष्ट करतांना ती काय म्हणेल, हा प्रश्न त्याच्या मनांत येतो, व त्यामुळें त्याचे हातून वावगें असें वर्तन होत नाहीं. त्याच्या आईला सुद्धां हें स्वभावपरिवर्तन दिसूं लागतें. एक दिवस ती आपल्या आईशीं भाऊविषयीं बोलत असतांना म्हणते, " पोरगं भारी निवळलं ! असं तें निवळेल हें मला कधीं वाटलं

1 पृ. ७८.

नव्हतं. या शिवरामपंतांच्या शिकवणीचं हें फळ बरं ! फारच चांगला गृहस्थ. आतांशा त्याची एक एवढी कुरकूर नसते कीं कांहीं नाहीं ! सारा दिवस आपला वर असतो. आणखी ती पोरगी अगदीं..........." इतकें ती बोलते, तों तिचें लक्ष भाऊकडे जातें व किंचित् हंसून व त्वेषाचा आविर्भाव करून ती त्याला म्हणते, " मेल्या ! आडून उभा राहून बोलणीं ऐकतोस का ? दम धर आतां........"[१] सुंदरीच्या सद्गुणांमुळें व तिच्यावरील प्रेमामुळें भाऊला तिला नापसंत होणारी कोणतीही गोष्ट करणें जिवावर येतें. तिला लिहिलेल्या पत्राचे हरवलेले कागद ताईला वाचतांना पाहून भाऊ तिला संतापानें चपराक मारतो. त्यावेळीं, " भाऊ, तूं फार चांगला, फार चांगला म्हणून सुंदरी नेहमीं म्हणते तो असाच का रे चांगला ?"[२] असा ताईनें प्रश्न करतांच त्याचा जादूसारखा परिणाम होऊन त्या दिवसापासून तो तिच्यावर जिवाभावानें प्रेम करूं लागतो. आपलें लग्न आई हट्टानें करणार असें दिसल्यावर ताई शिवरामपंतांना एक पत्र लिहिते व तें न वाचतां त्यांना देण्यास भाऊला सांगते. त्यावेळीं सुद्धां मोहाला बळी पडून तो तें पत्र उघडून वाचणार, इतक्यांत त्याला ' सर्व पापापासून वेळींच सोडविणारी सुंदरीची सुंदर मूर्ति '[३] दारांत उभी असलेली दिसते, व तो तें पत्र वाचण्यापासून परावृत्त होतो. ह्या गोष्टींवरून सुंदरीच्यामुळें भाऊच्या स्वभावावर व वर्तनावर किती चांगला परिणाम होतो हें दृष्टीस पडतें. शिवरामपंतांच्या शिकवणीनें भाऊचा भावानंद झाला हें खरें, परंतु त्याची नैतिक उन्नति अंशतः सुंदरीमुळें झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

भाऊच्या जीवनक्रमाच्या पूर्वार्धांत त्याच्या स्वभावविकासाला अनुकूल व प्रतिकूल अशा दोन भिन्न भिन्न परिस्थिती कादंबरीकारांनीं

१ पृ. ८४; २ पृ. १०६; ३ पृ. १२९.

निर्माण केल्या आहेत. एक भाऊची आई, आजी, वडील वगैरे घरच्या मंडळींच्या योगानें उत्पन्न झालेली, व दुसरी शिवरामपंतांच्या कुटुंबाच्या सांनिध्यानें उत्पन्न झालेली. स्वतांच्या घरचें वातावरण त्याला सर्वस्वीं प्रतिकूल. आईचें व इतर मंडळींचें ताईवर फार प्रेम, त्याच्यावर 'म्हणण्याजोगें प्रेम कोणाचेंच नव्हतें. "[१] आईच्या खाष्ट स्वभावानें तर तो एक दिवस इतका त्रासून जातो कीं, "आपण येथें रहावें तरी कशाला ? जावें कोठें तरी "[२] असा विचार त्याच्या मनांत येतो व अप्राप्तकालींच त्याला परिपक्वता आल्यासारखें होतें. शाळेंतील एका प्रसंगाविषयीं लिहितांना तो म्हणतो, "(माझ्या) एकंदर चरित्रांत जी एक कृष्णछाया सदोदित दिसेल तिचा आरंभ या आजच्या दिवसापासून झाला. ही कृष्णछाया माझ्या चरित्रावर कशी पडत चालली आणि शेवटीं तिचें पर्यवसान कसें कोठें झालें, हें आजच सांगतां येत नाहीं. "[3] ही कृष्णछाया उत्पन्न होण्यास भाऊची घरची परिस्थितिच पुष्कळशी कारणीभूत होते. ह्याचा असा परिणाम होतो कीं, शिवरामपंतांच्या कुटुंबांतील मंडळी त्यांच्या प्रेमळ वागणुकीनें त्याला आपलीशी वाटूं लागतात.

आईच्या खाष्ट स्वभावामुळें भाऊ इतका त्रासला होता, तरी त्याचें आपल्या आईवर प्रेम नव्हतें असें मात्र नाहीं. आई कशीही असली तरी प्रत्येकाला प्रिय असते. त्यांत भाऊला आपली आई परिस्थितीनें कशी वैतागली आहे हें दिसत होतें. बाह्यतः तिचें वर्तन कठोर असलें, तरी आपल्यावर व ताईवर तिचें फार प्रेम आहे ह्याची त्याला जाणीव आहे. तिच्यामध्यें करारीपणा वगैरे कांहीं सद्गुण आहेत हेंही तो जाणून आहे. ह्यामुळें त्याचें आईवर फार प्रेम असून तिच्या मृत्यूनें त्याला फार दुःख होतें. त्याचें आपल्या बहिणीवर पूर्वींपासूनच

१ पृ. ६६; २ पृ. ७०; ३ पृ. ६२.

प्रेम असतें. तशांत आईच्या मुखावाटें मृत्यूसमयीं, " भाऊ, भाऊ, तिला अंतर देऊं नको. ती अगदीं........अंतर दिलंस ........अकल्याण ........वाटेल तसं कर........"[1] असे शब्द बाहेर पडल्यावर तिच्या प्रेतावर हात ठेवून त्याप्रमाणें वागण्याची, भिक्षा मागून पोट भरण्याची पाळी आली तरी ताईचें पोट भरण्याची, व कोणालाही हार किंवा शरण न जातां घरच्या किंवा बाहेरच्या कुठल्याही माणसाची पर्वा न बाळगतां तिच्याप्रमाणेंच सत्य सत्य अशा मार्गानें वागण्याची तो शपथ घेतो.

भाऊच्या एकंदर स्वभावविकासाला शिवरामपंतांचें सर्वच कुटुंब कारणीभूत होतें हें खरें, तथापि त्याच्यांत नैतिक गुण व उच्च भावना उत्पन्न करून त्याच्या विचाराला योग्य दिशा लावण्याला व त्याला कार्यक्षम करण्याला जर कोणाची सर्वांत अधिक मदत होत असेल तर ती शिवरामपंतांची. तेच त्याला भावानंदाच्या वंद्य पदवीप्रत आणून पोंचवितात. सत्यप्रियता, विचारीपणा, निश्चय, ज्ञानलालसा, देश-हिताची कळकळ, अविरत उद्योगप्रियता, त्याग इत्यादि अनेक गुण त्याला त्यांच्याच शिकवणीनें प्राप्त होतात. शिवरामपंत स्वतां त्याला प्रथम उपदेश करतांना, " भाऊ, तूं हुशार, चाणाक्ष असा आहेस. तुला मीं कांहीं गोष्टी जर सांगितल्या, तर त्या तुला समजतील; नाहीं असं नाहीं, "[2] असें सांगतात. ह्या उपदेशानें भाऊचें अभ्यासाकडे लक्ष लागून फार हुशार विद्यार्थी म्हणून त्याची शाळेंत ख्याति होते. शिव-रामपंतांच्याकडून वाचनाची दिशा समजल्यामुळें थोर कर्त्या पुरुषांचीं चरित्रें वगैरे कार्यक्षम करणारे व विचारप्रवर्तक ग्रंथच तो वाचतो. पुढें या वाचनाचा त्याला समाजांत ज्ञानप्रसार करतांना फार उपयोग होतो. भाऊचें वर्तन नेहमीं भावनापूर्ण तथापि विचारशुद्ध असें असतें.

---

१ पृ. १९९; २ पृ. १५५.

त्याचा करारी स्वभाव वाखाणण्यासारखा आहे. मामा व रावजी ताईला सासरीं जाण्याविषयीं निक्षून सांगत असतां, तो त्यांना करारीपणानें, ' ती साफ सासरीं जाणार नाहीं, ' असें सांगतो. त्या वेळचीं त्याचीं त्यांना उद्देशून केलेलीं भाषणें स्वभावसूचक आहेत. तो इतका करारी व भावनावश असला, तरी नेहमीं विचारानें वागतो. " जरूर पडल्यास दारिद्र्यावस्थेंत राहून तुझें रक्षण करीन, " असें जरी तो ताईला सांगतो, तरी हट्टास न पेटतां, " तूर्त मामा आपल्या गांवीं तुला बोलावताहेत तर जाण्यास हरकत नाहीं, तेंच बरें; " असा पोक्त सल्ला तिला देतो. पुढें भाऊनें एल्एल्., बी. होऊन बिऱ्हाड थाटल्यावर त्याची आजी ह्या बहीणभावंडांची कानउघाडणी करण्याकरितां त्याच्या घरीं येते, तेव्हां सुद्धां शक्य तितक्या सामोपचारानें तिची समजूत घालण्याचा तो प्रयत्न करतो, व शेवटीं नाइलाजानें त्याला निकरावर यावें लागतें. रावजींचा फेरा पुण्यास येऊन ते ताईला नवऱ्याच्या घरीं जाण्यास सांगतात, तेव्हांही त्याचें वर्तन असेंच असतें. भाऊचा हा करारीपणा पुढें ज्ञानप्रसार व लोकहित करीत असतांनाही दिसून येतो. व्याख्यानें देत असतांना जरी प्रथम प्रथम त्याची कोणीं टर उडविली, किंबहुना मारहाणीपर्यंत मजल आली, तरी तो आपला कार्यक्रम सोडीत नाहीं. त्या वेळीं त्याचें मन स्वाभाविकपणें कांहींसें निरुत्साही होतें हें खरें; परंतु तो निश्चयानें आपला क्रम चालू ठेवतो. हा निश्चयी स्वभाव पुढें वाढत जाऊन त्याला उदात्त स्वरूप येतें. विचाराच्या व उत्साहाच्या भरांत स्फूर्ति उत्पन्न होऊन भाऊला नवीन संन्यासपंथाची कल्पना सुचते व इतक्यांत शिवरामपंत व ताई तेथें येतात. त्या वेळीं तो, " माझ्या मनांतील अति उदात्त विचार हातानें पार पाडण्याचा मी तुमच्या दोघांच्या समक्ष संकल्प करतों. त्या संकल्पांत अणुमात्र व्यत्यय होणार नाहीं, अशाबद्दलचे तुमचे दोघांचे पायच साक्षी. तुम्हीं

दोघेंही मला गुरु, मला वडील ! ”[1] अशी शपथ घेतो, व त्याच क्षणीं शिवरामपंतांनीं सुंदरीच्या लग्नाची गोष्ट आपण होऊन काढली असतां तितक्याच निश्चयानें लग्न करण्याचें नाकारतो. सुंदरीच्या विषयीं त्याच्या मनांत अत्यंत प्रेम असल्यामुळें ही सूचना क्षणमात्र अगोदर झाली असती तर त्यानें तिच्याशीं लग्न केलें असतें. परंतु शपथ घेतली तेव्हां ती निश्चयानें पाळलीच पाहिजे असें मनांत आणून तो लग्न करण्याचें नाकारतो. अगदीं शेवटीं संन्यास घेऊन मठस्थापना केल्यानंतर आसन्नमरण झाला असतांनाही भावानंद आपला अविरत श्रम करण्याचा निश्चय कायम ठेवून त्याप्रमाणें वागतो; रामानंदाचें मुळीं सुद्धां ऐकत नाहीं. ज्ञानप्रसाराकरितां व्याख्यानें देणें, लोकांना औषधोपचार करणें, त्यांच्या अडीअडचणी पाहणें, वेळांत वेळ काढून ग्रंथलेखन करणें, ह्या सर्व गोष्टींवरून अविरत श्रम करण्याचा त्याचा निश्चय शेवटपर्यंत कसा कायम होता हें दृष्टीस पडतें.

भाऊला तीन व्यक्ती अत्यंत प्रिय होत्या. त्यांच्यामुळेंच त्याच्या स्वभावाला योग्य वळण मिळून तो कार्यक्षम व कर्तृत्ववान निघाला. ह्या तीन व्यक्ती म्हणजे सुंदरी, शिवरामपंत व ताई. मुंबईच्या प्रथम भेटीपासूनच भाऊच्या बालमनांत सुंदरीविषयीं उत्पन्न झालेल्या स्नेहांतच प्रौढपणांतील शुद्ध, सात्त्विक प्रेमाचें बीज होतें. एकदां प्रसंगानें ह्या प्रेमाविषयीं बोलत असतां तो म्हणतो, “ ज्याप्रमाणें या संसाररूप खेळांत त्याचप्रमाणें आमच्या या पोरखेळांतही प्रेमपाश हा कांहीं जरूर असतोच. प्रेम म्हणजे कामप्रेरित असेंच असलें पाहिजे असा ज्यांचा समज असेल त्यांचा खुशाल असो. परंतु माझा स्वतांचा असा अनुभव आहे कीं, अकारण प्रेम म्हणून या मानवी अनुभवांत आहेच आहे. ” ह्या शब्दांत त्याची प्रेमाची उच्च व उदात्त कल्पना पहावयास सांपडते.

---

१ पृ. ३६९.

तो आपल्या प्रेमाचा स्पष्टपणें असा केव्हांही उच्चार करीत नाहीं. नाहीं म्हणायला एकदां ताईच्याविषयीं सुंदरीचें म्हणणें काय आहे तें पाहण्याकरितां तो तिच्या घरीं जातो व तिला पाहून "सुंदरीचें स्वरूप आतां तिचे तारुण्यामुळें विशेष बहारीचें दिसूं लागल्यामुळें माझें मन किंचित् आकृष्ट झालें" असें कांहींसें संकोचानें वाचकास सांगतो. तथापि त्याचें सुंदरीवरील प्रेम किती निःसीम होतें तें तिच्याशीं लग्न करावें किंवा शपथ पाळावी असा त्याच्या मनांत झगडा चालला असतां उत्तम दिसून येतें. त्या वेळेस तो शिवरामपंतांस म्हणतो, "जी गोष्ट आपण माझ्याजवळ काढली, ती गोष्ट मला किती प्रिय आहे, ती गोष्ट घडावी असा माझा किती हेतु होता, हें एक माझ्या स्वतःच्या अंतःकरणाखेरीज कोणाला कळण्याचा संभव नाहीं."[१] त्याच प्रश्नाचा आपल्याशीं विचार करीत असतां तो म्हणतो "माझें एक मन म्हणतें, आजपर्यंतच्या तुझ्या सर्व आशांचें स्थान तुला लाभतें आहे, तें स्वाधीन करून घे. तूं जें देशसेवेचें व्रत आचरणार म्हणतोस त्याच्या आड तें येणार नाहीं."[२]

भाऊचें आपल्या बहिणीवरचें प्रेम असेंच निःसीम होतें. त्याच्या मनांत तिच्या विषयीं पूर्ण आदर वास करीत होता. हें प्रेम प्रथम कसें उत्पन्न झालें, त्याला सुंदरीच्या नांवाची जादू कशी उपयोगीं पडली ह्याचा उल्लेख पूर्वींच आला आहे. एकदां ज हें प्रेम उत्पन्न झालें तें अनेक कारणांनीं एकसारखें वाढतच चाललें. लग्नाच्या वेळची व नंतरची ताईची असहाय स्थिति, आईचे शेवटचे शब्द व भाऊनें स्वतां आईच्या प्रेतावर हात ठेवून घेतलेली शपथ, यांनीं ह्या प्रेम वृद्धीला फार मदत झाली. ताईच्या ह्याच असहाय स्थितींत व पुढें ती लोकाशिक्षणाचें काम करूं लागल्यावर तिचे सद्गुण त्याच्या दृष्टीस

---

१ पृ. ३७५; २ पृ. ३७६.

अधिक अधिक पडूं लागले व तिच्या विषयींचा आदर वाढूं लागला. ताईची कर्तृत्वशक्ति व सच्छील यांबद्दल त्याला पूर्ण विश्वास आहे.

शिवरामपंतांच्या विषयीं भाऊला वाटणाऱ्या आदराला सीमाच नव्हती. अगदीं लहानपणापासून शेवटपर्यंत त्याच्या स्वभावाला व विचाराला त्यांच्याकडून वळण मिळालें होतें. कोणतीही गोष्ट तो त्यांना विचारल्यावाचून करीत नाहीं. त्यांनीं सुंदरीशीं लग्न करण्याची इच्छा प्रदर्शित केल्यावर ती मोडण्याचें त्याच्या जीवावर येतें. एकीकडे सुंदरीवरील व शिवरामपंताविषयीं प्रेम व दुसरीकडे निश्चयानें ताईच्या व त्यांच्या पायांवर हात ठेवून घेतलेली शपथ. या पेंचांत तो सांपडतो. ह्या प्रसंगीं त्याची सत्यप्रीति कसोटीला लागते.

भाऊच्या मनांत उत्कट भावना व विचार हीं दोन्हीं वेळोवेळीं पहावयास सांपडतात. कर्त्या पुरुषांत उत्कट भावना असल्याशिवाय तो कामाला लागावयाचा नाहीं, व विचार असल्याशिवाय त्याचें काम योग्य दिशेनें व्हावयाचें नाहीं. भाऊच्या उत्कट भावना लहानपणापासूनच दृष्टीस पडतात. आजीबरोबर लग्नाला गेला असतांना तेथील सर्व लग्नविधि पाहून आपलेंहीं सुंदरीशीं लग्न व्हावें अशी त्याला इच्छा होते. आजीला 'माझें लग्न कधीं करणार' ? म्हणून तो विचारतो व शेवटीं रात्रीं त्याला सुंदरीच्या लग्नाविषयीं एक स्वप्न पडून त्याचा विचार करतांना तो म्हणतो, "लहानपणापासून माझे विकार फार प्रबल व अनावर असत. कोणत्याही गोष्टीविषयीं राग, द्वेष, लोभ, प्रेम, उत्सुकता इत्यादिकांची उत्पत्ति मनांत झाली पुरे, कीं मग मी त्या त्या विकारांच्या अधीन होऊन त्या गोष्टींच्या मागें लागलोंच म्हणून समजावें."[1] पुढें विनायकानें बालस्वभावानें आपलें सुंदरीशीं लग्न ठरल्याचें सांगतांच भाऊ त्या एकाच विचारानें जागृत होऊन

१ पृ. ९०.

आजारी कसा पडतो हें सांगितलेंच आहे. तसेंच नवरा आजारी पडल्याकारणानें ताई एकाएकीं आपल्या सासरीं गेल्याचें वर्तमान तिच्या पत्रावरून कळतांच राग येऊन उतावीळपणानें त्यानें तिला एक अद्वातद्वा पत्र कसें लिहिलें व त्याला त्याचा पुढें पश्चात्ताप कसा झाला हें वाचलें म्हणजे त्याच्या स्वभावाचा उतावीळपणा व्यक्त होतो. शिवरामपंतांनीं त्याच्याजवळ सुंदरीच्या लग्नाचा प्रश्न काढण्यापूर्वीं उत्कट देशसेवेच्या भावनेनें प्रेरित होऊन अविवाहित राहून संन्यासवृत्तीनें मठस्थापना करण्याची तो शपथ घेतो, तो प्रसंगही त्याच्या भावनावशतेचा निदर्शक आहे.

आपल्या आईची दुःखद परिस्थिति, ताईचे विवाहानंतरचे हाल, शिवरामपंतांचे सुंदरीविषयींचे विचार व त्यांनीं वेळोवेळीं केलेला उपदेश या कारणांनीं भाऊचे स्त्रियांच्या विषयींचे विचार फार कनवाळूपणाचे असत, व त्यांना शिक्षण देऊन त्यांची स्थिति सुधारली पाहिजे असें त्याला वाटे. स्त्रीशिक्षणाशिवाय समाजसेवेचें व लोकशिक्षणाचें ध्येय त्याच्यापुढें होतें. तो आपले समाजसेवेचे बेत शिवरामपंतांना सांगतांना म्हणतो, "माझे बेत कसले ? एकदां मला असं वाटलं होतं कीं, ताई, सुंदरी, अशा स्त्रियांचा, मी, तुम्ही आणखी माझ्या बरोबरीच्या एक दोघां स्नेह्यांनीं मिळून एक समाज स्थापून त्यांनीं फुकट शिक्षण देण्यास प्रारंभ करावा. ताई व सुंदरी यांनीं कोणा निराश्रित विधवांस वगैरे शिकवून तयार करून घरोघर जाऊन बायकांना शिवणकाम, लिहिणं वाचणं वगैरे शिकविण्यास सुरवात करावी. आम्हीं पुरुषांनीं राजकीय सुधारणा करण्याकरितां लेखांनीं व भाषणांनीं जितकी म्हणून मेहनत होईल तेवढी करावी."[1] आपले बेत कसे पार पडतील याविषयीं निराशापूर्ण मनानें विचार करीत असतांना तो म्हणतो,

---

१ पृ. २९३.

"जें काय पाहिजे तें हें कीं, सरकारी नोकरीवर अवलंबून न राहतां आपल्या पोटाला अगदीं जरूर तेवढेंच मिळवून आपल्या जन्मभूमीच्या उद्धाराकरितां आपला सर्व काळ घालवायचा. सरकारी नोकरींत कोणीं शिरू नये असें नाहीं. त्याही प्रांतांत शिरून जन्मभूमीची व आपल्या बांधवांची सेवा होतेच, पण त्याच्यापेक्षां उत्तम, त्याच्यापेक्षां अधिक श्रेयस्कर असा मार्ग काढला पाहिजे. माणसांना आपले हक्क, आपलें कर्तव्य व आपली ताकद समजून आली पाहिजे. राजा व सरकार हे लोकांच्या सुखाकरितां, लोक त्यांच्या सुखाकरितां नव्हेत; रीतीभाती आचारविचार हे लोकांच्या सुखाकरितां, लोक त्या रीतीभाती व ते आचारविचार यांकरितां नव्हेत. धर्म हाही लोकांकरितां, लोक धर्माकरितां नव्हेत. कोणचेंही सरकार, कोणचाही राजा, कोणच्याही रीतीभाती, आचारविचार किंबहुना धर्मसुद्धां लोकांच्या सुखा-आड येऊं लागला, कीं त्यांत फरक झालाच पाहिजे. तो जर योग्य तितका झाला तर चांगलें. योग्य काळीं योग्य तितका न झाला तर अनर्थकारक. असले विचार, असलें ज्ञान जाणत्या लोकांच्या मनांत भरवून देणें, हेंच आज आमचें कर्तव्य. तेवढें केलें, लोकांना आपल्या हक्कांचें ज्ञान करून दिलें, आपल्या सार्वजनिक सुखांतच व्यक्तिसौख्य किती गुरफटलें आहे हें समजावून दिलें, म्हणजे एका पिढीनें केवढें तरी काम केलें! असे विचार एकसारखे माझ्या मनांत घोळत असत."[1] तसेंच 'पुढें काय?' या प्रश्नाचा विचार करतांना तो म्हणतो, "आम्हांला राजकीय पारतंत्र्य, सामाजिक पारतंत्र्य, राजकीय कामांत आम्ही ब्रिटिश लोकांच्या आधीन, सामाजिक कामांत बहुजनसमाजाच्या आधीन. ...... ...... अधिकारी वर्गाला आपला अधिकार लोकांच्या सुपूर्त करण्याची फार दृढ अशी अनिच्छा. दुसरीकडून आपल्या

१ पृ. ३५३; ३५४.

पूर्वपरंपरागत समाजव्यवस्थेंत सुधारणा करण्याची बहुजनसमाजाला फार दृढ अनिच्छा; या दोन्हीही अनिच्छा कमी झाल्या पाहिजेत. त्या कशा होणार?"[१]

वरीलप्रमाणें देशाच्या प्रगतीविषयींचे विचार त्याच्या मनांत सारखे घोळत होते. शिवरामपंतांची शिकवण व स्वतांचें वाचन व विचार ह्यांचा हा परिणाम होता. पुढें हे विचार आचारांत कसे आणावेत याचा विचार त्याच्या मनांत सुरू झाला. या विचाराच्या ओघांत त्याच्या डोळ्यांपुढें त्याला मिशनरी लोकांचे आत्मत्यागाचे संघटित प्रयत्न दिसूं लागले व "हें आत्मत्यागाचें तत्त्व यांनाच कां दिसावें? यांनींच आत्मत्याग करून इतका खटाटोप करावा"[२] असा प्रश्न तो आपल्या मनाला विचारूं लागला. याचवेळीं एक स्फूर्तिकारक विचार मनांत येऊन जुन्या व नव्या पंथाचे लोक एकत्र करून एक नवा त्यागी पंथ–संन्यासीपंथ–स्थापण्याचा त्यानें निश्चय केला आणि ताई व शिवरामपंत त्याच्या खोलींत येतांच आपला संकल्प पूर्ण करण्याची त्यांचे पाय साक्षी ठेवून त्यानें शपथ घेतली. संन्यस्तवृत्तीपासून त्याला परावृत्त करण्याकरितां त्याचे मामा एक पत्र लिहितात. त्यांना उत्तरा-दाखल लिहिलेल्या पत्रांत त्यानें आपले विचार प्रकट केले आहेत. त्यावरून त्याचे विचार किती उदात्त व कळकळीचे होते हें समजतें. तो त्या पत्रांत मामांना लिहितो,[३] "मला कळूं लागल्यापासून म्हणजे आज सुमारें पांच साडेपांच वर्षांपासून–मला कोणी एक फारच उत्तम गुरु भेटल्यापासून–मीं एक धोरण राखलें–निदान राखण्याचा यत्न केला. तें धोरण सत्याचें होय. जी गोष्ट मला 'सत्य' वाटली तिचा व जी पूर्णपणें सत्य असून 'जनहिताची' वाटली तिचा अंगीकार करण्यास मीं कधींहि मागेंपुढें पाहिलें नाहीं.................ज्यावेळीं मी

१ पृ. ३५७; ३५८. २ पृ. ३६७. ३ पृ. ३९१.

प्रत सं. ........ नं. ........

नुसती प्रवेशपरीक्षा पास झालों, त्यावेळीं सत्याबद्दल व सत्प्रश्नाबद्दल जो माझा आवेश होता, तोच कायम राहिला. 'मृत्यु' कोणचें, 'सत्' कोणचें याबद्दल माझ्या मनाचा निर्धार झाल्यावर मग मी दुसरें मात्र कांहींहि पाहिलें नाहीं. "

पुढें भाऊनें आपल्या नवीन पंथाला सुरवात करून मठस्थापना केली, व 'भावानंद' हें नांव धारण केलें. या पंथांत त्यानें ज्ञान-प्रसाराकरितां व लोकहितांकरितां केलेले अविश्रांत श्रम त्याच्या स्वभा-वाला व विचाराला धरूनच होते. त्याचा पट्टशिष्य रामानंद त्याला वेळोवेळीं विश्रांति घेण्यास सांगत असतां त्यांनीं काढलेले उद्गार वाचण्यासारखे आहेत. तो म्हणतो "अजिबात विश्रांति! रामानंद! हा लोक विश्रांतीसाठीं नाहीं. विश्रांतीला परलोक सुविस्तीर्ण आहे."[1] पुढें रामानंदानें लिहिलेल्या त्याच्या चरित्रांतही असेच उद्गार निघा-लेले सांगितलें आहे. एकदां त्याच्या शेवटच्या आजारीपणांत रामा-नंदानें जरा रागावून, "आज तुम्हांला मी व्याख्यानाला कांहीं केल्या जाऊं देणार नाहीं. तुमच्या या करण्यानें तुम्ही आपल्याला लवकर मृत्यु मात्र आणाल " असें म्हटलें. त्यावर ते म्हणतात, "आला तर वाईट काय? गोठ्यांत तरफडून झिजून मरण्यापेक्षां नांगर ओढतां ओढतां बैल मेला तर वाईट काय?"[2] रामानंद पुढें लिहितो, "या महात्म्याची इच्छाशक्ति फार प्रबळ, त्याच्यासमोर आमची इच्छा-शक्ति किती तरी दुर्बळ! आमच्या इच्छाशक्तीचें काय चालणार?"[3] कोणीतरी भावानंदाजवळ सरकारी पदवीची, मानाची गोष्ट काढतांच तो स्फुरण चढून व त्यास म्हणतो, " पदवी! जागा! माझी सध्यांची पदवी काय कमी आहे! जागा! हल्लीं मी ज्या जागेवर आहें, ती जागा कमी मानाची आहे असं तुम्हांला वाटतं? धिक्कार असो तुम्हांला!

---

१. पृ ४०३. २ पृ. ४०७. ३ पृ. ४१२.

अहो, आपल्या देशाचा दास ही पदवी यःकश्चित् वाटते तुम्हांला ? देशाची सेवा करणारांची जागा तुम्हांला हलकी वाटते ? ही जागा ही पदवी हलकी वाटणं म्हणजेच आमचा हलकेपणा ! असलं काम हलकं वाटणं त्याच्या पलीकडे आणखी नष्टदशा ती कोणती ?"[1] शेवटीं वाताच्या भरांत भावानंद आपलें आयरिश देशभक्ताचें सणसणीत भाषण भडाभडा म्हणण्यास सुरवात करतो व त्यानंतर लॉंगफेलोचें 'जीवनस्तोत्र' ("Psalm of Life") इंग्रजींत मोठ्यानें पाठ म्हणतो. म्हणतां म्हणतां रामानंदालाहि "म्हणरे म्हण—" म्हणून आपण मोठ्यानें—

Let us then be up and doing;
With a heart for any fate.
Still achieving, still pursuing,
Learn to labour and to wait.

हें कडवें घोळून घोळून म्हणू लागतो. अगदीं अंत्यसमयीं रामानंद कष्टी होऊन, "भावानंद, आतां आमचं कसं होणार ? आपल्या मठाचं कसं होणार ?" असें त्यास विचारतो. त्यास या महात्म्यानें आपल्या क्षीण आवाजानें, "एक माणूस गेला म्हणून काय झालं ? एक शिपाई पडला, तर दुसऱ्यानं लगट केली पाहिजे,"[2] असें अत्यंत उत्साहदायक उत्तर दिल्यावर या थोर पुरुषाचा आत्मा शरीर व इहलोक यांस सोडून जातो ! "ती लोकहिताची कळकळ पुन्हां पहायला सांपडणार नाहीं. तें सहाय, तो उपदेश, ते परिश्रम, तो उत्साह, तो आवेश, ती एकनिष्ठता, यांपैकीं कांहींही दिसणार नाहीं," या रामानंदानें काढलेल्या शोकपूर्ण उद्गारांत भावानंदाचें किती उत्कृष्ट स्वभावनिदर्शन झालें आहे. भावानंदानें फावल्या वेळांत "राष्ट्राची उन्नति व अवनति-

---

१ पृ. ४१२. २ पृ. ४१५.

त्यांची मीमांसा व कारणें " या लिहिलेल्या ग्रंथाच्या नांवाबद्दल व त्यांतील विषयावरून त्याच्या मनांत नेहमीं कोणचे विचार घोळत असत तें सहज दिसून येतें. हरिभाऊंनीं भाऊच्या या काल्पनिक चरित्रांत नराचा नारायण कसा होतो हें मोठ्या कुशलतेनें दाखविलें आहे. त्याच्यांत हार्दिक, मानासिक व बौद्धिक गुणांचें अपूर्व मीलन झालें आहे. या थोर काल्पनिक महात्म्याचें चरित्र प्रत्येक तरुणानें आदर्श म्हणून आपल्यापुढें ठेवण्यासारखें आहे. एकव्या भावानंदाचाच विचार केला तरी सुद्धां प्रस्तुत कादंबरी फार उदात्त, विचारप्रवर्तक व मनोरंजक वाटेल.

**ताई**

'नायक', व 'नायिका' ह्या शब्दाचे रूढार्थ बाजूला ठेविले, तर प्रस्तुत कादंबरींत भाऊची बहीण ताई हिला नायिका म्हणण्यास हरकत नाहीं. भाऊपेक्षां सुमारें दीड वर्षानें ती मोठी आहे. ती स्वभावानें फार प्रेमळ आहे. भाऊवर तर लहानपणापासूनच तिचें प्रेम असतें. तिला भाऊ चावल्याबद्दल आई त्याला शिक्षा करण्याकरितां आली असतां ती मध्यें पडते व भाऊची शिक्षा वांचविते. भाऊप्रमाणें तीही प्रतिकूल परिस्थितींत वाढते. तथापि भाऊला पुरुषांच्या सहजसुलभ स्वतंत्रतेमुळें व शिवरामपंतांच्या सान्निध्यानें बिकट परिस्थितींतूनही मार्ग काढणें कांहीं अंशीं सुलभ जातें. स्त्रियांची परवशता ताईच्या मार्गांत अडथळा उत्पन्न करते. या कारणांनीं भाऊपेक्षां ताईची भूमिका अधिक करुणाजनक झाली आहे. वाचकाला भाऊपेक्षां तिची अनुकंपा अधिक वाटते. इतक्या अडचणींतूनही मार्ग काढण्यास एक गोष्ट तिच्या फार उपयोगी पडते. ती म्हणजे तिची शिक्षणाची हौस. सुंदरी व तिची आई यांच्या सान्निध्यानें ही आवड तिच्यांत प्रथम उत्पन्न होते, व पुढें वाचनाचा नाद लागल्याकारणानें तिला आपली उन्नति करून घेतां येते. शिवरामपंतांचा भाऊ व ताई या दोघांनाही

उपयोग होतो, परंतु ताईला भाऊच्या इतका उपयोग होत नाहीं.

ताईचा मुख्य गुण तिचा निश्चयी किंवा करारी स्वभाव. तो तिच्यांत लहानपणापासूनच दिसूं लागतो. तिची आई व आजी शिक्षणाला इतका विरोध करीत असतां, तिनें आपलें वाचन कांहींही झालें तरी चालूं ठेवण्याचा निश्चय केला होता; व तोच शेवटीं तिच्या उपयोगीं पडला. नवऱ्याच्या घरीं शक्य तों हाल सहन केल्यावर जेव्हां तेथें रहाणें असह्य झालें, तेव्हां पुनः सासरीं न जाण्याचा तिनें निश्चय केला. मग खुद्द तिचा नवरा येऊन त्यानें धाकदपटशा दिला, मामांनीं आई वारल्यावर आग्रह केला, वडिलांनीं रागें भरून तेंच सांगितलें, तथापि तिनें आपला निश्चय कायम ठेविला. पुढें स्त्रियांना शिकविण्याचें काम अंगावर घेतल्यावर, जरी स्त्रियांना शिकविण्याकरितां त्यांच्या घरीं गेल्यावर अपमान सोसावा लागून तिचें मन निराश होई, तरी तिनें आपला क्रम निश्चयानें चालविला. तिच्यांत करारीपणाप्रमाणेंच सहनशीलता वास करीत होती. अगदीं नाइलाज होऊन निकरावर गोष्ट येईपर्यंत ती गम खात असे. भाऊप्रमाणेंच ताईही अकालीं पोक्त झालेली आहे. विशेषेंकरून आईनें आपलें एका वृद्ध विधुराशीं लग्न करून टाकण्याचें ठरविलेलें कळतांच, तिला पोक्तपणाचे विचार सुचूं लागतात. ती सुंदरीला म्हणते, "नाहींतर काय ग ? येवढ्या थेरड्याशीं लग्न करण्यापेक्षां तुझे दादा म्हणतात तें कितीतरी चांगलं. पण काय करूं ? आई तें करणार. सुंदरे, तिला वाटतं कीं मला कांहीं समजत नाहीं; पण मला काय वाटतं, आणि काय नाहीं, तें माझं मला ठाऊक !"[१] सुंदरीचें व तिचें भाषण चालूं असतां भाऊ तेथें येतो व त्यांना 'काय बोलतां' म्हणून विचारतो. तेव्हां ती पोक्तपणानें म्हणते, "तुला सांगून काय उपयोग ? मी

१ पृ. ११२.

म्हणणार तें पुरतं तुला समजायचंसुद्धां नाहीं."[1] या वेळीं तिच्या स्वभावांत झालेला पालट भाऊनें फार चांगला वर्णन केला आहे. तो म्हणतो, "ते दिवशींच्या प्रकारापासून ताईच्या आजपर्यंतच्या व्यक्तित्वांत अत्यंत अंतर पडलें........ते दिवसपर्यंत ती बाल होती; दुसरे दिवशीं ती अंथरुणावरून उठली ती प्रौढच झाली....सदैव ती विचारमग्न व चिंतामग्न दिसे. बोलण्याचालण्यांतच ती जणूं काय आपल्या स्वाभाविक अंतरुद्रेकास दाबदाबून बसवीत आहे काय? मनोनिग्रहाचा धडा पाठ करण्यासाठीं तिची धडपड चालूं झाली काय? इतका पोक्तपणा, इतकी शांतता, इतकी स्तिमितता तिला एकाएकीं आली कशी?"[2] ह्या शब्दांत लग्नाच्या प्रश्नानंतर ताईच्या मनाचा झालेला बदल फार सुंदर वर्णन केला आहे. आपल्या स्वतःच्या भावी जीवनाचें चित्र तिला स्पष्ट दिसत होतें. तेच विचार तिच्या मनांत घोळत होते. अशा स्थितींत जर अकालीं पोक्तपणा आला तर त्यांत नवल तें काय? उपवर मुलींची अत्यंत करुणास्पद स्थिति तिनें भाऊजवळ मोजक्या सहाच शब्दांनीं वर्णन केली आहे, परंतु त्या वाक्यानें माणसाचें अंतःकरण पिळवटून जाईल! ती भाऊप्रमाणें आपल्याला वाटेल तेव्हां सुंदरीच्या घरीं जातां येणार नाहीं हें सांगतांना म्हणते, "बाबारे, आम्ही घरांत बांधलेलीं मुकीं जनावरें!" या एका हृदयस्पर्शी व अर्थपूर्ण वाक्यानें आपल्या समाजांतील स्त्रियांची असहाय, केविलवाणी स्थिति पूर्णपणें वर्णिली आहे.

नवऱ्याला बाहेरख्यालीचा नाद असल्यामुळें ताईला अत्यंत हाल व अपमान सोसावे लागतात. तथापि शक्य तों आपली सासरची स्थिति माहेरीं कळूं नये अशी तिची इच्छा असते. अगदीं असह्य थराला गोष्टी पोंचल्या, तेव्हां ती माहेरीं येते. नवरा धाकदपटशा

१ पृ. ११४, २ पृ. ११५.

दाखवून घरीं येण्याविषयीं सांगू लागतो, त्यावेळीं तिनें त्याला दिलेलें उत्तर स्वभावनिदर्शक आहे. ती त्याला म्हणते, "येत नाहीं! येत नाहीं! येत नाहीं! घरीं आपले सोहाळे काय काय होतात आणखी आपला छळ काय होतो, हें आईला कळूं नये म्हणून मी आतांपर्यंत एक शब्दसुद्धां बोललें नाहीं आणि बोलणार नव्हतें, पण तसं कुठलं व्हायला! माझ्या जिवाबरोबर तिच्याही जिवाला दुःख दिल्याखेरीज तुम्ही कोठले सोडायला! जन्मजन्मांतरींच वैर साधायचं होतं म्हणून तर हें सगळं घडलं." या एका उत्तरांत तिचा करारी व विचारी स्वभाव, नवऱ्याचा अत्यंत तिटकारा व मनाला होणाऱ्या यातना किती स्पष्ट प्रतिबिंबित झाल्या आहेत?

ह्या दुःखद परिस्थितींत तिच्या आईच्या मृत्यूची भर पडून ती सर्वतोपरि दीन व निराश्रित होते. तथापि भाऊ मोठ्या प्रेमानें तिला धीर देतो व दोघेंही विचारी असल्याकारणानें परिस्थितींतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात. या भावंडांचें प्रेम अधिकच दृढ होतें व यामुळें भावी सहकार्याची तयारी होऊं लागते. मामांच्या घरीं ती रहात असतांना तिचें जीवित यातनामय होतें. मामीचे कठोर अपमानकारक शब्द तिला ऐकून घ्यावे लागतात. परंतु भाऊवरील अत्यंत प्रेमामुळें ती त्याच्या कानावर ह्याविषयीं एकही शब्द घालीत नाहीं. तथापि ती आपलें दुःख सुंदरीच्या पत्रांत निदर्शित करते. ह्या पत्रांतही ताईचा स्वभाव चांगला उमटला आहे. मामांच्या घरचें यातनामय जीवित दुःसह होऊन आत्मघात करून दुःखाचा शेवट करावा असा क्षणमात्र एक विचार तिच्या मनांत येतो. पण ती विचारी असल्यामुळें आत्मघात करण्याचा वेडा विचार बाजूला ठेवते. याविषयीं ती सुंदरीला लिहिते, "खरेंच सुंदरे, जीव तरी काय म्हणून द्यावा? आपल्या जिवाचा कांहीं उपयोग आपल्याला करतां येणार नाहीं का? ज्यांच्या पदरीं आपल्या कमनशिबानं आपण बांधल्या गेलों, त्यांनीं अव्हेर

केला, छळ केला, तर आपला सगळा जन्म व्यर्थ गेला, आपल्याला मरणापलीकडे कांहीं राहिलें नाहीं, असें कां बरें वाटावें ? आपल्या हातून कांहीं म्हटल्या कांहीं सुद्धां होणार नाहीं असें धरून कां चालावें ? असा विचार आजपर्यंत कितीकदां तरी माझ्या मनांत आला, आणखी आपण कांहींना कांहीं तरी चांगलें परोपकाराचें काम करून आपल्या जन्माचें सार्थक करूं असें माझ्या मनांत फार फार येऊं लागलें "[1] हें सर्वच पत्र वाचण्यासारखें आहे. त्यांत ताईच्या विचाराची वाढ कशी झाली आहे व ती किती धीराची बायको आहे हें चांगलें दिसतें.

पुढें शिवरामपंतांचा सल्ला घेऊन भाऊनें ताईला पुण्यास आणल्यावर ती अनुकूल परिस्थितींत येऊन पडल्यामुळें तिच्या सद्गुणांचा व बुद्धीचा विकास होण्यास चांगला वाव मिळतो. वाचनानें तिचे विचार अगोदरच प्रगल्भ झालेले असतात. एक दिवस सकाळीं ही सर्व मंडळी हिंडावयास गेली असतांना, मोठेपणा मनुष्याला उपजतच येतो कीं शिकून आणावा लागतो असा प्रश्न निघून वादविवाद चालला असतां ताई म्हणते, " मला वाटतं कीं, धैर्य, सहनशीलपणा, चातुर्य वगैरे गोष्टी उपजत असल्या तर त्या पुढें कोणाच्या शिकवणीनं किंवा कित्ता पाहून अधिक होतात; पण नुसता कोणाचा कित्ता गिरवूं म्हटलं तर कांहीं उपयोग होत नाहीं. उलटं आपल्या आवांक्याबाहेर कोणाचं अनुकरण केलं कीं, फटफजिती मात्र होते. "[2] असा वाद-विवादांत भाग घेण्याइतकी ताईची प्रगति होते.

पुढें ताईनें स्त्रियांना शिक्षण देण्याचा उपक्रम केल्यावर तिला पुष्कळदां निराशाजनक अनुभव येतात. तेव्हांही न डगमगतां ती आपला कार्यक्रम चालूं ठेवते व त्यांत तिला अल्पसें यश येतें. येथेंही तिची कर्तव्यनिष्ठा व चिकाटी दिसून येतात. शिकण्याकरितां बायकांचें

---

१ पृ. २३९. २ पृ. २५५.

मन वळविण्यास लागणारें चतुर व उत्तेजक भाषण, आणि कष्ट व अपमान सोसण्याची तयारी, हे समाजसेविकेच्या अंगीं अवश्य लागणारे गुण तिच्यांत आहेत. थोडासा कामाचा बस बसतो न बसतो तोंच तिचा नवरा अर्धांगानें आजारी पडल्यामुळें ती त्याची शुश्रूषा करण्यास जाते. या प्रसंगीं तिच्या कर्तव्यदक्षतेचें आपल्याला कौतुक वाटतें. एकीकडे मनापासून आवडणारें व नुकतेंच फलद्रूप होऊं लागलेलें स्त्रीशिक्षणाचें काम व दुसरीकडे तिला दुःसह यातना देणारा, अपमान करणारा, मनापासून तिटकारा आलेला असा तिचा पति मृत्युशय्येवर पडलेला. अशा परिस्थितींत कर्तव्याच्या जाणिवेनें स्त्रीशिक्षणाची प्रिय कामगिरी बाजूला ठेवून, ती आपल्याला कोण काय म्हणेल, भाऊ रागावेल कीं काय, याचा विचार न करतां एकदम पतीची शुश्रूषा करण्यास घरीं निघून जाते. केवढें हें कर्तव्यप्रेम! केव्हां कसें वागावयास पाहिजे हें ती पूर्णपणें जाणते. आपण करतों तें विचारांनीं योग्य तेंच करतों, तेंच विवक्षित परिस्थितींत आपलें कर्तव्य, असा तिचा आत्मविश्वास आहे. तिची वागणूक भावनाप्रेरित नसून विचारप्रेरित आहे. यामुळें तिला आपल्या वागण्याबद्दल कधींही पश्चात्ताप होत नाहीं. ती भाऊला लिहिते, " आजपर्यंत कांहीं कारणांनीं जरी मी अशा तऱ्हेनें वागलें (आणखी तसें वागल्याबद्दल मला अणुमात्र पश्चात्ताप होत नाहीं; ज्या स्थितींत मी तशी वागलें त्या स्थितींत मला तेंच करणें सर्वथा योग्य होतें,) तरी आतां आपला निष्ठुरपणा एकीकडे टाकीन........कोणच्या वेळीं कोणचें कर्तव्य तें मी पक्केपणीं समजतें. "[1]

ह्या पत्रांतील ताई नवऱ्याच्या घरीं गेल्याचें पहिलेंच वाक्य वाचून भाऊ संतापानें लाल होतो व पत्र पुरतें न वाचतां उतावीळपणें तिला एक लांबलचक पत्र खरडतो. त्याचें शांतपणानें ती त्याला उत्तर पाठ-

1. पृ. ३१६.

विते त्यांत तिचें गुणसर्वस्व सांठविलें आहे. ती लिहिते, "मी इतकें सविस्तरपणें पत्र लिहिलें असून तुझा असा गैरसमज व्हावा ? मी घर सोडलें त्याबरोबर दया, माया, कर्तव्य, ज्ञान वगैरे सर्व गोष्टी सोडल्या असें का तुला वाटतें ? जोंपर्यंत शरीरप्रकृति चांगली होती ........तोंपर्यंत प्रत्यक्ष मामाचें, बापाचें ऐकलें नाहीं, आणि आपल्या कालाचा उत्तम तऱ्हेनें उपयोग करून घेतला. त्यांत कांहीं वावगें केलें नाहीं. फार तर काय, माझ्या जपणुकीनें माझ्या सेवाचाकरीनें जर प्रकृति सुधारली आणि प्रकृतीबरोबर वृत्ति सुधारली नाहीं, पुन्हां 'ये रे माझ्या मागल्या' झालें, तर मीहि पुन्हां घर सोडून आपल्या पूर्व-मार्गाला लागण्याला कमी करणार नाहीं,........बायको या नात्यानं माझं कर्तव्य म्हणून आहे, तें मी कधीं विसरणार नाहीं........आतांच माझ्या बायकोपणाची खरी परीक्षा. परीक्षा कशाला म्हणायला पाहिजे ? परीक्षा कोणाला दाखवायची आहे ? माझ्या मनाचा हा प्रकार आहे."[1] नवऱ्याच्या वर्तनाबद्दल तिला तिटकारा वाटत होता हें खरें, पण तिनें पत्नीचें कर्तव्य व भूतदया यांनीं प्रेरित होऊन पतीची शेवटपर्यंत शुश्रूषा केली. या वर्तणुकीनें तिची योग्यता किती तरी मोठी ठरते. शिवरामपंतांनीं भाऊस याविषयीं मुंबईला पत्र लिहिलें, त्यांत त्यांनीं ताईचें गुणवर्णन यथार्थ केलें आहे. ते लिहितात, "भाऊ, तुझ्या बहिणीइतकी धीराची, कराराची व निकराची आणखी उदात्त अंतःकरणाची बायको आजपर्यंत मीं कोठेंहि पाहिली नाहीं, कीं ऐकली नाहीं. ज्या स्थितींत ही पडली आहे, त्याहून भिन्न स्थितींत व भिन्न देशांत ती असती तर तिनें आपली कीर्ति अजरामर केली असती."[2] शिवरामपंतासारख्या गृहस्थानें काढलेले हे प्रशंसाचें उद्गार किती यथार्थ आहेत ?

---

१ पृ. ११७, २ पृ. १२०.

पुढें तिचा पति मृत्यु पावल्यावर ती पुन्हां आपल्या पूर्वकार्याला लागते, त्यावेळीं एकदां तिची आजी तिला या मार्गापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करते. परंतु ती आपला लोकसेवेचा निश्चय ढळूं देत नाहीं. तिनें आजीला आपला निश्चय कळवितांना केलेलें भाषण[1] स्वभावदर्शक आहे.

ताई आणि तिची आई ह्यांच्या परिस्थितीमध्यें व स्वभावामध्यें विलक्षण साम्य आहे. दोघींनाहीं नवऱ्यांपासून सुख लागत नाहीं. दोघींत करारीपणा व धैर्य हे गुण चांगले वास करतात. शक्य तोंपर्यंत दोघीहि नवऱ्याचा त्रास व छळ सहन करतात. परंतु पुढें तो असह्य झाल्यावर दोघीहि निश्चयानें व धीरानें परिस्थितीला तोंड देतात. नवऱ्यानें अंगावर हात उगारतांच ताईच्या आईनें त्याला उद्देशून केलेले भाषण[2] व धाकदपटशा देऊन ताईचा पति तिला घरीं येण्यास सांगतो त्यावेळीं तिनें त्याला दिलेलें उत्तर[3] यांत पूर्ण साम्य आहे. सात्त्विक संताप, धैर्य व निश्चय दोघींच्याहि भाषणांत दिसून येतात. दिवाणजीच्या चघळपणाच्या भाषणानें ताई संतापानें लाल होते. त्यावेळीं भाऊ "ती अगदीं आईसारखी दिसत होती" असें म्हणतो. या उभयतां मायलेकींत सुगृहिणी होण्यासारखे सद्गुण होते, परंतु मूर्ख माणसांशीं जन्माच्या गांठी पडल्यामुळें त्यांच्या गुणांची माती झाली. अशाप्रकारें दोघींच्याहि संसाराचा खेळखंडोबा होतो, तरी वाचनानें ताईचे विचार सुसंस्कृत झाल्यामुळें ती आपलें आयुष्य सार्थकीं लावून समाधानानें रहाते. परंतु तिची आई अशिक्षित असल्यामुळें तिच्या विचाराची प्रगति न होतां तिला आपली जीवितयात्रा दुःखांतच संपवावी लागते.

भाऊ व ताई या उकिरड्यावर पडलेल्या रत्नांना तेथून काढून जगापुढें आणून त्यांची किंमत पटवून देण्याकरितांच जणूं शिवरामपंतांनीं जन्म घेतला होता. त्यांच्या अभावीं या बहीणभावंडांचे अलौकिक

**शिवरामपंत**

१ पृ. ३३३. २ पृ. १५२, ३ पृ. १९१.

गुण मातीमोल झाले असते. शिवरामपंतांची व भाऊची पहिली दृष्टादृष्ट ते भाऊच्या घरीं बिऱ्हाडानें रहावयास येतात तेव्हां होते. त्यांच्या घरच्या मंडळींना त्यांनीं लावलेलें आदर्शभूत वळण, सर्व मंडळींची प्रेमाची वागणूक, घरांत नांदणारी शांतता, स्वतः शिवरामपंतांची लहान मुलांना प्रेमळपणानें इष्ट तें वळण लावण्याची हातोटी वगैरे गोष्टींचा भाऊच्या मनावर परिणाम होऊन तो त्यांच्या कुटुंबाला 'इहलोकचा स्वर्ग' असें यथार्थ नांव देतो. या क्षणापासून आपल्याला त्यांचे एकेक सद्गुण दिसूं लागतात. या प्रथम भेटीपासून "माझ्या आयुःक्रमरूप पुस्तकाचें नवें खंड सुरू झालें,"[1] असें भाऊ स्वतः म्हणतो. शिवरामपंत स्वतः विचारी असल्यामुळें त्यांची प्रत्येक कृति विचारशुद्ध असते. स्वतःची राहणी टापटिपीची व कुटुंबालाही तेंच वळण लावलेलें. लहान मुलांना गृहशिक्षण कसें द्यावें, त्यांना वळण कसें लावावें याचे धडे ते व त्यांची पत्नी यांच्यापासून घ्यावेत. शिवरामपंत भाऊच्या अभ्यासाविषयीं चवकशी करीत. भाऊ एकदां खोटें बोलला असतां, खोटें बोलणें अति वाईट असा त्यांनीं त्याला प्रेमळ शब्दांनीं उपदेश केला. "खोटें बोलणाऱ्या मुलांबिलांचा सुंदरीला संबंध नको म्हणून मी फार जपतों" वगैरे शब्दांनीं अप्रत्यक्ष रीतीनें त्यांनीं त्याची कानउघाडणी केली. मुलांच्या तोंडून खरी हकीगत ते सहज काढून घेत. त्यांचें भाषणच इतकें प्रेमळ असे कीं, प्रश्नाला सरळ उत्तर यावयाचेंच. भाऊ म्हणतो, "त्यांचे प्रश्न म्हणजे केवळ अगदीं मृदु अशा गिरमिटाचे वळसेच असत. ते प्रश्न असे केले जात कीं, त्यांचीं उत्तरें आपोआप बाहेर पडत. या गृहस्थापासून कांहीं लपवून ठेवावें असें कधींच वाटत नसे."[2] भाऊनें सुंदरीला लिहिलेल्या पत्राच्या कागदांवरून त्याच्यावर कवठांच्या चोरीचा आळ आला असतां ते त्याची प्रेमळ व सौम्य शब्दांनीं चव-

१ पृ. ७८, २ पृ. ८०.

कशी करतात. भाऊही न लपवितां आपण असत्य खोटें बोललेलें कबूल करतो. पुढें थोड्या वेळानें त्याचें मन शांत झाल्यावर त्याच्या हातून झालेल्या दिसण्यांत यःकश्चित् परंतु संवयीचें बीज या दृष्टीनें त्या अपराधाचें महत्त्व केवढें आहे तें समजावून सांगतात. या गोष्टीचा त्याच्या मनावर परिणाम होऊन तो खोटें न बोलण्याचा निश्चय करतो.

सुंदरीच्या निमित्तानें लहानपणापासून भाऊचें व ताईचें शिवरामपंतांच्या घरीं येणें जाणें असल्यामुळें या भावंडांविषयीं त्यांच्या मनांत प्रेम उत्पन्न होतें. घरच्या सर्वस्वीं प्रतिकूल परिस्थितीमुळें त्यांना त्यांची दया वाटून शक्य तर भाऊला चांगल्या मार्गाला लावावें या हेतूनें ते त्याची काळजी घेऊं लागतात. पुढें भाऊची बुद्धिमत्ता व शाळेंतील प्रगति पाहून तर त्यांचें भाऊकडे अधिकच लक्ष वेधतें. ताईच्या विषयीं त्यांना प्रथम कांहींच करतां येत नाहीं. तिच्या लग्नाचा आईनें हट्ट धरला तेव्हां मामांना विचारपूर्वक पत्र लिहिणें, आईला दोन शब्द सांगून पहाणें, किंवा दुसरें एखादें चांगलें स्थळ ताईकरितां शोधणें या गोष्टी त्यांना करतां येण्यासारख्या होत्या, त्या ते करतात परंतु त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. भाऊविषयीं मात्र त्यांना कांहीं तरी करतां येण्यासारखें असतें.

शिवरामपंतांनीं भाऊला वेळोवेळीं केलेले उपदेश व दिलेल्या सल्लामसलती पाहिल्या म्हणजे त्यांचा विचारी स्वभाव व दूरदर्शीपणा हे गुण दृष्टीस पडतात. भाऊच्या वयांत जसजशी वाढ होत जाते, बुद्धि विकसित होते, विचार वाढूं लागतो, कर्तृत्व दिसूं लागतें, तसतसे ते त्याला परिस्थितीप्रमाणें निरनिराळ्या दृष्टीनें उपदेश करतात.

भाऊचे वडील रावजी बायकोपाशीं भांडून बिऱ्हाड मोडून निघून जातात. त्या दिवशीं त्यांची हकीगत ऐकून शिवरामपंत प्रथमच त्याला आपल्या स्थितीबद्दल विचार करावयास लावण्याच्या हेतूनें उपदेश

५२३९१.

करतात. हा उपदेश भाऊच्या दृष्टीनें तर फार महत्त्वाचा आहेच; परंतु त्याशिवाय प्रत्येक तरुण मुलानें तो पारायणें करून मनांत बिंबविण्यासारखा आहे. त्यांतील महत्त्वाचा भाग मुद्दाम पुढें दिला आहे. भाऊला त्याची सर्वस्वीं प्रतिकूल व परावलंबी परिस्थिति दाखवून शिवरामपंत म्हणतात, "तुझी स्वतःची जो काय पुंजी, ती तुझें अंगबळ व बुद्धिबळ. या दोहोंच्या जोरावर जें काय तुझ्या हातून होईल, तेंच तुझ्या उपयोगीं पडणार. तेव्हां त्या दोन्ही बळांचा जोर जितका अधिक होईल तितका करणें हेंच तुझें कर्तव्य. तुझा इमानीपणा, तुझी दानत, तुझी नेक, हींच काय तीं तुझीं पुढें सरसावयाचीं हत्यारें........होतां होईल तों आपण स्वतः आपल्या श्रमानें काय तें करूं, सगळ्या शिक्षणक्रमांत स्कॉलर्शिपा वगैरे जें जें कांहीं असेल तें तें मिळवूं, होतां होईल तों आपल्या खाण्यापिण्याचा बोजा दुसऱ्यावर पडणार नाहीं, असं आपल्या मनांत पक्केपणीं धरून जर तूं आपला उद्योग केला नाहींस, तर काय उपयोग ?........तुझी बुद्धि विशेष तरतरीत म्हणून माझं तुला हें विशेष सांगणं............कृति करून दाखवावी. नुसती बढाई किंवा उगीच गप्पा यांचा कोणासही कधींही अणुमात्र उपयोग होणार नाहीं."[१] अगदीं शेवटीं ते त्याला सांगतात, "तूं इतर गोष्टींत जरी आईची आज्ञा पाळलीस, तरी तुझ्या वयाचं अठरावं वर्ष संपेपर्यंत आणखी चार वर्षं होऊन जाईपर्यंत लग्नाच्या बाबतींत तूं तिचं यत्किंचित्सुद्धां ऐकूं नकोस." हें त्यांचें सांगणें भाऊच्या दृष्टीनें किती अमोल होतें ?

शिवरामपंत प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक मार्ग आंखून करतात. त्यांचा स्वतांचा जीवनक्रम अगदीं आंखल्यासारखा आहे. आपल्या मुलीविषयींही अशीच आंखणी करून ते तिला शिक्षण देतात. "तूं आपल्या

१ पृ. १५६, १५७.

मुलीचं लग्न केव्हां करणार ?" या मित्राच्या प्रश्नाला मिळालेलें उत्तर त्यांच्या स्वभावाला साजेसें आहे. ते त्याला सांगतात, "माझा असा पक्का निश्चय झाला आहे कीं, मुलीचं लग्न होतां होईल तों आपण करायचं नाहीं. निदान आणखी पांच वर्षें तरी ही गोष्ट मी स्वप्नांत सुद्धां आणावयाचा नाहीं............पोरीला शहाणी करायची येवढं आपलं काम, तेवढं आपण करायचं. लग्न लावून देऊन तिला कोणाच्या तरी गळ्यांत अडकवून द्यावी हें आपलं कर्तव्य नव्हे............. आज कित्येक वर्षं मला असं वाटतं आहे कीं, मुलाचं किंवा मुलीचं लग्न करून देणं हें आईबापांचं काम नाहीं. त्यांचं काम तीं योग्य विचार कळूं लागण्याच्या वयाला येईपर्यंत त्यांना शिक्षण देणं, आणखीं पुढें त्यांनीं आपली सल्लामसलत घेतल्यावांचून कांहीं करूं नये इतका आपल्याविषयीं प्रेमयुक्त आदर त्यांच्यांत उत्पन्न करणं इतकंच."[१] इतकें शिवरामपंतांनीं सांगितल्यावरही त्यांचा मित्र त्यांना आणखी छेडतोच. "ही गोष्ट तुझ्या बायकोला पसंत पडली असेल कशावरून ? मुलीवर तुझ्या इतकाच तिचा हक्क नाहीं का ?" या त्याच्या प्रश्नाला शिवरामपंत आपण बायकोचेंच काय पण खुद्द मुलीचें सुद्धां मत विचारलें असून त्या दोघी सर्वस्वीं अनुकूल आहेत असें सांगतात. शेवटीं नाइलाज होऊन तो आपल्या मतें अगदीं अमोघ व निर्वाणींचा म्हणून शेवटचा एक प्रश्न विचारतो. "तुझं ठीक आहे, परंतु उद्यां पोरगी वयांत आल्यावर जर तिचं पाऊल वांकडं पडलं तर त्याचं अपेश कोणावर ?" ह्या त्याच्या पश्नाला शिवरामपंतांनीं दिलेलें उत्तर वाचलें म्हणजे त्यांचा तर्कशुद्ध विचार व त्यामुळें आपल्या मताविषयीं उत्पन्न होणारा आत्मविश्वास निदर्शित होऊन भाऊच्या मनावर त्याचा कितीतरी परिणाम झाला असला पाहिजे हें समजतें. ते आपल्या

१ पृ. १७१, १७२.

मित्राला उत्तर देतात, "मीं तिचं लग्न करून देऊन दुसरे दिवशीं तिचा नवरा मेला, आणखी मग तिचं वांकडं पाऊल पडलं तर त्याचं अपयश कोणाकडे ?" हें उत्तर मनांत असलं तरी कितीजण त्याचा स्पष्ट उच्चार करून दाखविण्यास धजतील ? हें उत्तर देऊन शिवरामपंत पुढें म्हणतात, "बापू, हा तुझा काय वेडगळ प्रश्न ? अरे, तिला सन्मार्गाचं शिक्षण देणं हें आपलं काम. जोंपर्यंत मी तें देईन, जोंपर्यंत तिच्या मनावर योग्य विचारच राज्य करतील अशी व्यवस्था मी ठेवीन, तोंपर्यंत तिच्या हातून अशी गोष्ट कशी होईल ? यदाकदाचित् ती झालीच, तर मीं लग्न करून दिलं नाहीं म्हणून ती झाली असं मात्र कधीं म्हणणार नाहीं. अशी गोष्ट बोलणं मोठं दुःखकर आहे. पण बाबा, बालवैधव्यांत जर सद्गुणांचं रक्षण होतं, तर कौमार्यांतच तें कां होऊं नये ?"[१] ही बिनतोड विचारसरणी पाहून अशींच माणसें समाजाच्या अनिष्ट रूढीविरुद्ध लोकांची खात्री करून देण्यास लायक आहेत असें म्हणावेंसें वाटतें. भाऊच्या विचाराला त्यांच्या या विचारांनीं चालना दिलीच, पण शिवरामपंतांचा 'खमक्या' मित्र सुद्धां विचार करीतच परत गेला असला पाहिजे.

शिवरामपंत कर्ते सुधारक आहेत, केवळ बोलके नाहींत. पूर्ण विचार करून एखादी गोष्ट करणें इष्ट आहे असें एकदां ठरलें, म्हणजे ते ती करण्यास कचरत नाहींत. मग द्रव्यबळाचा अभाव, सामाजिक छळ वगैरे अडचणींना ते जुमानीत नाहींत. सुंदरीला शाळेंत घालण्याचा एकदां निश्चय झाल्यावर ते तिला एकदम शाळेंत घालतात. भाऊला त्यांचा हा कित्ता व वेळोवेळीं केलेला उपदेश कितीतरी उपयोगीं पडतात. शिवरामपंतांसारख्या थोर पुरुषाचें सहाय तरुणांना मिळाल्यास त्यांचे हातून काय होणार नाहीं ? सुंदरीला शाळेंत पाठविण्याचें ठर-

१. पृ. १७४.

विल्यानंतर त्यांनीं तिला केलेल्या उपदेशानें त्यांचे परिपक्व विचार, समतोल विचारसरणी व आत्मविश्वास निदर्शित होतात. भाऊला केलेल्या उपदेशाप्रमाणें हाही उपदेश तरुण मुलींनीं मनन करण्यासारखा आहे. त्यांतील मुख्य विचार पुढें देतों. " प्रथम तुला पुस्तकें घेऊन शाळेंत जातांना पाहून लोक तुझी टवाळी करतील, फाजीलपणानें अमंगळ शब्द उच्चारतील, त्याचं अणुमात्र वाईट वाटूं देऊं नको " असें सांगून ते म्हणतात, " शाळेंतील इतर मुलींच्या अंगीं जे कांहीं गुण असतील ते अवश्य घे, पण रिकामी छानछोक किंवा नटवेपणा किंवा असेच दुसरे कांहीं अवगुण त्यांचा अणुमात्र स्पर्श तुला होऊं देऊं नको बरं ! तुझ्या वर्तनावर फार गोष्टी अवलंबून आहेत. तूं जशी वागशील, तशाच सगळ्या शिकणाऱ्या मुली वागणार, असा लोक आज ग्रह करून बसणार. शिकलेल्या मुलीच्या हातून राईयेवढी चूक झाली तर ती लोकांच्या दृष्टीनें पर्वताएवढी वाटते. आणखी अशा चुकांचें अपेश सगळं त्या शिकण्यावर येतं............ज्या शाळेंत मी तुला आतां घालणार ती शाळा सर्वथैव परधर्मी. मला खरोखर तूं मिशनरी शाळेंत जावंस असं वाटत नाहीं; परंतु दुसरी शाळा नाहींच, तेव्हां त्याला इलाज नाहीं. शिवाय जे गुण आपल्या पुढल्या हेतूंच्या साधनासाठीं आपल्याला शिकले पाहिजेत, ते गुण त्या शाळेंत लवकर येतील. पण तूं आपल्या मनाला पक्कं संभाळून वागत जा. त्यांनीं आपल्या हिंदुधर्माची कितीही निंदा केली किंवा आपल्या ख्रिस्ती धर्माची कितीहि स्तुति केली, तरी आपलं मन त्या निंदेनं किंवा स्तुतीनं अगदीं विथरूं देऊं नको. हिंदुधर्मासारखा दुसरा धर्म नाहीं, आपल्या जातीसारखी जात नाहीं. अशा शब्दांचा क्षणोक्षणीं जप करीत ऐस....... आपल्याला जें काय करायचं तें आपल्या जातींत, आपल्या धर्मांत राहून केलं पाहिजे. "[1] हा सर्व उपदेश, त्यांतील समतोल विचार,

[1] पृ. १७८, १७९

धर्माभिमान, जबाबदारीची जाणीव प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थीण यांनीं हृदयावर कोरून ठेवण्यासारखी नाहीं काय ? शिवरामपंत उतावीळ, बेजबाबदार, अदूरदर्शी समाजसुधारक नाहींत. प्रत्येक गोष्टीचा सर्वांगांनीं विचार करून, आपली जबाबदारी ओळखून व परिणामाकडे लक्ष देऊन काय करावयाचें तें करण्याकडे त्यांचें लक्ष असतें.

शिवरामपंतांनीं भाऊला अगदीं प्रथम केलेल्या उपदेशाइतकाच महत्त्वाचा उपदेश पुढें कॉलेजांतील शेवटची परीक्षा होण्याच्या समयास त्याच्या मनांत समाजसेवेचें बीज रुजावें या हेतूनें केला आहे. 'परीक्षा पास झाल्यावर तूं काय करणार ?' ह्या त्यांच्या प्रश्नाला भाऊ स्वाभाविकपणें ' कोणीकडून देशाच्या हिताच्या चार गोष्टी घडाव्या इतकेंच माझ्या मनांत आहे. मी आज इतके दिवस तुमच्या आश्रयानं राहिलों आहें, तेव्हां याच्याखेरीज दुसरा कोणचा बरं हेतु माझ्या मनांत असूं शकेल ?' असें उत्तर देतो. या वेळीं शिवरामपंतांनीं देशसेवेचें काम किती अवघड आहे तें फार चांगलें सांगितलें आहे. हे त्यांचे शब्द अलीकडील पूर्वतयारीविना देशसेवा करणाऱ्या मंडळींनीं लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. ते भाऊला म्हणतात, " भाऊ, आपला देश अवनत स्थितींत आहे, तेव्हां तो उन्नत करण्याला खटपट करण्यासारखा दुसरा उत्तमोत्तम हेतु कोणचा असूं शकणार, बाबा ? पण जसं घर बांधावयाचं हा हेतु असला, तरी त्याला कांहीं नकाशा करावा लागतो, त्याला पैशाची व्यवस्था काय आहे, किती आहे याचा विचार करावा लागतो, त्याचप्रमाणें देशहिताचंही नाहीं का ? देशहित, सुधारणा, स्वातंत्र्य हे शब्द मोठे गोड आणि अर्थगंभीर दिसतात, नाहीं बरं ? पण त्यांच्या अर्थाची गंभीरता किती मंडळींच्या ध्यानीं येत असेल ? तुझंच पहा आतां. आज कित्येक दिवस तूं म्हणतोस आपला हेतु असा आहे कीं, देशहित साधायचं. पण मार्ग कोणचा ? देशहित म्हणजे कांहीं

बाजारांत मिळणारा जिन्नस नाहीं ना ?"[१] हाच उपदेश पुढें चालू असतांना ते भाऊला देशहिताला विद्वत्ता व पदवी यांबरोबर आत्मत्यागाचीही फार जरूरी आहे व शिवाय अनेकांचें साह्य अवश्य पाहिजे, ह्या गोष्टी मुद्दाम सांगून, "अशी तुला मदत देण्याला तुझ्याच सारखी कांहीं मंडळी निघतात कीं काय हें पाहिलेंस ?" असा प्रश्न करतात. हें सर्व ऐकून भाऊ गोंधळून जातो. तेव्हां ते म्हणतात, "पहा, हा मोघम गोष्टींत आणि रेखलेल्या गोष्टींत किती फरक असतो तो........ एवढ्याकरितांच तर मुळापासून सगळीं कामें रेखून करीत जावींत." यानंतर "अत्यंत परिश्रम, वेळीं स्वतांच्या शरीराकडे अगर द्रव्याकडेही न पहातां परिश्रम करण्याचा निश्चय, हा सगळ्यांच्या मुळाशीं पाहिजे," असें सांगून ते शेवटीं म्हणतात, "भाऊ, कोणची गोष्ट सुधारायची म्हटली म्हणजे ती अगदीं अंतर्भागापासून सुधारली पाहिजे. कोठें कीड लागली तर तिचें मूळ शोधून काढून तेथें उपाय करण्याला सुरवात केली पाहिजे. नाहींतर कांहींच फायदा होणार नाहीं."[२]

वरचें शेवटचें वाक्य उच्चारून शिवरामपंत स्तब्ध बसतात. ह्या वाक्याचा परिणाम होऊन भाऊ आदर, आश्चर्य व प्रेम या तीन विकारांनीं पूरित अशा दृष्टीनें त्यांच्याकडे पहात बसतो. थोड्या वेळानें ते पुढें म्हणतात, "मला तर नेहमीं असं वाटतं कीं, कोणचीही बिघडलेली गोष्ट म्हणजे ती वरवर सुधारून उपयोगी नाहीं. अगदीं मुळाशीं जाऊन तिच्यांत झालेल्या बिघाडाचें जें काय खरं कारण असेल, जें काय मुख्य बीज असेल, तें शोधून काढून त्याचा नायनाट केला पाहिजे. त्याखेरीज खरा उपाय व्हायचा नाहीं........समाजाची व्यवस्था बरी नाहीं, असा विचार मनांत आला कीं, घरच्या व्यवस्थेंत बिघाड झाला आहे असं समजावं आणखी तिकडे लक्ष्य देऊन कुठें

१ पृ. २८५, २८६. २ पृ. २८८.

काय बिघाड झाला आहे तो पहावा. "[1] इतकें सांगून ते आपल्या तरुणपणांतील आपलीं व आपल्या एका स्नेह्याचीं स्त्रीशिक्षणाविषयींचीं कळकळींचीं मतें, संभाषणें व त्यांसंबंधीं केलेले बेत भाऊला सांगतात, व नंतर कार्याला लागण्याविषयीं उपदेश करतांना म्हणतात, " तूं सर्व बाजूंनीं उद्योगाला लाग. आधीं राजकीय कीं आधीं सामाजिक, हा प्रश्न ज्यांना कांहीं करायला नको त्यांचा. ज्यांना उद्योग करायचा, त्यांनीं जें हातून होईल, तें करण्याचा सपाटा चालवावा. "[2] यानंतर "तुझे या कार्याविषयींचे बेत अगोदर मला सांग," असें म्हणून त्याचे बेत ऐकून घेऊन त्याला पुन्हां आपले स्वतःचे विचार सांगतात. ते म्हणतात, " तुझे बेत पुढें मागें किती तरी प्रकारांनीं फिरतील; आणि फिरवावे लागतील. परंतु तुझी आतुरता, तुझें स्फुरण, आणखी तुझा उत्साह हे मात्र न फिरोत म्हणजे झालें........भाऊ, सर्व सुधारणेचा पाया गृहसुधारणा होय. "[3] इतकें भाऊशीं बोलणें होऊन ही मंडळी स्त्रीशिक्षणाच्या कार्याला आरंभ करतात.

वर दिलेले उतारे शिवरामपंतांच्या स्वभावाचे व गुणांचे निदर्शक आहेत, म्हणून ते थोडे विस्तारानें दिले आहेत. त्यांना लहान मुलांशीं व तरुणांशीं कसें वागावें, कसें बोलावें, हें चांगलें समजतें. भाऊ मोठा होऊन कार्य करण्यासारखा झाल्यावर ते त्याच्याशीं 'मित्रवत् आचरेत्' ह्या न्यायानें वागतात. त्याला उपदेश करण्यापेक्षां त्याच्याशीं ते यावेळीं विचारविनिमय करतात. ह्यावरून त्यांचा समंजसपणा नजरेस येतो. शिवाय एकंदर त्यांची कळकळ, दूरदर्शीपणा, खोल विचार व कांहीं तरी समाजहित घडून यावें ही उत्कट इच्छा, हे गुण चांगले व्यक्त होतात; इतकेंच नव्हे, तर त्यामुळें त्याची योग्यता किती मोठी आहे हें दिसून येतें.

---

१ पृ. २८९, २९०, २ पृ. २९२, ३ पृ. २९४, २९५.

या थोर पुरुषाची खरी कसोटीची वेळ भाऊ सुंदरीशीं लग्न करण्याचें नाकारतो व 'आपण शपथ मोडून लग्न करावें कीं काय' असें विचारतो तेव्हां येते. भाऊ त्यांना म्हणतो, " माझी शपथ जर अविचाराची असेल, तर तुमच्या आज्ञेनें मी ती मोडीनही." यावर शिवरामपंत म्हणतात, " तुला ही जी स्फूर्ति झाली आहे, ती अगदीं योग्य आहे.........कदाचित् तुला यश येणार नाहीं, तुला अनुयायी मिळणार नाहींत; परंतु हे तुझे विचार बाहेर पडतील. मनुष्याचें कांहीं जरी झालें तरी त्याचे विचार समाजाला हितकर व सत्यपूर्ण असले तर ते सतत राहणार........आत्मत्यागाचें एक उदाहरण किती कार्यें करील. आम्ही म्हणत होतों तो (लग्नाचा) मार्ग सुखकर खरा, पण शाश्वत हिताचा नव्हे........मृत्यु येऊन व्यक्तीचें शरीर पतन पावतें. त्याचा आत्मा आणि त्या आत्म्याचे उन्नत विचार वरवरच जातील. कधीं त्यांपासून अवनति होणार नाहीं."[१] आपल्या मनाप्रमाणें होत नाहीं, सुंदरीविषयीं काळजी मनांत तशीच राहणार, मुलासारखा वाढविलेला भाऊ आपलें ऐकत नाहीं, अशा स्थितींत एखादा सामान्य पुरुष वरच्यासारखे असामान्य उद्गार काढूं शकला नसता. शिवरामपंतांची सत्यप्रियता अलौकिक. याच प्रसंगाच्या आरंभीं ते भाऊला म्हणाले होते, " कांहीं झालं तरी सत्यमताचा मार्ग सोडूं नये. खरं सुख त्यांतच आहे."[२] लग्न करण्याचें नाकारण्यांत भाऊचा जितका आत्मत्याग तितकाच निःसंशय शिवरामपंतांचा ह्या उत्तरांत आहे.

याचवेळीं शिवरामपंत अगदीं शेवटीं भाऊला त्याच्या नवीन पंथासंबंधानें फार महत्त्वाचे दोन शब्द सांगतात, त्यावरून त्यांची ज्ञाननिष्ठा व ज्ञानप्रसारावरील विश्वास दिसून येतात. ते म्हणतात, "अज्ञान नाहींसं करणं, त्याच्याकरितां खटपट करणं, ज्ञान वाढवणं हाच खरा मार्ग.

---

१ पृ. ३८१. २ पृ. ३७६

तुम्हांला ज्या सुधारणा पाहिजे असतील, त्या लोकांचे डोळे न उघडतां त्यांचे हात धरून कशा तरी करविणें हा मार्ग अगदीं अश्रेयस्कर. त्यांचे डोळे उघडावे म्हणजे तें अपाप होणार. मग कोणाचा जोरा नको. कोणाचा उपदेश नको. ज्ञानाच्या प्रकाशांत ते एकदां सांपडले म्हणजे चाललेच ते पुढें. "[१] तुझ्या वर्तनाबद्दल ताईची समजूत मी करीन असें सांगून पुढें ते भाऊला म्हणतात, " आतां एकच गोष्ट सांगावीशी वाटते, ती सांगतों. तूं हातीं घेतलेल्या कामांत तुला यश येईल अशी आशा करीत असलास, तर तिचं स्वरूप अत्यंत सौम्य असूं दे........बस्स ! आतां मी जातों. तुझ्या कामांत कोण-च्याही अडथळ्यांनीं व अडचणींनीं तुझी उमेद खचूं नये म्हणजे झालं. हाच माझा आशीर्वाद–हाच माझा तुला उपदेश. " शेवटीं त्यांचे डोळे पाण्यानें भरून येतात व कंठ सद्गदित होतो. नंतर ते भाऊला म्हण-तात, " मी आहें तोंपर्यंत ठीकच आहे. परंतु माझ्या पश्चात् दोन गोष्टी मी तुझ्या आणि तुझ्या ताईच्या स्वाधीन करणार आहें. एक मी आज किती दिवस जो पंथ तयार करीत आहें तो, आणखी दुसरी माझी मुलगी. " त्यांच्यानें पुढें बोलवत नाहीं. ते तेथून चटकन् चालते होतात.

ह्याप्रमाणें शेवटपर्यंत उपदेश केल्यावर भाऊला समाजकार्याच्या आखाड्यांत सोडून शिवरामपंत मुक्तव्रत होऊन घरीं जातात. तें आपलें जीवितध्येय आपली मुलगी, भाऊ आणि ताई यांना हाताशीं धरून पार पाडतात. तें पार पाडण्याला अवश्य लागणारे सर्व गुण त्यांच्या अंगांत कसे ओतप्रोत भरले होतें तें येथपर्यंत दाखविलें. शेवटीं भावानंद आसन्नमरण झाला असतांना ते आपल्याला दिस-तात. भावानंद हे त्यांस पुत्रवत् नव्हे पुत्रच होते. आपण वाढविलेला

---

१ पृ. ३८३.

हा बालवृक्ष आतां फलद्रूप होणार इतक्यांत तो कालाच्या सपाट्यांत सांपडून उन्मळून पडणार हें पाहून त्यांच्या मनाची काय स्थिति झाली असेल ! तथापि तो धीराचा पुरुष एक उसासाहि भोंवतालच्या कानीं पडूं देत नाहीं.

**भाऊची आई**

भाऊची आई परिस्थितीनें नेहमीं दुःखीकष्टी असली तरी तिच्यांत कांहीं प्रशंसनीय सद्‌गुण दृष्टोत्पत्तीस येतात. शिवरामपंतासारखा गृहस्थ तिच्याविषयीं भाऊला म्हणतो, "एका दृष्टीनें मला तिच्या विषयीं फारच आदर वाटतो. ती मोठी दृढनिश्चयी आणखी मोठी जाज्वल्य आहे....तिच्या निश्चयीपणाचं, तिच्या अभिमानाचं जर तूं उदाहरण घेशील, तेवढे गुण जर तूं तिच्यापासून शिकशील, आणखी त्यांचा उपयोग जर तूं योग्य कामांत करशील, तर तूं कांहीं तरी नांव मिळवशील." [1] तिचे करारीपणा व अभिमान हे गुण ताईंत व भाऊंत उतरल्यामुळें त्यांची पुढें झालेली प्रगति घडून आली. शिवरामपंत स्वतः भाऊला तिच्या या गुणांचें अनुकरण करण्यास सांगतात. तिच्या वैतागलेल्या मनःस्थितींत तिचे सद्‌गुण प्रथम आपल्या दृष्टीस पडत नाहींत. नवरा नादी व भटक्या असल्यामुळें तिला लेशमात्रहि सुख लागत नाहीं. भाऊच्या जन्मापासून आपली ही अशी स्थिति आहे, तोच पांढऱ्या पायाचा अशी तिची समजूत होते. त्यामुळें ती भाऊला कधीं प्रेमाचा एक शब्दसुद्धां बोलत नाहीं. वेळो वेळीं त्याला मिळणारा मार व त्याच्याविषयीं तिच्या मुखावाटे निघणारे उद्गार पाहिले म्हणजे तिची मनःस्थिति चांगली लक्ष्यांत येते. तोंडांत आंगठा घातल्याबद्दल भाऊला एक धपाटा मारून ती म्हणते, "कारट्या ! तुला कितीकदां सांगितलं असा आंगठा चोखीत जाऊं

१ पृ १५७.

स्थळ प्रत
नं. ८२८
ता.

नको म्हणून ! जन्मापासून कारट्याला भिकार चाळे लागले आहेत !"[2] मुलाला विनाकारण मारल्याबद्दल भाऊची आजी तिला रागें भरते. त्यावर ती म्हणते, "त्या कारट्याला तस्संच पाहिजे. मेल्याच्या जन्मापासून एक दिवस कधीं तो सुखाचा दिसला नाहीं. पांढऱ्या पायाचा मेला."[1] तिचीं हीं खाष्ट भाषणें व वागणूक पाहून प्रथम आपल्याला ती मोठी दुष्ट असावी असें वाटूं लागतें. पण हळू हळू तिची परिस्थिति नजरेस येऊं लागली, म्हणजे पूर्वग्रह नाहींसा होऊन तिच्याविषयीं आपल्या मनांत अनुकंपा उत्पन्न होते. पहिल्याच प्रकरणांत "अग ते कसले येतात ? माझा जन्म असाच जायचा !" ह्या तिनें आपल्या नवऱ्याविषयीं आईजवळ काढलेल्या उद्गारांत तिच्या मनाची निराशा पूर्ण दृष्टीस पडते. ह्या परिस्थितीमुळें जरी तिच्यांत खाष्टपणा आला असला, तरी तिच्या अंतःकरणांत मातृप्रेम नाहीं असें नाहीं. भाऊ निवळण्याविषयीं तिनें काढलेले उद्गार, मृत्यूसमयीं ताईच्या संबंधानें भाऊस प्रदर्शित केलेली इच्छा, मुंबईस असतांना शिवरामपंतांच्या खोलींत भाऊस रपाटा मारल्यानंतर तिला येणारें रडें, या गोष्टी तिच्या अंतःकरणांत मुलांच्याविषयीं प्रेम वसत होतें हें दर्शवितात. भाऊही आईविषयीं याच अर्थाचे उद्गार काढतो. तो म्हणतो, "ती आपल्या शब्दांनीं जरी कधीं तसें दाखवीत नसे, तरी ही गोष्ट अगदीं निर्विवाद होती कीं, तिचें मजवर अतोनात प्रेम होतें. मी तिच्यापासून दूर झालों कीं ती अतोनात कावरीबावरी होई." सर्व बिकट परिस्थितीला शक्य तितक्या धीरानें व निश्चयानें ती तोंड देते. मुंबईस गेल्यावर नवऱ्याच्या खोलीला कुलूप लागलेलें पाहून तिची निराशा होते, डोळ्यांत अश्रू उभे राहतात, पण धीरानें किंवा हट्टानें ती ते बाहेर येऊं देत नाहीं. पुण्यास बिऱ्हाड थाटल्यावर थोड्याच दिवसांनीं बरो-

१ पृ. ३. २ पृ. १९७.

बर आणलेली पैशाची पुंजी संपल्यानंतर रावजी तिच्याजवळ तुशी मागतात व रागानें तिच्या अंगावर हात टाकतात. त्यावेळीं तिनें त्यांना उद्देशून केलेलें भाषण तिची परिस्थिति व करारीपणा, धैर्य, कर्तृत्वशक्ति वगैरे गुण निदर्शित करणारें आहे. ती रावजीस म्हणते, “ पुरे झालं. आजपर्यंत मीं जितकं सोसलं तितकं मला अगदीं पुरे झालं. इतःपर मी अणुमात्र सहन करावयाची नाहीं. तुम्हांला वाटेल तिकडे जा. वाटेल तें करा. मी इतर बायकांसारखी नाहीं. मी करारी बायको आहें. एकदां जें करीन म्हटलं तें करीन. नाहीं म्हटलं तें कधीं प्राण गेल्यानं करायची नाहीं.......आज लग्न झाल्या दिवसापासून मी पाहतें आहें, सुखाचा एक सुद्धां दिवस कसा तो मला ठाऊक नाहीं. लग्न झाल्यापासून मोठी होईपर्यंत सासूबाईनीं छळ छळ छळलं.......पुढें आपल्या जाचाला सुरवात झाली........तुम्ही म्हणतां मला पैसे दिसतात. म्हणा, तुम्ही वाटेल तें म्हणा, पण मी सांगतें कीं, दहा रुपये–पांच रुपये मिळवून आणा. मी लोकांच्या इथें काबाडकष्ट करीन, काय पाहिजे तें करीन. पण ऐटीनं संसार करून दाखवीन.......बोवा व्हायला जातां ना ? जा. मी बायको माणूस आहें म्हणून तुम्ही असं तसं समजूं नका. मी कोणाला कुठें भ्यायची नाहीं.”[1] हें सर्व भाषण स्वभावनिदर्शक आहे. अनुभवानें तिच्यांत समंजसपणा चांगला आला होता. भाऊच्या आजीनें त्याच्या लग्नाविषयीं प्रश्न काढतांच, “ त्याचें त्याला समजूं लागून त्याची परीक्षा होऊन तो मिळवूं लागेपर्यंत मी त्याच्या लग्नाच्यासंबंधानें एक चकार शब्द सुद्धां काढायची नाहीं, आणखी दुसऱ्या कोणी काढूं नये, ”[2] असें ती परखड उत्तर देते. ताईचें लग्न ती हट्टानें व उतावीळपणानें करते हें खरें, पण आपल्या सर्वस्वीं प्रतिकूल व परावलंबी परिस्थितींत मुलगी

१ पृ. १५२; २ पृ. १६२.

कशी कां होईना, एकदां उजवून टाकावी, असें तिच्या मनांत आलें असल्यास त्या कालाचा विचार केल्यास तिला फारसा दोष देण्याचें कारण नाहीं.

**भाऊचे मामा**

भाऊचे मामा कांहींसे जुन्या पिढीचे, प्रेमळ व विचारी आहेत. आपल्या बहिणीवर व तिच्या मुलांवर ते प्रेम करतात व त्यांना शक्य ती मदत करण्यास तयार असतात. कांहीं विशिष्ट मतांकरितां ते विशेष स्वार्थत्याग किंवा खटपट करतील अशांतला भाग नाहीं, परंतु आपल्या बहिणीचें व तिच्या मुलांचें थोड्याफार मदतीनें हित होत असल्यास तेवढी मदत करण्याची त्यांची तयारी असते. ताईच्या आईनें तिच्या लग्नाचा केलेला बेत शिवरामपंत मामांना पत्रद्वारें कळवितात व त्या पत्राबरोबर ताईनें स्वतःला लिहिलेलें पत्रही त्यांच्याकडे पाठवितात. परंतु त्यांचें कांहींच उत्तर येत नाहीं. कदाचित् आपल्या बहिणीचा करारी स्वभाव माहीत असल्यामुळें व भाऊच्या वडिलांचीं त्यांना, "माझी पोरगी मोठी झाली तरी हरकत नाहीं, मी स्वतः येऊन स्थळें पाहून मोठ्या थाटानें लग्न करीन. आपण उतावळी करूं नये"[1] अशीं पत्रें आल्यामुळें, ते या भानगडींत पडले नसावेत. हीं कारणें असलीं, तरी त्यांनीं ताईच्या लग्नाकडे दुर्लक्ष केलें नसतें तर त्यांना हा अनिष्ट विवाह टाळतां आला असता. ह्या दृष्टीनें त्यांच्याकडे दोष देऊन असें म्हणावेसें वाटतें कीं, मामा विचारी व समंजस असल्यामुळें बहिणीकरितां व तिच्या मुलांकरितां चार पैसें खर्च करण्यास तयार होतात, परंतु त्या पलीकडे जबाबदारीनें त्यांच्याविषयीं एखादी गोष्ट करण्याची त्यांची तयारी नसते. त्यांचा स्वभाव प्रेमळ आहे. बहिणीच्या मृत्यूमुळें त्यांना फार दुःख होऊन बोलतांना

१ पृ. १०९.

ते गहिंवरून जातात.[1] भाऊलाही ते फार प्रेमानें वागवितात. त्यांचें कोमल व प्रेमळ अंतःकरण पाहून भाऊला आपण त्यांना दिलेल्या कठोर उत्तराची लाज वाटूं लागून तो त्यांची क्षमा मागतो. त्यावेळीं यत्किंचितूही न रागावतां ते त्याला प्रेमळ अंतःकरणानें उपदेश करतात व पैशाअडक्याची बिलकूल काळजी न करतां वाटेल तितक्या परीक्षा देण्यास सांगतात. ह्या एकंदर हकीगतीवरून मामा हे गृहस्थ निष्कपटी व प्रेमळ अंतःकरणाचे आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

मामा जुन्या पिढीचे असले तरी त्यांच्यांत विचार कमी नाहीं. ते जुन्याचे अंधभक्त नाहींत. त्यांनीं भाऊला लिहिलेल्या पत्रांतील विचार पाहिले, म्हणजे ते सुद्धां शिवरामपंतांप्रमाणें समतोल मनानें दोन्ही बाजूंनीं विचार करतात असें दिसतें. ह्या कारणानें त्यांचीं पत्रें शिवरामपंतांच्या उपदेशांइतकींच महत्त्वाचीं आहेत. शिवरामपंत प्रागतिक विचार भाऊपुढें मांडतात, तर मामा दुसऱ्या बाजूनेंही कांहीं गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत, हें त्याच्या निदर्शनास आणतात. भाऊनें ताईला त्यांच्या घरून पुण्यास आणल्यावर त्यांनीं त्याला पहिलें पत्र लिहिलें. ह्या पत्रांतील कांहीं उतारे देणें अवश्य वाटल्यावरून ते पुढें दिले आहेत. या पत्रांत शांत मनानें ते भाऊला लिहितात, "आपल्या स्वतःसाठीं व आपल्या बहिणीसाठीं आपण जो मार्ग स्वीकारला आहे, त्यांतील अडचणी माझ्यासारख्या जुन्या माणसाच्या दृष्टीनें काय आहेत आणि कोठें आपल्या 'पुढें जाण्याला' आघात बसण्याचा संभव आहे हें सांगून सावध करणें हें माझें मी कर्तव्य समजतों.... आपल्यासारखी नवीन तरतरीची व नवीन विचारांची मंडळी आमच्या सारख्यांना अगदीं मूर्ख व हेकेखोर असें समजते. आम्ही किंवा आमच्या

१ पृ. २१०; २११.

सर्वच पिढीची मंडळी तशी असेल असें निदान मला तरी वाटत नाहीं. आपल्या बहिणीच्या स्थितींतल्या मुलींची अत्यंत दीनावस्था पाहून किंवा एखादीचा पति वारल्यास तिची दीनावस्था पाहून तिची कींव येत नाहीं असेही आम्ही नाहीं. ह्या स्त्रियांची स्थिति सुधारण्यास कांहीं मार्ग सांपडल्यास अवश्य काढावा असें आम्हांलाही वाटत असतें.......आपल्यांत व आमच्यांत मतभेद काय तो उपायासंबंधानें.......आमचें म्हणणें येवढेंच कीं, एकदम लोकांतून उठून केवळ त्यांच्या उपहासास आपल्या अंगावर घेऊन पुढें सरसावूं नये......... आपल्याला असें वाटतें कीं, जें काय आपल्याला करणें असेल, तें छातीवर हात ठोकून लोकांना पहायला बोलावून करून दाखवावें. असें केल्यानें विशेष फायदा किंवा सुख होत असेल असें मला तर वाटत नाहीं........आमचे घरीं राहून आपल्या बहिणीला कांहीं करतां आलें असतें असें मी म्हणत नाहीं. कारण माझ्या सारख्याच्या घरांत आतां दोन पक्ष झाले आहेत. आम्ही जरी कित्येक गोष्टीला अनुकूल असलों, तरी आमची घरांतली मंडळी नसतात........पण याचा दोष त्यांच्याकडे नाहीं. कालमानाचा विचार आम्हांला करतां येतो तसा त्यांना करतां येत नाहीं, यांत त्यांचा काय दोष ? आपण म्हणाल, मग आम्हीं त्यांना न जुमानतां काय म्हणून मनाला वाटेल तें करूं नये ? याला मात्र उत्तर येवढेंच कीं, त्यांचें मन राखणें हेंच आम्हांला विशेष श्रेयस्कर व योग्य वाटतें........त्यांत जर कांहीं तडजोड निघून कांहीं करतां येईल तर आपण करावयास पाहिजे होतें.......एकदम जें हें केलें तें बरें नव्हे असें मला वाटतें........आपल्यासारख्याला भर देणाऱ्या संबंधानें आजपर्यंत जो लोकांचा अनुभव आहे, तो आपल्या सारख्यांना पुढें करून आणीबाणीच्या वेळीं तोंडघशीं देण्याचाच आहे. हे परस्पर दुसऱ्याकडून–विशेषतः आपल्यासारख्या अल्पवयस्क मुलांकडून सुधारणा करविणारे लोक मोठे कार्यसाधु असतात........अशा

लोकांची संगत माझ्या भाचानें धरून तो फशीं पडला, त्याची दुर्दशा झाली असें माझ्या कानीं आलें, तर मला अत्यंत दुःख होईल. बेहेत्तर आहे तो माझ्या अगदीं विरुद्ध वागला तरी; बेहेत्तर आहे त्यानें जिला 'सुधारणा' म्हणतात तिचा कळस केला तरी; परंतु दुसऱ्याच्या तावडींत सांपडून फशीं पडला, आणि त्याला अतोनात पश्चात्ताप होतो आहे, असें माझ्या कानीं आलें, म्हणजे मात्र मला पराकाष्ठेचें वाईट वाटेल. तो आपल्या पायांवर उभा राहून आपल्या मनगटाच्या जोरावर जें काय करावयाचें तें करतो आहे, हें ऐकून मला त्याच्या कृतीबद्दल जरी वाईट वाटलें, तरी धैर्याबद्दल अभिमान वाटेल. आणि अशा स्थितींत त्याच्यावर कांहीं अचानक असें संकट आलें, तर मी आपण होऊन पुढें येऊन त्यास मदत करीन. कधींही माघार घेणार नाहीं........त्यानें धरलेला मार्ग स्वतःच्या हिमतीवर, कोणाचीही परवा न बाळगतां, अमका मला अमुक संकट आल्यास मदत करील, मरूं देणार नाहीं अशावर भिस्त न ठेवतां एकसारखा धरला पाहिजे. खरें धैर्य, खरें शौर्य केवळ रणांगणांत जाऊन आपल्या शत्रूंचीं डोकीं उडविण्यांतच नाहीं, तर साधारणतः संसारांतही आपण धरलेल्या मार्गांत येणाऱ्या संकटांचा शांतपणें नाश करून पुढें सरसावण्यांतही आहे, ही गोष्ट मी जाणून आहें."[१] या विचारसरणीवरून भाऊचे मामा जरी जुन्या पिढींतले असले, तरी त्यांचे विचार समतोल व उच्च आहेत यांत शंका नाहीं. त्यांचें म्हणणें सर्वस्वीं पटण्यासारखें नसलें, तरी तें अगदीं टाकाऊ, हास्यास्पद असें खास नाहीं. उत्साही तरुणांना आपल्या पुढील प्रश्नांच्या साधक बाधक दोन्ही बाजू समजणें किती अवश्य आहे, हें दाखविण्याकरितां मामांच्या पात्राची योजना हरिभाऊंनीं केली असावी. त्यांच्या या शांतपणानें लिहिलेल्या

१ पृ. २४६-२४९.

पत्रांतील अर्थगांभीर्य, शब्दरचना व एकंदर उपदेश पाहून, " आपल्या पिढीप्रमाणेंच विचार करण्याची शक्ति व ते विचार चांगल्या स्पष्ट व जोरदार भाषेंत लिहून काढण्याइतकी बुद्धि मामांनाही आहे,"[1] अशी भाऊची खात्री होते. ह्याच पत्रांत पुढें मामा भाऊला समाजसुधारकावर किती मोठी जबाबदारी आहे हें लिहितात, तेव्हां तर भाऊ आश्चर्यचकित होऊन म्हणतो, " प्रत्यक्ष शिवरामपंतांनीं ज्याप्रमाणें मला पत्र लिहावें त्याप्रमाणेंच हें पत्र लिहिलें होतें, असें म्हटलें तरी चालेल."[2] भाऊचा संन्यासाश्रम स्वीकारून नवीन पंथ स्थापन करण्याचा बेत मामांना कळल्यावर त्यांनीं त्याला वरच्यासारखेंच एक सुंदर पत्र लिहिलें आहे. त्यावरूनही त्यांची योग्यता दिसून येते.

**रावजी**

भाऊचे वडील रावजी यांचें स्वभावचित्र यथार्थ वठलें आहे. एक मोडकी चूल, एक काथ्याचें बिंडोळें, दोन लांकडें, दोन चिलमी, एक गाडगें, बऱ्याचशा चिंध्या, मारवाड्यानें जप्त केलेले दोन दिवे व रॉकेलचे दोन रिकामे डबे हें खोलींतलें त्यांचें ऐश्वर्य पाहिलें म्हणजे त्यांची मूर्ति आपल्या डोळ्यांपुढें उभी रहाते. हे गांजेकस नादीनारायण ज्योतिष व हस्तसामुद्रिक यांवर विश्वासून आपल्याला लवकरच चांगले दिवस येणार आहेत असा जप करीत राहतात. आपली साडेसाती संपून किंवा गुरूची उरलेली दशा नाहींशी होऊन आपले नष्टचर्याचे दिवस गेले, म्हणजे आपल्याला पुष्कळ द्रव्यप्राप्ति होऊन मुलाची मुंज व मुलीचें लग्न आपण थाटानें करणार आहोंत, अशीं ते नेहमीं घरीं पत्रें पाठवितात. 'आपल्या ग्रहांचं बळ फार चांगलं; थोडक्यांत चुकलं, नाहीं तर कोणच्या तरी संस्थानचं स्वामित्व खास मिळावयाचं,' असें त्यांना वाटत असतें. 'थोड्या विपळांनीं घात झाला, नाहीं तर

१ पृ. २४९; २ पृ. २५०.

आपला पोरगा चक्रवर्तीच व्हायचा!' असें ते आपल्या पत्नीला बजावून सांगतात. ही विचित्र व्यक्ति भाऊच्या आजारांत पुण्यास येऊन बिऱ्हाड थाटते तेव्हां व पुढें ताईला आपल्या सासरीं राहण्यास सांगण्याकरितां पुण्यास येते तेव्हां, अशी फक्त दोनदां आपल्या दृष्टीस पडते. याशिवाय दुसऱ्या खेपेस पुण्यास येण्यापूर्वी रावजी आपल्या चिरंजीवास पत्र लिहितात, त्यांत त्यांचा स्वभाव निदर्शित होतो. अशा मूर्ख, व्यसनी व नादी पुरुषामुळें घरादाराचें कसें वाटोळें होतें, हें चांगलें दृष्टोत्पत्तीस येतें. भाऊची आई व सुंदरीची आई यांच्याप्रमाणें, रावजी व शिवरामपंत यांच्यांतील विरोध हरीभाऊंनीं चांगला दाखविला आहे. एक कुटुंबाला देशोधडीला लावतो, तर दुसरा कुटुंबांत 'इहलोकचा स्वर्ग' निर्माण करतो. रावजीच्या अंगांत जरी वर निदर्शित केलेले दुर्गुण असले तरी ते मनाचे प्रेमळ आहेत, दुष्ट नाहींत. त्यांना आपल्या मुलीचें लग्न थाटांत व्हावेंसें वाटतें. मुलाला विलायतेस पाठवून " सिव्हिल सर्व्हंट आणखी बारिस्टर, आणखी कांहीं तिथें नानातऱ्हेच्या परीक्षा असतील त्या सगळ्या " देऊन आणावा, त्यानें आपलें नांव काढावें, अशी त्यांची मनापासून इच्छा असते. पण हा अंतःकरणाचा कोरडा प्रेमळपणा कितीसा उपयोगीं पडणार! रावजींच्या हातून एकहि गोष्ट घडून येणें शक्य नव्हतें. त्यांची बायको त्यांना पूर्णपणें ओळखून होती. बिऱ्हाड थाटण्याच्या अगोदर ते कितीहि नीट वागले, तरी तिला त्याचें केव्हांहि कौतुक वाटत नाहीं. 'हें सारं अळवावरचं पाणी' असें तिचें म्हणणें असे. तिला त्यांच्या वर्तनाचा इतका तिटकारा आला होता कीं, भाऊच्या आजारांत ती त्यांना त्याला जेवायला सुद्धां घालूं देत नाहीं. आणखी इतकें वैतागून जाण्यासारखीच त्यांची कृति होती ही.

रावजी अशा प्रकारें नादी व व्यसनी होते, पण ते जुन्या पिढींत वाढले असल्यामुळें त्यांना सुधारकी विचार व रहाटी पसंत पडत नाहींत.

अशा लोकांना वाटेल तीं व्यसनें व आचार खपतात, पण सुधारकी राहणी म्हणजे 'अब्रह्मण्यम् !' रावजी भाऊला एका प्रसंगीं म्हणतात, "तूं असा निपजशील असं मला वाटलं नव्हतं. मीं आजपर्यंत अनेक छंदफंद केले, पण हे असले पार्जीपणाचे चाळे कधीं आमच्या स्वप्नां-तही आले नाहींत. सगळ्या कुळाला बट्टा, काळोखी लागणारे हे चाळे बाबा तूं कोणाच्या नादानं शिकलास ?" मुलीनें कांहीं झालें तरी नवऱ्याच्याच घरीं राहिलें पाहिजे असें त्यांना जुन्या मताप्रमाणें मना-पासून वाटत असल्यामुळेंच त्यांच्या मुखांतून हे संतापाचे उद्गार बाहेर पडतात.

सुंदरी

सुंदरीची प्रत्यक्ष अशी कामागिरी थोडी असली, तरी अप्रत्यक्षपणें तिची भूमिका फार महत्त्वाची आहे. रंगानें अगदीं गोरी, नाकाडोळ्यानीं मोठी सुरेख, अंगानीं बाळसेदार अशी ही दोन अडीच वर्षांची जेम-तेम बोलूं लागलेली मुलगी प्रथमदर्शनींच आपल्या प्रेमळ, गोड शब्दांनीं भाऊप्रमाणें वाचकांचेंही मन आकर्षून घेते. पुढें वर्षा सवा-वर्षानें पुण्यास भाऊच्या घरीं, "दादांनीं दिलेलें बुक केव्हां वाचायचं," असें उत्सुकतेनें आईला विचारतांना ती आपल्या दृष्टीस पडते. येव-ढ्याशा बालवयांत आपल्या आईचीं लहानसहान कामें करण्याची तिची तयारी असते. आईच्या उत्कृष्ट गृहशिक्षणानें अवघ्या वर्षा-सवावर्षांत तिची कितीतरी प्रगति होते ? तिला लिहितां वाचतांना व आईचें काम करतांना पाहून भाऊच्या मनावर फार चांगला परि-णाम होतो. सुंदरीच्या आईजवळ आपणही वाचण्यास शिकावें अशी त्याला इच्छा होऊन तो नियमानें लिहूं वाचूं लागतो. लिहिण्या वाच-ण्यापेक्षां सुंदरीच्या गोड स्वभावाचा व सुशील वर्तनाचा त्याच्यावर अधिक परिणाम होतो. तो इतका कीं, तिला नापसंत होईल, ती नांवें ठेवील, अशी एकही गोष्ट त्याच्यानें करवत नाहीं. या दृष्टीनें भाऊच्या

स्वभावास योग्य वळण लावून त्याची नीतिमत्ता वाढविण्यास तिची प्रत्यक्ष मदत चांगली होते. तिची मातृभक्ति भाऊच्या मनावर ठसते. एकदां भाऊ आपल्याला पडलेलें स्वप्न तिला सांगण्यास सुरुवात करून ती तें मोठ्या उत्सुकतेनें ऐकणार, इतक्यांत तिची आई तिला हांका मारते व ती तत्क्षणींच तेथून निघून जाते. या तिच्या मातृभक्तीविषयीं लिहितांना भाऊ म्हणतो, " मातृभक्ति म्हणजे काय, हें मला स्वतःच्या अनुभवानें कांहीं ठाऊक नव्हतेंच. सुंदरीची भक्ति पाहून मात्र मला ती कळली. सुंदरीनें मला मातृभक्तीचा धडाच दिला असें म्हणतों. कारण मी आपल्या आईचें केव्हां कांहीं ऐकलें नाहीं, म्हणजे ती मला तसें न करण्याबद्दल अत्यंत उत्कटतेनें उपदेश करीत असे. "[1] भाऊच्या स्वभावानिदर्शनांत सुंदरी त्याच्या नैतिक उन्नतीला कशी कारणीभूत झाली ह्याचा उल्लेख आला असल्यामुळें त्या गोष्टीचा येथें विस्तार करण्याचें कारण नाहीं.

शिवरामपंतांच्या शिक्षणानें सुंदरींत समंजसपणा व विचारीपणा हे गुण आले होते. ताईला मामांच्या घरीं रहाणें दुःसह झालें आहे, असें तिच्या पत्रावरून भाऊला समजल्यामुळें तो सुंदरीला ताईला पुण्यास आणण्याविषयीं सल्ला विचारतो. त्यावेळीं तिनें दिलेलें उत्तर फार समंजसपणाचें, एखाद्या पोक्त विचारी माणसानें द्यावें असें आहे. ती भाऊला म्हणते, " आपण म्हणतां ती गोष्ट अगदीं खरी. परंतु कोणाचीही गोष्ट करणें ती दूरवर विचार केल्याशिवाय करतां कामा नये. " यावर भाऊ थोडासा उतावीळ होऊन त्रासिक शब्दांनीं तिला उलट विचारतो, " दूरवर विचार करायला आतां अवधि तरी कोठें आहे? " ह्या त्याच्या प्रश्नाला ती उत्तर देते, " विचार करायला वेळ नाहीं असं कधींच होत नाहीं. वेळ नाहीं म्हणून विचार न करतांच एखादी

१ पृ. ९२.

गोष्ट करणें बरं नाहीं असं मला वाटतं."[1] ह्या तिच्या उत्तरांत शिवराम-पंतांचा विचारी स्वभाव उतरला नाहीं, असें कोण म्हणेल ?

सुंदरी वडिलांच्या शिक्षणानें समंजस व विचारी झाली आहे हें खरें, पण तिच्यांत एकादें काम अंगावर घेऊन तें पार पाडण्याची धडाडी नाहीं. तिच्यांत व भाऊच्या ताईत फार अंतर. हें शिवराम-पंतांनीं योग्य शब्दांनीं निदर्शित केलें आहे. तिच्या लग्नाचा प्रश्न भाऊ-जवळ काढतांना ते म्हणतात, " भाऊ, आजपर्यंत मीं सुंदरीचें लग्न न करण्याचा विचार कां केला होता तें तुला सांगितलंच होतं. तिनं अगदीं स्वतंत्रपणानं कांहीं तरी आपल्या भगिनींच्या हितासाठीं झटावं हाच माझा उपदेश होता. परंतु तसं स्वतंत्रपणानं ती कांहीं करण्या-जोगी धीट नाहीं असें माझं मन मला सांगूं लागलं आहे. तुझ्या ताई-सारखी ती नाहीं. कांहीं स्त्रिया वेलीप्रमाणें जात्याच दुसऱ्याच्या आधा-राची अपेक्षा करतात. कांहींना अगदीं स्वतंत्रपणानं राहतां येतें. सुंदरी पहिल्या वर्गांतली आहे. तुझी ताई दुसऱ्या वर्गांतली आहे. "[2] सुंद-रीच्या विचारांत व वागणुकींत हें परावलंबित्व दृष्टीस पडतें. मनुष्या-चा मोठेपणा उपजत असतो कीं शिकून येतो, याविषयीं ती व ताई यांच्यांत वाद चालला असतांना दोघींनीं आपआपले प्रदर्शित केलेले विचार पाहिले म्हणजे दोघींच्या स्वभावांतील फरक ध्यानांत येतो. सुंदरी म्हणते, " कोणालाय् काय, कोणी ना कोणी तरी कित्ता पुढें धरल्याखेरीज तर शहाणं होतां येत नाहीं ना ? " ताई तिला उत्तर देते, " मला नाहीं बाई असं वाटत. मला वाटतं कीं, धैर्य, सहन-शीलपणा, चातुर्य वगैरे गोष्टी उपजत असल्या, तर त्या पुढें कोणाच्या शिकवणीनं किंवा कित्ता पाहून अधिक होतात; पण नुसता कोणाचा कित्ता गिरवूं म्हटलं तर कांहीं उपयोग होत नाहीं. उलट आपल्या

---

१ पृ. २४१; २ पृ. ३७०.

आवांक्याबाहेर कोणाचं अनुकरण केलं कीं फट्फजिती मात्र होते. "[1] त्याचप्रमाणें स्त्रियांच्या घरोघर जाऊन त्यांना लिहिणें, वाचणें, विणणें वगैरे कामें शिकवितांना ताईची धडाडी व कर्तृत्व दृष्टीस पडतात, पण सुंदरींत हे गुण दिसत नाहींत. तसेंच एका व्याख्यानाच्या प्रसंगीं कांहीं टवाळ लोक भाऊची थट्टा करीत करीत पगडी उडविण्यापर्यंत जातात. या गोष्टीसंबंधानें बोलणीं चाललीं असतांना सुंदरीच्या तोंडून, " असा प्रसंग पुन: येण्यापेक्षां हीं व्याख्यानेंच बंद करावीं. त्यांपासून फायदा तर कांहीं नाहीं. उलट तसा आणखी कधीं प्रसंग आला, तर भलतं-सलतं मात्र व्हायचं, " असे उद्गार बाहेर पडतात. पण त्यावर ताई लगेच म्हणते, " काय ? हा असा प्रसंग एकदां आला म्हणून हातीं घेतलेलं काम सोडून द्यायचें ? वाहवा ! आतां आपल्या संरक्षणाची जास्ती काळजी घ्यावी पाहिजे तर......पण असं झालं म्हणून मुळींच आपलं काम सोडून द्यायचं, हें नाहीं बाई मला पसंत ! भाऊ, तूं काय आतां सोडून देणार हीं व्याख्यानें ? मग त्यांत काय राह्यलं ? तुला त्रास झाला असेल, जिवाची देखील भीति पडली असेल. मला दिसतं आहे; पण बाई तेवढ्यासाठीं आपलं काम बंद करणें हें कांहीं चांगलं नाहीं. "[2] सुंदरीच्या अंतःकरणांत भाऊविषयींच्या प्रेमाची कोमल भावना वसत असल्यामुळें तिच्या मुखावाटें वरीलप्रमाणें उद्गार आले, असें कोणी म्हणेल. पण ताईच्या मनांतील भगिनीप्रेमाची भावना कमी तीव्र होती असें म्हणतां येणार नाहीं.

अगदीं बालपणीं भाऊच्याविषयीं सुंदरीच्या अंत:करणांत जो स्नेह उत्पन्न झाला, त्याची हळुहळू प्रेमांत परिणाति झाली. हें प्रेम सारखें वाढतच गेलें असलें पाहिजे. तथापि मनाची ही कोमल भावना ती स्वतां भाऊजवळ किंवा इतरांजवळ व्यक्त करीत नाहीं. अशा स्थितींत भाऊ

१ पृ. २५५; २ पृ. ३५१.

लग्न न करतां संन्यासाश्रम स्वीकारणार, हें ऐकून तिची किती निराशा झाली असली पाहिजे ? आतांपर्यंत उभारलेल्या मनोरथांचे मनोरे अकस्मात् ढांसळलेले पाहून तिच्या मनाची काय स्थिति झाली असेल ? आयुष्याच्या ऐन तारुण्यांत हा काल पावेतों आनंद, उत्साह व प्रेम ह्या भावनांनीं वावरणारी सुंदरी एका क्षणांत करुणरसाची पुतळी बनते ! तथापि अशा प्रसंगींही तीं आपलें अंतःकरण उघडें करीत नाहीं. यामुळें तर तिच्या मनाला तीव्र निराशेचा मुका मार अधिकच दुःसह होत असला पाहिजे. अशा रीतीनें आधींच दुःखानें होरपळणाऱ्या अंतःकरणाची भावानंदाच्या मृत्यूनें काय अवस्था झाली असेल ! " भावानंदाचें प्राणोत्क्रमण हें सुंदराताईच्या प्राणोत्क्रमणासमान होय," हे रामानंदाचे तिच्याविषयींचे उद्गार किती यथार्थ आहेत ? कादंबरी वाचून संपविल्यानंतर वाचकाच्या मनांत भावानंदाच्या पाठोपाठ दुसरी एखादी व्यक्ति उभी राहत असेल, तर ती सुंदरी.

**सुंदरीची आई**

शिवरामपंतांची पत्नी, सुंदरीची आई, आपल्याला प्रत्यक्ष अशी दोनदांच दृष्टीस पडते. अगदीं प्रथम रावजींच्या खोलींत शिवरामपंतांचें बिऱ्हाड येतें त्यावेळेस, व नंतर पुण्यास भाऊच्या घरींच ते बिऱ्हाडानें रहावयास येतात तेव्हां. पहिल्या प्रसंगांत तिच्या अंतःकरणांतील वात्सल्य विशेष दृष्टीस पडतें. सुंदरी तर तिची मुलगीच, पण भाऊ-शींहि ती तितक्याच प्रेमळ शब्दांनीं बोलते. भाऊची आई तेथें येऊन त्याला तो कळवळेपर्यंत दोन तीन धपाटे मारते तेव्हां, " नकाहो त्याला मारूं. असं काय मारतां ? आयाई ! पोरगं कळवळं बघा ! " असें म्हणत ती त्याला त्याच्या आईच्या तावडींतून सोडविण्याचा प्रयत्न करते. त्यावेळीं त्या बिचारीच्या डोळ्यांला खरोखर पाण्याच्या धारा लागतात. याच प्रसंगांत भाऊच्या आईचा राग शांत झाल्यावर ती सुंदरीच्या आईजवळ त्याच्या निर्दयता, दुष्टपणा, द्वाडपणा इत्यादि

अवगुणांबद्दल नांवें ठेवीत असतांना, सुंदरीची आई उलट प्रेमळ व्याजोक्तीनें "तसं म्हणाल तर ही आमची महामाया काय कमी आहे ? अशी दांडगाई करते तर कांहीं पुसूं नये. आम्हांला दोघांना अगदीं भंडावून सोडते," असें म्हणते. ह्या शब्दांत तिचें–किंबहुना सर्व स्त्रियांचें मातृहृदय उत्कृष्ट प्रतिबिंबित होतें. पुढें तेराव्या प्रकरणांत शिवराम पंतांच्या कुटुंबाचें वर्णन आलें आहे, त्यांत त्यांच्या पत्नीच्या स्वभावाची दुसरी बाजू दाखविली आहे. पतीच्या विचारानें व शिकवणीनें तिला लहान मुलांच्या गृहशिक्षणाचें महत्त्व चांगलें समजतें; व तें कसें द्यावें हेंहि तितकेंच चांगलें कळतें. शिक्षण म्हणजे केवळ लेखन व वाचन या कोत्या बुद्धीनें ती सुंदरीला शिकवीत नाहीं. गृहकृत्यांविषयीं आस्था, दक्षता, टापटीप वगैरे विशेषतः स्त्रियांच्या अंगीं अवश्य लागणारे गुणहि तिच्यांत यावेत, अशा दृष्टीनें ती तिला शिकवीत असते. " आईअ, दादांनीं तें बुक दिलं तें केव्हां वाचायचं ग ? कनी, तें लवकर वाचलं तर ते दुसरं देणार आहेत बरं का आणून ! मोठं देणार आहेत चांगलं, " असें सुंदरी तिला विचारते. त्यावर तिनें दिलेल्या उत्तरांत तिचें गृहशिक्षणकौशल्य चांगलें व्यक्त होतें. ती सुंदरीला म्हणते, " आतां हें माझं काम झालं कीं नाहीं, म्हणजे एक घटकेनं घ्यायचं आं वाचायला. इकडे ये, मीं हीं भांडीं विसळलीं आहेत, हीं त्या भिंतीशीं नेऊन ठेव. आणखी तीं धाकटीं भांडीं चांगलीं त्या रुमालानं पूस. म्हणजे मग माझं काम लवकर आटपेल. आणखी मी तो सदरा घेईन शिवायला अन् आपलं तें बुक घेऊन बैस वाचायला. चुकशील तिथें सांगेन. आज चांगलं नीट वाचलं पाहिजे बरं का ? मग रात्रीं वाचून घ्यायचं झालं म्हणजे अगदीं खडखडीत आलं पाहिजे."[1] या तिच्या एका लहानशा उत्तरापासून लहान मुलांचें प्रेमळ-

१ पृ. ७२.

पणानें शिक्षणाकडे कसें लक्ष लाववावें हा धडा शिकण्यासारखा आहे. लहान मुलांना शिकवितांना त्यांना भीति वगैरे न दाखवितां प्रेमळ व उत्तेजक शब्दांनीं त्यांच्यांत उत्साह उत्पन्न करीत करीत शिकविलें पाहिजे. ही गृहशिक्षणाची गुरुकिल्ली सुंदरीच्या आईला चांगली अवगत होती. दुपारीं सुंदरी तिच्याजवळ वाचावयास बसली असतांना भाऊ तेथें येतो. ती त्याला वाचावयास सांगते, तेव्हां " मला हें बुक अजून वाचतां येत नाहीं, " असें तो उत्तर देतो. तरी प्रेमळ शब्दांनीं आग्रह करून ती त्याच्यापासून एक गोष्ट वाचून घेते, व त्यानें ती पुष्कळ अडखळत वाचली असतांना सुद्धां, " चांगलं, चांगलं वाचलंत अं ? " असें म्हणून त्याची पाठ थोपटते. ती स्वतः गृहकार्यांत दक्षता व टापटीप राखते. त्याचाहि सुंदरीवर व पुढें भाऊ व ताई यांच्यावर प्रत्यक्ष उदाहरणानें चांगला परिणाम होतो. शिवरामपंतसुद्धां आपल्या सुशील पत्नीचे गुण वेळोवेळीं घेत असतात. एकदां तरुणपणांतील आपल्या एका स्नेह्याचे व आपले विचार सांगत असतांना ते भाऊला म्हणतात, " आपली बायको इतकी उत्तम, इतकी ग्राहक व कामसू निघेल असं मला कधीं वाटलं नव्हतं, पण पुढें अनुभवानं उलट प्रकार झाला. जें जें कांहीं मीं तिला सांगावं, तें तें तिनं मोठ्या आनंदानं करावं. कधीं म्हणून तें न करण्याबद्दल हट्ट किंवा कांहीं मुळींच नाहीं. माझ्या इच्छेप्रमाणें मला मुलगीहि झाली, ती तशांत इतकी उत्तम ! आपल्या आईची केवळ प्रतिमा ! "[१] अशी सुशील, कर्तृत्ववान व प्रेमळ सहचारिणी लाभल्यावर कोणच्या पतीच्या मुखांतून धन्योद्गार निघणार नाहींत ? अशी पतीचें मन व अंत:करण पूर्णपणें समजणारी पत्नी लाभल्यामुळें शिवरामपंतांना आपलें ध्येय गांठतां आलें. भाऊनें स्वतः या सुगृहिणीविषयीं प्रसंगोपात पुढील उद्गार काढले आहेत. " त्या

---

१ पृ. २९२.

संध्याकाळीं व रात्रींहि आमचें गृहमंडळ एकत्र बसून आम्ही पुढील व्यवस्थेविषयीं नानातऱ्हांनीं बोललों. आतां आमच्या या मंडळांत भिन्न भाव म्हणून राहिलाच नव्हता. आम्ही एकमेकांशीं अत्यंत मोकळेपणानें बोलत होतों. काकू ( सुंदरीची आई ) फक्त ऐकत असत. त्यांच्या त्या एकंदर भावी व्यवस्था किंवा आमचे भावी बेत पूर्णपणें लक्षांत आले होते कीं नाहीं, कोण जाणे ? परंतु त्या कधीं, "हें कशाला, तें कशाला ? यानें लोक असें म्हणतील, त्यानें तसें म्हणतील. तें करूं नये, हें करूं नये," असें म्हणून कोणच्याहि गोष्टीचा निषेध करीत नसत. मुलीला इतकीं वर्षें अविवाहित ठेविली, परंतु त्या माउलीनें आपल्या पतीस एक दिवसहि कधीं 'असें कां ? तसें कां ?' असें विचारिलें नाहीं, कीं कोणच्या प्रकारचा त्रास दिला नाहीं. आपल्या पतीवर तिचा पूर्णपणें विश्वास होता. ते जें करतील तें सद्धेतूनें आणि सत्कार्यच करतील........अशी स्थिति असल्यामुळें इतर लोकांस त्यांनीं हातीं घेतलेल्या सत्कार्यांत जशीं त्यांच्या बायकांकडूनच विघ्नें येतात, लोकांच्या छळामुळें तें कार्य सोडून देण्यापेक्षां घरच्या छळामुळेंच तें सोडण्याचे प्रसंग येतात, तसे दादांस कधींहि येण्याचा संभव नव्हता."[१] या भाऊच्या उद्गारांवरून सुंदरीच्या आईचें स्वभावचित्र डोळ्यांपुढें चांगलें उभें रहातें.

**भाऊची आजी**

यानंतर उरलेलीं पात्रें गौण आहेत. भाऊची आजी जुन्या पिढींतली अशिक्षित अशी आहे. तिचें आपल्या नातवंडांवर प्रेम आहे, तथापि ताईवर ती विशेष प्रेम करते. भाऊची आई त्याला नेहमीं हिडीस फिडीस करते, येवढ्या तेवढ्याकरितां मार देते, हें तिला आवडत नाहीं. ती आपल्या मुलीला त्याच्याकरितां नेहमीं रागें भरते. ताईच्या आई-

१ पृ. १९६.

ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत

प्रमाणेंच आजीलाहि तिनें लिहावाचायला शिकावें हें आवडत नाहीं. आजीचा स्वभाव—किंबहुना जुन्या पिढींतील अशिक्षित स्त्रियांचा स्वभाव—सत्तावनाव्या प्रकरणांत सुरेख दाखविला आहे. ताईचा नवरा मेल्या-नंतर लोकांनीं भलभलत्या पिकविलेल्या कंड्यावर विश्वास बसून, ती या बहीण-भांवडांची कानउघडणी करण्याकरितां पुण्यास भाऊच्या बि-हाडीं येते. तिला भाऊला व ताईला लोकांनीं नांवें ठेवलेलीं आवडत नाहींत. ती भाऊला असले ढंग सोडून देण्याविषयीं आग्रह करून सांगते. मात्र, “ आजी, अग मी असं केलं तरी काय ? ” असं भाऊ तिला विचारतो, तेव्हां त्याचें नक्की कोणतें वर्तन निंद्य आहे, हें तिला सांगतां येत नाहीं. शेवटीं नाइलाज होऊन ती त्रागा करून भाऊला म्हणते. “ तुम्हीं जर हे ढंग सोडून नीट तऱ्हेनें वागण्याचं कबूल केलं नाहीं, तर मी आतां बसल्या जागीं उपास करून प्राण देईन.” या तिच्या त्राग्यावद्दल तिला नांवें ठेवण्याचें कारण नाहीं. जुन्या पिढीचे विचार, शिक्षणाचा अभाव व भाऊवरील प्रेम यामुळें तिला भाऊ व ताई यांच्या वर्तनाविषयीं कंड्या ऐकून तळमळ लागावी हें अगदीं स्वाभाविक आहे. अशा माणसांचीं समजूत कशी घालावी असा नेहमीं प्रश्न उद्भवतो. भाऊलाही तीच अडचण येते. आजीविषयीं बोल-तांना भाऊ म्हणतो, “ आज मी आजीचा त्रागा पाहून जेव्हां आपल्या स्वतःच्या मनाची स्थिति कशी काय झाली याचें पृथक्करण करूं लागलों, तेव्हां माझें मलाच असें वाटूं लागलें कीं, केवळ द्रव्यलोभ किंवा धैर्य-हीनताच कांहीं मनुष्याला मनाविरुद्ध वागण्याला कारण होत नसते. बाळपणापासून ज्यांनीं आपल्याला अत्यंत प्रेमानें वाढविलें, ज्यांची आज्ञा परिपालन करण्यांत व आपली इच्छा त्यांच्या मनाच्या विरुद्ध असली, तरी ती दाबून ठेवण्यांतच आपलें बाल्य गेलें, त्यांनीं कोणत्याही गोष्टीचा हट्ट धरून त्रागा करण्याची पाळी आणली, तर आपण आपलें मन आवरून त्यांच्या इच्छेप्रमाणें करण्याला प्रवृत्त

होतों, हें अंतर्गूढ प्रेमामुळें होय. तें प्रेम दूर सारणें फारच कठिण काम. तें दूर सारून त्यांच्या जिवाला दुःख देणें म्हणजे कृतघ्नतेचा दोष घेणें होय, असें आपलें आपलेंच मन आपल्याला सांगूं लागतें."[1]

भाऊच्या आजीला खरी चीड ताईची येते. ताईच्याविषयीं लोकांनीं उठविलेल्या कंड्यावर तिचा विश्वास बसतो. आपलें मन ताब्यांत ठेवून कांहीं वेळपर्यंत ती सामोपचारानें बोलते, पण पुढें तें अशक्य होऊन निष्ठुरपणानें व वैतागानें म्हणते, " अरे, तिचेच बाबा हे सारे खेळ. हें मी जाणून नाहीं कीं काय ? तूं सांगितलंस म्हणून तिनं करावं का काय ? पुरुषांनीं कांहीं केलं तरी खपेल. म्हणून तिनं असं करावं !.... अग अवदसे, असं जर करायचं होतं तर आमच्या कुळांत जन्म तरी कशाला घेतलास ? "[2] या शेवटच्या उद्गारावरून म्हातारीच्या मनाची काय स्थिति झाली होती हें सहज दिसतें. तिचा राग पुढें अधिक अधिक भडकत जाऊन ती ताईला अद्वातद्वा बोलूं लागते. हे तिचे शब्द दुःसह होऊन भाऊ निकरावर येतो, व " आम्हांला वाटेल तसं आम्ही करूं. तूं आपली लोकांचं ऐक, " असें सांगतो. शेवटीं ताईनें शांतपणें तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, ' मी पुनर्विवाह करणार नाहीं,' असें आश्वासन दिलें, तेव्हां कांहींशी शांत होऊन ती परत गांवीं जाते.

ताईच्या नवऱ्याच्या योगानें स्त्रियांची विवाहाच्या बाबतींत असहाय दीनवाणी स्थिति निदर्शित केली आहे.

**ताईचा पति**

या गृहस्थाचें घराणें खानदानीचें असून त्याला त्याचा थोडा फार अभिमान आहे. त्याच्या दृष्टीनें ताई इतकी वहकत चालली, त्याच्या घरीं ती नांदत नाहीं, तथापि तो घराण्याची अब्रू जाऊं नये म्हणून फिर्यादीआर्यादीच्या भानगडींत

---

१ पृ. ३२८; २ पृ. ३३०.

पडत नाहीं. त्याला बाहेरख्यालीचें व्यसन आहे व त्यामुळें तो ताईचा फार छळ करतो. त्याचें हें व्यसन निंद्य तर खरेंच, पण तत्कालीन खानदानीच्या समाजाची स्थिति पाहिली, म्हणजे त्याला विशेष नांवें ठेवण्याचें कारण नाहीं. ताईच्या पतीच्या रूपानें हरिभाऊंनीं जहागीरदार, इनामदार, यांसारख्या खानदानी गृहस्थवर्गाचें चित्र काढलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. अर्थात् या स्थितीला कांहीं अपवाद सांपडले असते, नाहीं असें नाहीं.

राहतां राहिले भाऊच्या शाळेंतील मास्तरद्वय, हेडमास्तर व आसिस्टंट मास्तर. ह्या दोघांचाही भाऊच्या चरित्रांतील मुख्य भागाशीं—कथानकाशीं—संबंध येत नाहीं. हीं पात्रें फार गौण असून त्यांचा उपयोग तत्कालीन गांवठी शाळा, त्यांतील शिक्षक व त्यांत लहान मुलांना मिळणारें शिक्षण यांचें वर्णन करून त्यामार्गें शिक्षणांतील दोष दाखविण्याकडे होतो. याशिवाय या पात्रांच्या योगानें स्वभावनिष्ठ विनोद फार चांगला उत्पन्न झाला आहे. ह्या दोन्ही शिक्षकांचीं स्वभावचित्रें हरिभाऊंनीं फार सुंदर रंगविलीं आहेत.

**मास्तरद्वय**


हेडमास्तर तात्या ह्यांना आपण स्वतां शाळा स्थापन केल्याचा फार अभिमान होता. त्यांचा स्वभाव फार रागीट असून मुलांना ते कडक शिक्षा करीत. हातावर छड्या मारणें, घोडी देणें म्हणजे कांहींच शिक्षा नाहीं असें त्यांना वाटत असावें. ‘ विंचू डसाविणें, ’ ‘ लाही फोडणें’ ह्या अमानुष शिक्षांवर त्यांचा भरंवसा होता. हल्लीं सुदैवानें शिक्षणांत बरीच सुधारणा झाली असल्यामुळें, ह्या तात्यांच्या शिक्षांचीं नांवेंसुद्धां विद्यार्थ्यांस माहीत नसणार. पण पूर्वीच्या शिक्षणक्रमांत वाढलेल्या गृहस्थांस त्यांचा थोडाफार अनुभव असणार यांत शंका नाहीं. मोठ्यानें ओरडून किंवा मार देण्याचें भय दाखवून जो शिक्षक विद्यार्थ्यांवर वचक बसवील, तो त्याकाळीं लायक शिक्षक. मग शिकवण्याच्या नांवानें

आंवळ्या येवढें पूज्य असलें तरी हरकत नाहीं. विद्यार्थ्यांपुढें वर्गांत शिक्षकाचें आचरण नीतिदृष्ट्या शुद्ध व संभावितपणाचें असलेंच पाहिजे, असें त्या वेळचें मत नसे. मराठी शाळाच काय, परंतु इंग्रजी शाळांतून सुद्धां हेडमास्तरांसारख्या विद्वानांच्या ज्या प्रकारच्या वागणुकी दिसत, त्या आतां दोन दिवस सुद्धां चालणार नाहींत. भाऊच्या तात्यापंतोजींच्या अंगीं त्या काळीं आढळणारे बहुतेक सर्व दोष होते. ते व त्यांचे असिस्टंट या दोन शिक्षकांत जमीनअस्मानाचें अंतर. ही तुलना भावानंदांच्या शब्दांनींच करणें योग्य होईल. ते म्हणतात, " सर जितके सशक्त तितके हे ( असिस्टंट मास्तर ) अशक्त. सर जितके गाण्ष्टि तितके हे मुखस्तंभ. सरांचा आवाज जितका खडा तितका ह्यांचा कोता. सर जितके कामचुकाऊ तितके हे कामकराऊ. आणि असेंही पण आमच्या अनुभवास आलें कीं, सरांचें ज्ञान जितकें उथळ तितकें यांचें खोल ! सारांश आमचे सर आणि आमचे असिस्टंट यांच्यांत दोन ध्रुवांच्या इतकें अंतर होतें."[१] सर मास्तरांचें एकंदर चरित्र पाहिलें म्हणजे ते चांगले गांवगुंड असून आपमतलबी व दुष्ट स्वभावाचे होते, असें म्हणण्यास हरकत नाहीं. असिस्टंट मास्तरांच्या ताळूवर हात फिरवून पुन्हां हे सद्गृहस्थ त्यांच्यावर उपकार करायला तयार. असिस्टंट मास्तर यांच्या अगदीं उलट स्वभावाचे आहेत. ते सात्विक वृत्तीचे असून त्यांचें ज्ञान, मुलांवरील प्रेम व कामसूपणा हीं वाखाणण्यासारखीं आहेत. स्वभावानें प्रेमळ व गरीब अशा शिक्षकाची किंमत न ओळखतां विद्यार्थी त्यांच्याशीं जसें कुचेष्टेचें वर्तन करतात, तसें यांचे विद्यार्थी यांच्याशींही वागतात. इतका गरीब सुस्वभावी शिक्षक सुद्धां सर मास्तरांच्यावर उलटून त्यांचा विद्यार्थ्यांसमोर पाणउतारा करतो, यावरून हे सर मास्तर कशा स्वभावाचे

१ पृ. ४७, ४८.

असावेत हें सहज समजतें. त्यांना सारासारविचार मुळींच नाहीं. याच त्यांच्या दोषामुळें भाऊनें विनायकाच्यापुढें नाक घासून त्याची क्षमा मागावी असा ते हट्ट धरतात तेव्हां, "तुम्हीं पाहिजे तर ठार मारा, पण मी त्याच्या पायां पडणार नाहीं," हे निकराचे शब्द त्यांना ऐकावे लागतात.

आतांपर्यंत पाहिलेल्या पात्रांच्या स्वभावांवरून एक गोष्ट सहज दिसून येते. ती ही कीं, या कादंबरींत दुष्ट किंवा खल पात्र एकही नाहीं. भाऊ, शिवरामपंत, ताई, सुंदरी व सुंदरीची आई, हीं सर्व पात्रें सद्गुणी, प्रेमळ व विचारी अशीं आहेत. भाऊच्या आईंत खाष्टपणा व अविचार असला, तरी तिच्या एकंदर चरित्रावरून तिला दुष्ट म्हणणें योग्य होणार नाहीं. रावजी नादी व मूर्ख ठरतील, दुष्ट ठरणार नाहींत. हीच गोष्ट ताईच्या नवऱ्याची. त्याच्या स्वभावाविषयीं जें विवेचन वर आलें आहे, त्यावरून तो 'कलिपुरुष' या पदवीला योग्य नाहीं, हें दिसून येईल.



# भाग चवथा.

# कादंबरीचे अंतर्गुण

**निसर्गांतील कार्यकारणभाव**

कथानक व पात्रें यांच्या योजनेनें कादंबरीचा सांगाडा तयार झाला, तरी ती सर्वांगसुंदर, चित्ताकर्षक व चटकदार करण्याकरितां लेखकाला निरनिराळ्या गोष्टींची योजना करावी लागते. कथानकाची योजना झाली, तरी त्या कथानकाचा आरंभ, विकास व शेवट निसर्गनियमांप्रमाणें कार्यकारणभावाला धरून होणें अवश्य असतें. कादंबरी व नाटक हे वाङ्मयप्रकार ललित वाङ्मयांत मोडत असल्यामुळें त्यांची उभारणी कल्पनेवर होत असतें हें खरें. कथानकाच्या विकासाचा विचार करावयाचा झाल्यास, लेखकाला आपल्या कल्पनेप्रमाणें प्रारंभाला विषय, स्थल, पात्रें, परिस्थिति वगैरे इच्छेस येईल ती सामुग्री घेतां येईल. पण एकदां ती सामुग्री घेऊन प्रारंभ केल्यावर, पुढें त्या कथानकाचा विकास व शेवट वर सांगितल्याप्रमाणें कार्यकारणाच्या नियमाला धरूनच झाले पाहिजेत. ते तसे न झाल्यास कादंबरींत अस्वाभाविकपणाचा दोष उत्पन्न होऊन ती नीरस ठरेल. कादंबरीकार किंवा नाटककार यांची स्थिति एकाद्या बागवानासारखी असते. बागवानाला जमीन, बीं, खत, पाणी वगैरे आपल्या इच्छेप्रमाणें निवडतां येतील. पण एकदां ही निवड करून जमिनींत बीं टाकलें, म्हणजे मग त्याला येणारीं फुलें व फळें त्याच्या इच्छेवर अवलंबून रहात नाहींत. तीं निसर्गाच्या नियमांप्रमाणेंच येणार. अद्भुत कादंबऱ्यांत कार्यकार-

णाचा अभाव असला तर तो खपतो. परंतु ऐतिहासिक, वास्तविक ( Realistic ), सामाजिक वगैरे कादंबऱ्यांत तो खपत नाहीं. ह्या दृष्टीनें ' मी ' कादंबरीचा विचार करतां त्यांत कथानकाचें–भावानंदाच्या चरित्राचें–सूत्र कार्यकारणभावाला धरून आहे. अंशतः त्यामुळें आपण एखाद्या थोर व्यक्तीचें खरोखर होऊन गेलेलें चरित्र वाचीत आहोंत, असा सत्याभास उत्पन्न होतो.

**अद्‌भुत प्रसंग**

प्रस्तुत कादंबरींत अद्‌भुत प्रसंग नाहींत असें नाहीं. पंधराव्या प्रकरणांत भाऊला लग्नाविषयींचें पडलेलें स्वप्न, त्यांतील लग्नाचा सोहळा उपभोगणारा व तें पाहणारा भाऊ, मंगलाष्टकें सुरू होतांच वरच्या जागीं असलेल्या भाऊचें तोंड अगदीं अंधुक अंधुक दिसूं लागणें व शेवटीं त्याच्या जागीं दुसऱ्याच ओळखीच्या व्यक्तीचें तोंड दिसणें; बासष्टाव्या प्रकरणांत रात्रीं डोक्यांत विचारांचें काहूर माजून तें तापून गेल्यामुळें भाऊला ती रात्र जागून काढावी लागून तो पहांटे अडीच पावणेतीनच्या सुमारास निर्जन कुंजाजवळ अंधुक चंद्रप्रकाशांत डोकें शांत करण्याकारितां जातो व त्यावेळीं ताईची व त्याची अकस्मात् गांठ पडते त्यावेळचा सर्व प्रसंग; शेवटीं भावानंदाच्या अंतकालचें रामानंदानें केलेलें वर्णन, त्यांत वर्णिलेले भावानंदाचे अविरत श्रम, अलोट धैर्य, अपूर्व इच्छाशक्ति, देशसेवेची कळकळ, अमोल उपदेश, अद्वितीय एकनिष्ठता इत्यादि एकापेक्षां एक सरस असे अलौकिक गुण, अंतकालीं त्या महात्म्याचा मुखांतून बाहेर पडणारीं मोत्याच्या मोलाची सुक्ति व आवेशानें म्हटलेलें ' जीवस्तोत्राचें ' कडवें; हीं कादंबरीचीं प्रकरणें अद्‌भुतांनीं भरलेलीं आहेत; परंतु त्यांतील अद्‌भुत व ' अरेबिअन नाइट्स् ' मध्यें आंगठी दगडावर घासल्याबरोबर उत्पन्न होणाऱ्या राजवाड्यांतील किंवा रत्नमाणकांच्या झाडांतील अद्‌भुत यांत फार अंतर आहे. पहिल्या अद्‌भुतांत कार्यकारणभाव असून तीं मनुष्याला

आपल्या आयुष्यांत केव्हां केव्हां अनुभवितां येतात, परंतु दुसरीं केवळ सायंकाळच्या आकाशांतील रंगीबेरंगी पोकळ मेघमालेप्रमाणें कल्पनेच्या लहरींतून उत्पन्न होतात. पहिल्या वर्गांतील अद्भुतें कादंबरींत आलीं तरी तीं अस्वाभाविक होण्याची भीति नसते. उलट त्यांच्या योगानें कादंबरी अधिक चित्ताकर्षक होते.

**प्रसंगयोजना**

कथानकाचा स्थूल आराखडा ठरविल्यानंतर निरनिराळे प्रसंग कल्पनेनें योजावे लागतात. हे प्रसंग योजतांना कादंबरीच्या अनेक अंगांकडे दृष्टि ठेवणें जरूर असतें. कथानकाची जरूरी, स्वभावनिदर्शन, स्वभावपरिपोष, रसपरिपोष, भावनानिदर्शन, तत्त्वानिदर्शन वगैरे अंगें योजलेल्या प्रसंगांनीं साध्य झालीं पाहिजेत; त्याचप्रमाणें त्यांच्यांत विनोद, विचार, वर्णनें वगैरेंना वाव मिळाला पाहिजे. या सगळ्या बाबी डोळ्यांपुढें ठेवून कादंबरींतील प्रसंगांची कल्पनाशक्तीनें योजना करावयाचें काम कुशल कादंबरीकाराशिवाय दुसऱ्याला साधत नाहीं. प्रत्येक प्रसंग लेखकाला विचारपूर्वक योजावा लागतो. 'मी' कादंबरींतील निरनिराळीं प्रकरणें पाहिलीं म्हणजे वरील विधानांचा प्रत्यय येऊन हरिभाऊंची कुशलता समजून येतें.

'मी' कादंबरींतील प्रसंग म्हणजे भावानंद व ताई यांच्या चरित्रांतील प्रसंग. ज्यांच्यायोगानें वर निदर्शित केलेलें सौंदर्यसिद्धीचे हेतु सिद्धीस जाऊन कादंबरी मनोरंजक होईल, अशाच प्रसंगांची योजना हरिभाऊंनीं केली आहे. एक एक प्रसंग घेऊन तो दोन, तीन, चार प्रकरणांत रंगविला असल्यामुळें कादंबरीच्या प्रकरणांचे निरनिराळे गट पडलेले दिसतात. उदाहरणार्थ, आठ, नऊ व दहा ह्या प्रकरणांत भाऊची शाळा, त्यांतील मास्तरद्वय, शाळेंतील शिक्षण, विद्यार्थ्यांचीं भांडणें व समेट, असिस्टंट मास्तरांची मुलांकडून होणारी थट्टा वगैरे गोष्टी आल्यामुळें ह्या तीन प्रकरणांत भावानंदाच्या बालपणींच्या

चरित्रांतील एका भागाचा अंतर्भाव होतो. ह्या प्रकरणांत तत्कालीन प्राथमिक शाळांतील व शिक्षणांतील दोष दाखविण्यास, विनोद्‌-निर्मितीस व विद्यार्थ्यांच्या शाळांतून दिसणाऱ्या भांडणांचें चित्र काढून त्यांचा बालस्वभाव निदर्शित करण्यास चांगला वाव सांपडतो. सुंदरीला भाऊनें लिहिलेल्या पत्राचे हरवलेले कागद, त्यावरून पुढें त्याच्यावर आलेला कवठांच्या चोरीचा आळ व शिवरामपंतांचा खरें बोलण्याचा उपदेश हा भाग सोळाव्या, सत्राव्या व अठराव्या प्रकरणांत आला आहे. यांतहि वरच्या सारखाच हास्यकारक विनोद उत्पन्न होतो, व या प्रसंगाच्या अनुभवानें व उपदेशानें सत्य भाषणाचा धडा मिळून भाऊच्या शीलाची अंशतः प्रगति होते. बावन्नाव्या प्रकरणांत ताई स्त्रियांच्या घरीं जाऊन त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकविण्यास आरंभ करते. यांत समाजांतील स्त्रियांची मागसलेली स्थिति निदर्शित होऊन विनोद निर्माण होतो. आतांपर्यंत सांगितलेल्या प्रसंगांनीं हास्यरसाचा परिपोष होऊन वाचकाचें मन ते वाचीत असतांना रंगून जातें.

'इहलोकचा स्वर्ग' आणि सव्वीस व सत्तावीस या प्रकरणांतील रावजींच्या बिऱ्हाडाची हकीगत या भागांच्या योजनेनें शिवरामपंतांचें आदर्शभूत कुटुंब व रावजींचें वाताहत झालेलें कुटुंब यांच्यांतील विरोध दृष्टीस पडतो. कादंबरीच्या सौंदर्याच्या दृष्टीनें दोन कुटुंबांतील विरोध, शिवरामपंतांच्या कुटुंबांतील व्यक्तींची सुखासमाधानाची व प्रेमाची राहणी व रावजींच्या बायकामुलांच्या हालअपेष्टा व करुणाजनकस्थिति ह्या वर्णनांना अवसर मिळतो. ताईच्या लग्नाची वाटाघाट, तिचें लग्न, सासरीं होणारा छळ व आईचा मृत्यु, या सर्व प्रसंगांचा एक भाग समजण्यास हरकत नाहीं. या भागांत स्त्रियांची परवशता, अज्ञान व सामाजिक रूढींवरील अंधप्रेम हीं दर्शवितां येतात व करुणरसाचा उत्कृष्ट परिपोष करतां येतो. नवऱ्याच्या आजाराच्या प्रसंगानें ताईला

अनपेक्षित रीतीनें त्याची शुश्रूषा करावी लागल्यामुळें तिचे अनेक सद्गुण व्यक्त होऊन तिच्याविषयीं वाचकाच्या मनांत कौतुक व आदर उत्पन्न होतात. जेवावयास बोलावलेल्या स्नेह्यांशीं भाऊच्या समोर झालेलें शिवरामपंतांचें भाषण व गार्फील्डच्या चरित्राचें पुस्तक वाचण्याच्या नादांत भाऊनें शाळा चुकविल्यामुळें शिवरामपंतांनीं प्रेमळ शब्दांनीं त्याची केलेली कानउघाडणी ह्या प्रसंगांनीं भाऊचें शील व संस्कृति वाढण्यास मदत होते व वाचक उदात्त वातावरणांत वावरूं लागतो. मामांच्या घरच्या त्रासास्तव ताईला भाऊनें पुण्यास आणल्यामुळें तिला शिक्षण मिळून तिची समाजकार्याची तयारी होते व तिचे समाजसेवकाला अवश्य लागणारे गुण दिसून येतात. भाऊच्या स्वभावनिदर्शनासहि ह्या प्रसंगानें मदत मिळते. "समुद्र जितका शांत दिसतो तितका तो नसतो!" "दैवाची वक्रता" वगैरे शेवटचीं शेवटचीं सर्वांगसुंदर प्रकरणें, व त्याप्रमाणेंच रामानंदानें भावानंदाच्या मृत्यूनंतर लिहिलेले भाग कादंबरीचें सौंदर्य वाढवून ती चित्ताकर्षक करण्यास किती उपयोगीं पडतात, हें मागील विवेचनावरून सहज दिसून येतें. त्याची येथें पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं.

आतांपर्यंतच्या विवेचनावरून हरिभाऊंनीं प्रस्तुत कादंबरींतील विविध प्रसंग किती कुशलतेनें कल्पिले आहेत हें दिसतें. हे सर्व प्रसंग अधिक अधिक सरस होत गेले आहेत. शेवटचे प्रसंग तर अत्यंत चित्तवेधक व परिणामकारक होतात. या सर्व प्रसंगांनीं कादंबरीचें दुहेरी कार्य साधतें. त्यांच्यामुळें कादंबरी सुरस उतरली आहे व तिच्यांतील एकंदर शिकवण परिणामकारक झाली आहे.

कथानकांतील निरनिराळ्या प्रसंगांची योजना झाली, तरी ते प्रसंग सरस उतरण्यास कादंबरीकाराच्या अंगांत अनेक गुण असावे लागतात. या गुणांचे दोन प्रकार करतां येतील. पहिला कल्पना, निरीक्षण,

मानवी स्वभावाचें ज्ञान वगैरे; दुसरा, भाषाप्रभुत्व, संभाषणरचनेचें कौशल्य इत्यादि. दुसऱ्या प्रकारच्या गुणांचा विचार पुढें स्वतंत्रपणें करावयाचा आहे. या ठिकाणीं पहिल्या प्रकारचे गुण प्रस्तुत कादंबरींत कितपत व्यक्त होतात हें पाहूं.

**कल्पना**

काव्य, नाटक, कादंबरी इत्यादि ललित वाङ्मयाची (Creative or Imaginative Literature) उभारणी कल्पनेवर असल्यामुळें कादंबरीकारांत मुख्य गुण म्हणजे कल्पनाशक्ति असणें हा होय. कल्पना म्हणजे आपल्या नजरेसमोर नसलेल्या वस्तूचें मनानें काढलेलें चित्र. कल्पना दोन प्रकारची असूं शकते. एक मनुष्याला ज्ञात किंवा अनुभूत असलेल्या गोष्टींविषयींची; दुसरी, त्याला अननुभूत, अज्ञात गोष्टींविषयींची. ललितवाङ्मयाला विशेषेकरून दुसऱ्या प्रकारची कल्पना लागते. कादंबरीकार ही दुसऱ्या प्रकारची कल्पनाशक्ति चालवून अगदीं नवीन अननुभूत दृश्यें निर्माण करून कादंबरीची रचना करतो. ह्या शक्तीलाच ‘ प्रतिभा ’ (Genuis) म्हणतात. ही कल्पनाशक्ति महत्त्वाची तर खरीच, परंतु जवळजवळ तिच्याइतकीच पहिल्या प्रकारच्या कल्पनाशक्तीची ललितवाङ्मयाला जरूरी असते. विशेषेंकरून कादंबरीकाराला सामाजिक, ऐतिहासिक किंवा वास्तविक (Realistic) कादंबरी लिहावयाची असेल, तेव्हां ह्या कल्पनेची फार मदत घ्यावी लागते. ह्या कल्पनाशक्तीचा विकास व्यावहारिक अनुभव, निरीक्षण वगैरे साधनांनीं होतो. हरिभाऊंच्या कादंबऱ्या वाचल्यास दोन्ही प्रकारच्या कल्पनाशक्ति त्यांच्यांत उत्कट वास करीत होत्या असें दिसतें. आरंभींचें मुंबईच्या प्रवासाचें वर्णन व त्यांत दाखविलेला भाऊचा बालस्वभाव, त्याच्या आईची मनःस्थिति, म्हाताऱ्या आजीचे रागाचे शब्द, मुंबईच्या चाळीचें वर्णन वगैरे भाग; भाऊच्या शाळेचें व तेथील एकंदर परिस्थितीचें सविस्तर

वर्णन; त्याच्या आईच्या मृत्यूचा प्रसंग; ताईच्या सार्वजनिक कामांतला अनुभव; आजीची भाऊच्या कानउघाडणीकरितां झालेली भेट वगैरे भाग पहिल्या प्रकारच्या कल्पनेचे निदर्शक आहेत. ह्या प्रसंगांचा प्रत्येकाला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अनुभव असतो; परंतु पुढें लेखनाच्या वेळीं त्यांचें चित्र कल्पनेनें मनःचक्षूपुढें आणावें लागतें. अशा प्रकारच्या अनुभूत गोष्टी कल्पनेनें वर्णन करावयाच्या झाल्या तरी त्या सामान्य प्रतिभाशून्य लेखक वर्णील तशा वर्णन करून चालणार नाहीं. त्या ललितवाङ्मयांत यावयाच्या असल्यामुळें कलाकृति या नात्यानें सुंदर स्वरूपांत यावयास पाहिजेत. हें सौंदर्य कादंबरीकाराला आपल्या प्रतिभेच्या सहायानें आणतां येतें. 'न देखे रवि, तें देखे कवि', या न्यायानें सामान्य माणसाला ज्या अनुभूत प्रसंगांत सौंदर्य दिसत नाहीं, त्यांत तें कादंबरीकाराच्या दिव्य दृष्टीस दिसूं लागतें, व नंतर तो त्या प्रसंगांना कल्पनादि विविध गुणांनीं सौंदर्याची जोड करून देतो. उदाहरणार्थ, आपण भाऊच्या आईच्या मृत्यूचा प्रसंग घेऊं. आपल्याबरोबर आपली बायको घरीं येत नाहीं असें पाहून, ताईचा वृद्ध पति रागानें शिव्यागाळी करतांना तिच्या आईच्याविषयीं नीच शब्द उच्चारतो. त्यामुळें भाऊ संतापानें लाल होऊन, "लाज नाहीं वाटत तुम्हांला असले नीचपणाचे शब्द उच्चारायला ?" असें म्हणत त्वेषानें त्याच्या अंगावर धावून जातो. त्याचा मेव्हणा व कंदिल्या गडी काढता पाय घेतात. त्यानंतरच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या रिकामटेकड्या चांभारचवकशा व मर्मभेदक उत्तरें, अश्रू गाळीत बसलेली ताई व खिन्न मनानें विचार करीत बसलेली तिची आई, स्नेहहीन झाल्यामुळें जाण्यासाठीं तडफड करणारा दिवा, तेल घालण्याकरितां भाऊ तो घेऊन जात असतांना वाऱ्यानें तो जाणें, त्याच्या आईला आलेली घेरी, तिचा आजार, डॉक्टरांचें आगमन व त्यांनीं केलेली रोग्याची तपासणी, आईला आलेले वाताचे झटके, तिचे अंतकालचे शब्द, तिचा मृत्यु,

भाऊला व ताईला झालेलें दुःख, आईच्या प्रेतावर भाऊनें घेतलेली शपथ वगैरे सर्व गोष्टी हरिभाऊंनीं आपल्या कल्पनेनें फार सरस वर्णिल्या आहेत. हीं दोन्ही प्रकरणें ( ३५, ३६ ) करुणरसानें ओत-प्रोत भरलेलीं असून अत्यंत हृदयस्पर्शी झालीं आहेत. नेहमींच्या व्यवहारांत घडणाऱ्या गोष्टी, पण त्या इतक्या चित्ताकर्षक रीतीनें कथन करण्यास लागणारी कल्पनाशक्ति हरिभाऊंसारख्या कादंबरीकारांतच असणार. मुंबईच्या प्रवासाचें वर्णन, भाऊच्या शाळेचें सर्वांगीण शब्दचित्र, कवठांच्या चोरीचा भाऊवर आलेला आळ, वगैरे प्रसंग कल्पनाशक्तीच्या साधनानें वरच्यासारखेच सुंदर वठविले आहेत. ह्या सर्व प्रसंगांतील गोष्टींचा प्रत्येकाला थोडाफार अनुभव असतोच, पण त्यांना सौंदर्याची जोड देऊन चित्ताकर्षक करण्यास वर सांगितलेली कल्पनाशक्तीची मदत लागते.

कादंबरीकारांत दुसरी उच्च दर्जाची शक्तिही वास करीत असते. तिच्या योगानें तो केव्हां केव्हां अगदीं नवीन सृष्टि निर्माण करतो. म्हणूनच या कल्पनाशक्तीला ‘ प्रतिभा ’ ( Creative Genius ) म्हणतात. ‘ अरेबिअन नाइट्स्, ’ ‘ गलिवरचा वृत्तांत, ’ ‘ रॉबिनसन क्रूसो ’ वगैरे कादंबऱ्यांत ह्या कल्पनाशक्तीचा उपयोग फार झाला आहे. सामाजिक कादंबरींत ह्या शक्तीला तितकासा वाव मिळत नाहीं. समाजांतील गुणदोषदर्शक प्रचलित समाजस्थिति वर्णावयाची असल्यामुळें तिच्यांत पहिल्या कल्पनाशक्तीचें फार सहाय्य घ्यावें लागतें. ह्याच कारणास्तव प्रस्तुत कादंबरींत ह्याच कल्पनेचा खेळ अधिक आहे. दुसऱ्या प्रकारचीं कल्पनाचित्रें नाहींत असें नाहीं. पण त्यांची संख्या कमी. ‘ भाऊचें सुंदरीच्या लग्नाचें स्वप्न, ’ ‘ कराला देवीचा नवावतार, ’ ह्या भागांत हीच कल्पना वावरत आहे. भाऊ व ताई यांची चांदण्या रात्रींची कुंजांतील भेट व भावानंदाच्या अंतकालचें वर्णन ह्या भागांत सुद्धां पहिल्या प्रकारच्या कल्पनेपेक्षां दुसरीचाच खेळ अधिक आहे.

ललितवाङ्मयांत कल्पनेइतकाच, किंबहुना अधिक महत्त्वाचा भाग, म्हणजे भावनानिदर्शन. कल्पनेनें एखाद्या प्रसं-

**भावनानिदर्शन**

गाचें किंवा व्यक्तीचें चित्र फार सुंदर व यथार्थ असें निघेल, परंतु त्यांत भावनानिदर्शन झाल्याशिवाय जिवंतपणा येत नाहीं. एकाच व्यक्तीचीं दोन चित्रें किंवा पुतळे असतील, दोघांतही त्या व्यक्तीची ओळख असेल, पण एक आपल्याला केवळ निर्जीव चित्रासारखेंच दिसतें व दुसऱ्यांत जिवंतपणा असतो. कादंबरींतही हा जिवंतपणा भावनानिदर्शनाशिवाय येत नाहीं. हरिभाऊंच्या निरनिराळ्या प्रसंगांत भावनानिदर्शन सुंदर साधल्यामुळें, ते ते प्रसंग आपल्या डोळ्यांपुढें घडत आहेत असा वाचकांस भास होऊन तो त्यांतील व्यक्तींशीं समरस होतो. सर मास्तर व त्यांचे असिस्टंट यांच्यांतील भांडण, विवाह ठरल्यानंतरची ताईची मनःस्थिति, रावजी व त्यांची पत्नी यांच्यांतील कलह, आईच्या प्रेतावर भाऊनें घेतलेली शपथ, भाऊनें आपले ढंग सोडण्याविषयींचा आजीचा आग्रह व त्रागा, पतीच्या आजारानंतरची ताईची वागणूक व तिनें भाऊला लिहिलेलीं पत्रें, मामांचें पत्र, शिवरामपंतांचे उपदेश, भावानंदाचा अंतकाल, हे सर्व भाग इतके सुंदर व मनोहर उतरण्याचें कारण त्यांतील व्यक्तींचें भावनानिदर्शन. भावानंदाच्या अंतकालाच्या वर्णनाचें एकच उदाहरण घेऊन त्या प्रसंगांतील व्यक्तींशीं समरस होऊन वाचकाचें अंतःकरण दुःखातिरेकानें क्षणभर कसें भरून येतें, तो भाग मोठ्यानें वाचीत असल्यास मधून मधून गळा दाटून येऊन वाचणें कसें बंद पडतें, हें पाहण्यासारखें आहे. तेवढा वेळ आपण कादंबरी वाचीत आहोंत हें विसरल्यासारखें होतें. लहान-थोर, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, या सर्वांच्या भावना हरिभाऊंनीं मोठ्या कुशलतेनें व्यक्त केल्यामुळें ह्या सर्व, व्यक्ती खरींखुरीं सत्यसृष्टींत वावरणारीं माणसें आहेत, असा भास उत्पन्न होऊन

प्रस्तुत कादंबरी हें एका होऊन गेलेल्या महात्म्याचें चरित्रच आहे असें वाटूं लागतें. इतकेंच काय, पण 'मी' ही कल्पित कादंबरी आहे, हें माहीत नसणाऱ्या व्यक्ती आजही सांपडतील.

**स्वभावनिदर्शन**

कादंबरींतील पात्रांचें यथार्थ स्वभावनिदर्शन करण्यालाही लेखकाच्या अंगीं चांगलें कौशल्य लागतें. विशेषतः सामाजिक कादंबऱ्यांतील व्यक्तीचा स्वभाव वर्णन करणें अधिक कठिण आहे. स्वभाव वर्णन करण्याचे दोन प्रकार आहेत. एक लेखकानें स्वतः एखाद्या व्यक्तीच्या स्वभावाचें सविस्तर वर्णन करणें; दुसरा त्या व्यक्तीच्या कृतींतून व भाषणांतून तो व्यक्त करणें. दुसरा प्रकार केव्हांहि अधिक सरस. पहिल्या प्रकारांत स्वभाव परप्रकाशी असतो. दुसऱ्यांत तो स्वयंप्रकाशी असल्यामुळें ती व्यक्ति साक्षात् आपल्या डोळ्यांसमोर उभी राहून तिचें अस्तित्व सत्य भासूं लागतें. प्रस्तुत कादंबरींत दोन्हीही प्रकार पहावयास सांपडतात. तथापि हरिभाऊंचा विशेष भर दुसऱ्या प्रकारावर असतो. भाऊच्या शाळेंतील सर मास्तर, असिस्टंट मास्तर, हीं पात्रें उदाहरणार्थ घेतल्यास त्यांचें स्वभावनिदर्शन दोन्ही तऱ्हेनें झालें आहे. त्याचप्रमाणें शिवरामपंतांचा स्वभावहि दोन्ही प्रकारांनीं व्यक्त झाला आहे. त्यांच्या स्वभावाचें हरिभाऊंनीं स्वतः वर्णन केलें आहे; शिवाय त्यांनीं भाऊला वेळोवेळीं केलेल्या उपदेशांतहि त्यांचा स्वभाव चांगला प्रतिबिंबित होतो. भाऊ, ताई, भाऊची आई, रावजी वगैरे व्यक्तींचे स्वभाव विशेषतः त्यांच्या कृतींत व भाषणांतच अधिक व्यक्त होतात. हरिभाऊ स्वभावनिदर्शन किती उत्कृष्ट करतात हें एका 'मी' कादंबरीवरून सुद्धां सहज पाहतां येईल. ह्या सर्व पात्रांचें स्वभाववर्णन तिसऱ्या प्रकरणांत झालेंच असल्याकारणानें त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं.

ललितकलाकृतींत सत्याभास उत्पन्न करणें अवश्य असतें. कला-

**सत्याभास** कृति केव्हांही कृत्रिमच असणार, परंतु प्रेक्षकाच्या मनांत क्षणभर त्या कृत्रिमतेची जाणीव राहूं न देतां सृष्टींतलाच एक देखावा किंवा प्रसंग आपण पहात आहोंत, असा भास उत्पन्न करण्यांत कलेचें खरें कौशल्य दिसून येतें. 'कलेंतील कलेचा लोप म्हणजेच कला,'* अशा अर्थाचें इंग्रजींत एक वाक्य आहे. हेंच दुसऱ्या शब्दांनीं सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, कलेंत सत्याभास उत्पन्न झाला पाहिजे. तो जितक्या मानानें उत्पन्न होईल, तितक्या मानानें आपण ती पहात असतांना आपलें देहभान विसरतों. कादंबरी सुद्धां एक कलाकृतिच असते, म्हणून तिच्यांत हा सत्याभास उत्पन्न करण्याचा कादंबरीकार प्रयत्न करतात. लॉर्ड लिटन या प्रख्यात इंग्रज कादंबरीकारानें "Last Days of Pompey" ('पॉंपे शहराचे अखेरचे दिवस') नांवाची एक उत्कृष्ट कादंबरी लिहिली आहे. तिच्या शेवटच्या शें-सवाशें पृष्ठांत त्यानें प्राचीन इटली देशांतील 'व्हेसुव्हिअस' ज्वालामुखीच्या पायथ्याशीं वसलेल्या पॉंपे शहराचा भूकंपाच्या प्रचंड धक्क्यांनीं व त्या ज्वालामुखीच्या स्फोटामुळें त्यांतून बाहेर येणाऱ्या 'लाव्हा' रसाच्या अलोट प्रवाहांनीं नायनाट झाला त्या प्रसंगाचें वर्णन केलें आहे. तें वर्णन त्यानें इतकें हुबेहुब केलें आहे, व त्यांत इतका सत्याभास उत्पन्न झाला आहे कीं, तीं शेंसवाशें पृष्ठें वाचतांना आपलें देहभान विसरून जाऊन वाचकालाही, या भूकंपामुळें शहरांतील इमारती हदरतांना पाहून, आपणही रस्त्यांतून इतरांप्रमाणें अंग चोरून जावें असें वाटूं लागतें.

कादंबरींत सत्याभास उत्पन्न करण्यास लेखक निरनिराळ्या युक्त्या योजतात. ह्या दृष्टीनें 'मी' कादंबरींत सत्याभास कसा उत्पन्न केला

---

* Art lies in concealing art.

आहे, हें पहाणें मनोरंजक होईल. सामाजिक कादंबरींत व्यक्ति व प्रसंग विवक्षित समाजांतलेच असल्यामुळें स्वाभाविकपणेंच तिच्यांत सत्याभास बराचसा उत्पन्न होतो. ' मी ' कादंबरींतील सर्व पात्रें आपल्या समाजांत दिसणारीं आहेत. मुंबईचा प्रवास, कवठाची चोरी, शाळेंतील लहान मुलांचीं भांडणें व समेट, वगैरे योजिलेले विविध प्रसंगहीं वाचकाच्या नेहमींच्या परिचयाचे आहेत. स्वभावनिदर्शन यथायोग्य झाल्याकारणानें त्या त्या व्यक्ती जणूं काय सत्यस्वरूपांत आपल्यापुढें उभ्या आहेत असें वाटतें. भावानंद, ताई, शिवरामपंत वगैरे सर्व व्यक्ती आपल्यापुढें एकसारख्या वावरत आहेत असा भास होतो. त्यांच्या तोंडीं घातलेली भाषा त्यांना स्वाभाविकपणें अनुरूप दिसावी अशी आहे. आजीची व आईची घरगुती बायकी भाषा; राव-जीची नादी, लहरी मनुष्याची भाषा; शिवरामपंतांची विचारदर्शक, तर्कशुद्ध, प्रौढ भाषा; भावानंदाची उदात्त, उदार, स्वार्थत्यागी महा-त्म्याला साजेशी भाषा; या पात्रानुरूप भाषांच्या योगानें कादंबरीला स्वाभाविकपणा आला आहे. परंतु हा सत्याभास पूर्णपणें उत्पन्न होऊन, आपण एका होऊन गेलेल्या महात्म्याचें चरित्र वाचीत आहोंत, असा भास उत्पन्न होण्याकरितां हरिभाऊंनीं आणखी कांहीं योजना केल्या आहेत. यांतील अत्यंत यशस्वी योजना कादं-बरीला आत्मचरित्राचें रूप देण्याची. आपल्या मित्राच्या इच्छेवरून भावानंद स्वतःच आपलें चरित्र निवेदन करीत असल्यामुळें, तो प्रत्यक्ष नेहमीं आपल्या डोळ्यांसमोर उभा असतो. पुढें त्याच्या पुण्यांतील घराचें अत्यंत सविस्तर वर्णन केल्यानें व तें सदाशिव पेठेंत आहे असें सांगितल्यानें, त्याच्या अस्तित्वाबद्दल आणखी खात्री होऊं लागते. त्या-प्रमाणेंच शिवरामपंत, भाऊ वगैरे मंडळी एक दिवस सकाळीं फिरा-वयास जातात, त्यावेळचें फर्ग्यूसन कॉलेजजवळील टेकडीचें, ताईला स्टेशनवर पोंचवून भाऊ बंडगार्डनवर जातो तेव्हांचें बंडगार्डन–रस्ता

व खुद्द बंडगार्डन यांचें, व एक दिवस शिवरामपंत व भाऊ डेक्कन कॉलेजांतून परत येत असतांना त्या रस्त्याचें, अशीं हीं नेहमींच्या परिचयाच्या स्थळांचीं यथार्थ वर्णनें घातल्यानेंही चरित्राची सत्यता आणखीच वाटूं लागते. शेवटीं भावानंदाच्या अंतकालचें वर्णन, त्यानें लिहिलेलें आत्मचरित्र मृत्यूनंतर प्रसिद्ध करण्याची त्याची इच्छा, " राष्ट्रांची उन्नति व अवनति,—त्याची मीमांसा व कारणें, " हा त्यानें वेळांत वेळ काढून लिहिलेला निबंध, मठाची आपल्यामागें करून ठेविलेली व्यवस्था, रामानंदानें अगदीं शेवटीं या महात्म्याची गायिलेली महती वगैरे सत्याच्या छटा चांगल्या साधल्या आहेत.

**नाट्य-प्रसंग**

नाटक किंवा कादंबरी यांत केव्हां केव्हां असे कांहीं विशिष्ट प्रसंग निर्माण केलेले असतात कीं, त्यांची त्यांतील पात्रांना जाणीव नसते, परंतु प्रेक्षक किंवा वाचक यांना मात्र असते. आपण त्यांना ' नाट्य-प्रसंग ' असें नांव देऊं. असे प्रसंग केव्हां विनोदी व हास्यकारक, तर केव्हां करुणाजनक असतात. या नाट्यप्रसंगांनीं कादंबरींत मधून मधून चटकदारपणा आणतां येऊन ती मनोरंजक करतां येते. प्रस्तुत कादंबरींत असे कांहीं नाट्यप्रसंग आले आहेत. भाऊ मुंबईस आपल्या वडिलांच्या खोलींत गेला असतांना जप्ती आणणारा बेलिफ दार लावून निघून जातो. आपण खोलींत अडकल्याची भाऊला जाणीव नसते, पण वाचकांना ती असते. शाळेंत वर्गामध्यें भाऊ व विनायक यांची मारामारी चालली असतांना तेथें हेडमास्तर अवचित येतात. इतर मुलें गप्प बसतात, पण भाऊला त्याची दाद नसते. ' सर ' म्हणून विनायकानें हांक मारतांच, " आतां कां मागुबाई ' सरां'ना हांका मारते, " असें म्हणून तो विनायकाला खालीं पाडून त्याच्या छातीवर बसणार, तोंच त्याच्या पाठीवर दणकन् धपाटा बसतो. दुसरा कोणी तरी मुलगा आपल्याला धपाटा मारीत आहे असें समजून,

भाऊ, " असा मागून कां ? पुढें ये, भागूबाई ! " असें बोलून माग पहातो. तों कोण ? त्याचे सर.[1] कागद शोधतांना भाऊवर आलेला कवठांच्या चोरीचा आळ, भाऊ व ताई यांच्या कुंजांतील भेटींत परस्परांचा होणारा गैरसमज, भाऊ भावनावश होऊन आजन्म ब्रह्मचारी राहून जनसेवेची शपथ घेतो तोंच शिवरामपंत त्यास सुंदरीशीं लग्न करण्याविषयीं सुचवितो, ह्या सर्व प्रसंगांनीं कादंबरीचें सौंदर्य बरेंच वाढलें आहे.

साम्य-विरोध

पात्रें व प्रसंग यांत साम्य किंवा विरोध उत्पन्न करून कादंबरीकार आपली कादंबरी चित्ताकर्षक करतात. साम्यापेक्षांही विरोधाचा परिणाम अधिक होतो. ' मी ' कादंबरींत साम्य व विरोध दोन्हीही दाखविलीं आहेत. साम्याच्या दृष्टीनें ताई व तिची आई ह्या मायलेकी चटकन् नजरेंत येतात. त्यांच्यांतील साम्य मागील प्रकरणांत दाखविलेंच आहे. त्यांच्या केवळ कष्टप्रद परिस्थितींतच साम्य आहे असें नाहीं. त्यांच्या चेहऱ्यांतही विशिष्ट परिस्थितींत साम्य दाखविलें आहे. त्याचें वर्णन करतांना भाऊ म्हणतो, " त्या चघळ म्हाताऱ्याचें अघळपघळ भाषण ऐकून ताई आतां काय बोलते याचें मला भयच पडलें होतें. तिची चर्या फारच विलक्षण दिसली. त्या वेळीं मला एक विलक्षण चमत्कार दृष्टीस पडला. आमची आई अत्यंत दृढ निश्चयानें, संतापानें व खेदानें बोलूं लागली, म्हणजे तिचा जसा चेहरा होई तसा हुबेहुब ताईचा झाला. क्षणमात्र या दोघींच्या चेहऱ्यांकडे पाहिल्याबरोबर तें विलक्षण साम्य पाहून, आईच्या व तिच्या चेहऱ्यांकडे मी दोनदां तीनदां पाहून तितक्यांतल्या तितक्यांत अगदीं चकित झाल्यासारखा झालों. दोघींच्या चेहऱ्यांत त्या वेळीं इतकें साम्य वाटलें कीं, ते आईचेच दोन

---

१ पृ. ५३.

वेळचे दोन चेहेरे असावेत असें मला वाटलें."[१] त्याचप्रमाणें भाऊ व सुंदरी यांची मुंबईत रावजींच्या खोलींत प्रथम भेट होते, त्या वेळीं ह्या दोन लहान मुलांच्या अनागस बालस्वभावांतील साम्य रम्य वाटतें. सुंदरीची आई व सुंदरी या मायलेकींतही असेंच साम्य दिसतें. तथापि वर सांगिल्याप्रमाणें साम्यापेक्षां विरोधच अधिक रम्य व परिणामकारक होतो. विरोधाच्या पार्श्वभूमीनें मुख्य चित्र अधिक उठून दिसतें असें आपण चित्रकलेंतही पहातों. ह्या दृष्टीनें पाहतां शिवरामपंतांचें कुटुंब व रावजींचें कुटुंब, सुंदरीची आई व भाऊची आई, गृहशिक्षणांत वाढलेली सुंदरी व त्याशिवाय वाढलेला भाऊ, सर मास्तर व ॲसिस्टंट मास्तर, या जोड्यांतील विरोध पहाण्यासारखा आहे. विषम पात्रांची जोड मिळाल्याकारणानें, शिवरामपंतांचें कुटुंब, सुंदरीची आई, सुंदरी, ॲसिस्टंट मास्तर हीं पात्रें उठून दिसतात.

**मानवी-स्वभावाचें ज्ञान**

पात्रांचें स्वभावचित्र यथार्थ काढतां येण्यास कादंबरीकाराच्या अंगांत पुढील गुणांची अवश्यकता असते; मानवी स्वभावाचें ज्ञान, मनोविश्लेषण, पात्रांशीं समरस होणारें अंत:करण व निरीक्षण. मनुष्याच्या स्वभावाचें त्याला जितकें ज्ञान अधिक, तितकें त्याच्या पात्रांचें स्वभावचित्र अधिक स्वभावसुंदर व मनोहर उतरेल. अगदीं सामान्य प्रतीचा कादंबरीकार आपल्या पात्रांचें वर्णन वर वर करतो. तो त्याचें शरीर, चेहरा, कपडे वगैरेंचें वर्णन करील. परंतु त्याच्या मनांत शिरून त्याचे विचार व भावना यांचें चित्र त्याला काढतां येत नाहीं. केव्हांही बाह्यवर्णनापेक्षां अंतर्वर्णन अधिक सरस असतें. रसिक वाचकाचें त्याच्याकडे लक्ष अधिक वेधतें. हरिभाऊंना मानवी मनाचीं व अंतःकरणाचीं चित्रें फार मनोहर काढतां येतात,

१ पृ. १८९.

हे कांहीं थोड्या उदाहरणांवरून सहज कळून येईल. भाऊची आई सुंदरीच्या आईशीं त्याच्याविषयीं बोलतांना, " हा मेला असा द्वाड आहे तर कांहीं पुसूं नका. याला दया नाहीं, माया नाहीं, कांहीं नाहीं, " असें सांगते. त्यावर सुंदरीची आई मातृस्वभावाला अनुसरून म्हणते, " असं काय हो, तो लहान आहे........तसं म्हणाल तर ही आमची महामाया काय कमी आहे ! अशी दांडगाई करते तर कांहीं पुसूं नये. "[१] हें बोलत असतांना सुंदरीला अगदीं आपल्या पोटाशीं घट्ट धरून ती मोठ्या प्रेमानें तिचा मुका घेते. ह्या प्रसंगाच्या पूर्वीं भाऊची आई त्याला कळवळण्याइतक्या जोरानें दोन तीन रपाटे मारते व सुंदरीची आई दया येऊन मध्यस्थी करूं लागते तेंव्हां म्हणते, " अहो, तुम्हांला काय कारट्याच्या कृती ठाऊक ? अहो, परवां आणली होतीन् आमच्या सगळ्यांच्या गळ्याला फांस लावायची वेळ. याच खोलींत जळून मेला असता. "[२] असें म्हणून तीच एकाएकीं रडूं लागते. तसेंच पुढें, ' पोरगं भारी निवळलं, ' असे उद्गार काढीत असतांना भाऊला त्या ठिकाणीं अकस्मात् येतांना पाहून ती म्हणते, ' मेल्या, आडून उभा राहून बोलणीं ऐकतोस का ? दम धर........'[३] ह्या तिन्हीं प्रसंगांतील परिस्थिति भिन्न, पण त्यांत प्रतिबिंबित झालेलें प्रेमळ मातृहृदय एकच. सुंदरीचें बिऱ्हाड पहावयास जात असतांना, " आपल्या मनांतला बेत उच्चार करून दाखविल्यानें विशेष आनंदकारक होईल, असें वाटूनच काय, मी आपल्याशींच एक दोनदां मोठ्यानें बोललों, "[४] असें भाऊ सांगतो; नवऱ्यानें ठुशी मागितल्यावर भाऊची आई त्याला " पुरे पुरे झालं. मी इतर बायकांसारखी नाहीं करारी आहें वगैरे ",[५] असें मोठ्या धैर्यानें व निश्चयानें म्हणते, पण त्याच क्षणीं गळा सद्गदित होऊन तिच्या डोळ्यांतून अश्रू

---

१ पृ. २७; २ पृ. २६; ३ पृ. ८४; ४ पृ. १२६; ५ पृ. १५२.

वाढूं लागतात; नेहमीं तर्कशुद्ध विचार करणारे शिवरामपंत एका प्रसंगीं भाऊला कंठ सद्गदित होऊन म्हणतात, "मी आहें तोंपर्यंत ठीकच आहे. परंतु माझ्या पश्चात दोन गोष्टी मी तुझ्या आणि तुझ्या ताईच्या स्वाधीन करणार आहें. एक माझा पंथ, आणखी दुसरी माझी मुलगी. बहीण या नात्यानें तिचा तूं सांभाळ कर. ती स्वतंत्रपणें राहणें शक्य नाहीं. तूं आणखी तुझी ताई तिचा आधार."[1] पुढें त्यांच्यानें बोलवत नाहीं. ह्या प्रसंगांत भाऊ, त्याची आई व शिवरामपंत ह्यांच्या अंतः-करणांतील उत्कंठा, दुःखातिरेक व स्नेह ह्या भावना किती समर्पक दाखविल्या आहेत. असे आणखीहि प्रसंग सांपडतील. हरिभाऊ मानवी मनाशीं व अंतःकरणाशीं चांगले परिचित असल्याकारणानें आपल्या पात्रांचे विचार व भावना यथार्थ रंगवून वाचकाचें मनोरंजन करू शकतात.

**मनोविश्लेषण; विचार-विकास.**

हरिभाऊंचें मनोविश्लेषण व विचारविकास पाहून मार्मिक वाचकाचें चांगलें मनोरंजन होतें. मानवी मनांत चाल-लेल्या विचारव्यापारामुळें मनुष्याच्या हातून क्रिया घडत असतात. अशा कृतींचा उगम कोणत्या विचारापासून झाला हें पहाणें, किंवा तिचा विचारदृष्ट्या कार्यकारणभाव समजणें, मनोरंजक होतें. त्याचप्रमाणें एखाद्या व्यक्तीच्या मनांत एक विचार आल्यावर त्याचा विकास कसा होत गेला, हें कादंबरींत दाखविल्यास कादंबरीकाराचा मानवी मनाचा अभ्यास व निरीक्षण दृष्टीस पडतात. अशा प्रकारें एखाद्या पात्राच्या मनोव्यापाराचें चित्र रेखाटल्यास स्वभावनिदर्शनांत स्वाभाविकपणा येतो. उदाहरणार्थ, भाऊला लखोट्यांचें वेडच लागतें त्याविषयीं तो म्हणतो, "लहानपणची मौज असते ती हीच. लोकांनीं जी गोष्ट

1 पृ. ३८४.

स्थळ प्रत
नं. ..........
ता. ..........

नाहीं म्हटली, ती गोष्ट अवश्य पाहिजे. जें करूं नको म्हटलें, तें अवश्य केलेंच पाहिजे. मी लखोटा लखोटा करीत असतां माझ्या आईनें अगर आजीनें जर कांहीं तरी एखादा कोणाचा पोष्टांतला लखोटा माझ्या हातीं दिला असता, तर मला वाटतें मी अगदीं संतुष्ट होऊन बसलों असतों. परंतु त्यांनीं तसें कांहीं एक न करतां मला केवळ दाबलें, अर्थात्च आमच्या उत्कंठेनें जास्त जोर केला. "[1] एक दिवस संध्याकाळीं भाऊला विनायक भेटतो आणि आपलें सुंदरीशीं लग्न ठरल्याचें सांगतो. त्या वेळीं भाऊनें आपल्या मनांत उत्पन्न झालेल्या मत्सराची मनोमीमांसा केली आहे.[2] अशीं आणखीही उदाहरणें सांपडतील. विवक्षित परिस्थितींत पात्राशीं समरस होऊन त्याच्या विचारांचा विकास कसा होतो हें हरिभाऊ चांगलें दाखवितात. भाऊच्या आईच्या मृत्यूनंतर मामा समाचारास येतात, त्या वेळीं ते ताईनें नवऱ्याच्या घरीं जावें असें सुचवितात. तेव्हां भाऊ त्यांना 'ती त्या थेरड्याच्या घरीं साफ जाणार नाहीं' असें निक्षून सांगतो. त्यानंतर तो एकटाच विचार करीत बसला असतांना ताईची करुणमूर्ति पाहून व तिनें करुणस्वरानें आपल्याला हांका मारलेल्या ऐकून त्याच्या मनांत एकामागून एक विचार कसे येतात हें पहाण्यासारखें आहे.[3] जन्मभूमीची सेवा करावी हा विचार मनांत येऊन देशहित साधण्याच्या दृष्टीनें देशकार्याची दिशा कशी असावी ह्याविषयीं भाऊ विचार करूं लागतो, तेव्हांचीही विचारमालिका लक्ष्यांत घेण्यासारखी आहे.[4] ह्या निरनिराळ्या प्रसंगींच्या विचारनिदर्शनावरून हरिभाऊ पात्राशीं तादात्म्य कसे पावतात हें दिसतें.

**समरसता**

उत्कृष्ट प्रकारचें स्वभावचित्र उतरण्यास लेखकाला त्या व्यक्तीशीं समरस व्हावें लागतें. एखाद्या व्यक्तीचा स्वभाव, स्थलाचें चित्र किंवा प्रसंगाचें वर्णन उत्कृष्ट उतरलें असलें, तर वाचकाला आपण ती वस्तु-

१ पृ. १९; २ पृ. १४०; ३ पृ. २०८; ४ पृ. ३५७-३६०.

स्थिति अनुभवीत आहोंत असा भास उत्पन्न होतो; येवढेंच नाहीं, तर केव्हां केव्हां तो तिच्याशीं इतका तादाम्य पावतो कीं, तो आपलें देह-भान सर्वस्वीं विसरून जातो. प्रतिभावान् लेखकाचीही हीच स्थिति होते. तो कल्पनानिर्मित पात्राशीं अगदीं समरस होऊन गेल्याशिवाय त्याला उत्कृष्ट स्वभावचित्र साधत नाहीं. भाऊ व सुंदरी यांचा रावजीच्या खोलींत गांठ पडल्यानंतरचा दाखविलेला बालस्वभाव; पुढें सुंदरीच्या आईजवळ तिची व भाऊची वागणूक व भाषणें; शाळेंतील मुलांचीं भांडणें, समेट व त्यांत निर्दिष्ट होणारा त्यांचा स्वभाव; " बाबारे ! आम्ही घरांत बांधलेलीं मुकीं जनावरें ! " ह्या प्रकरणांत दिसून येणारें ताईचें अंतःकरण; रावजी व त्यांची पत्नी यांच्या भांडणांत दृष्टीस पडणारा उभयतांचा स्वभाव वगैरे उत्कृष्ट स्वभाव-चित्रांचीं अनेक उदाहरणें प्रस्तुत कादंबरींत पहावयास सांपडतील. हरिभाऊंच्या मनांत लहान मुलांविषयीं प्रेम, स्त्रियांच्याविषयीं पूर्ण सहानुभूति व निःस्वार्थी देशसेवेची उदात्त भावना सदैव वसत असल्या-मुळें भाऊ व सुंदरी, ताई व ताईची आई, भावानंद व शिवराम-पंत इत्यादि पात्रांशीं समरस होऊन त्यांनीं त्यांचीं नितांतमनोहर व यथार्थ स्वभावचित्रें काढलीं आहेत.

**निरीक्षण**

वरील गुणाइतकाच कादंबरीकाराच्या अंगीं निरीक्षण करण्याचा गुण असणें अवश्य आहे. प्रतिभासंपन्न चित्रकार काय किंवा कादंबरीकार काय, दोघांनाही कल्पनाशक्तीनें व्यक्ती, प्रसंग व स्थळें निर्माण करतां येतात. तथापि या कल्पनेच्या खेळाचा पायाच सृष्ट पदार्थांवर अवलंबून असतो. क्षीरसमुद्र, मेरुपर्वत किंवा मेघदूत हीं कल्पनानिर्मित आहेत. पण सत्य सृष्टींतील क्षीर व समुद्र, सुवर्ण व पर्वत, आणि मेघ व दूत, ह्यांचें अस्तित्व नसतें, तर ही कल्पनासृष्टि कशी उभी राहिली असती ? कल्पनेचा हा उगम ध्यानांत घेतला म्हणजे निरीक्षणाची

कलानिर्मितीला किती अवश्यकता आहे हें सहज समजेल. कल्पनेला चालना देणाऱ्या सृष्टींत अंतःसृष्टि व बाह्यसृष्टि या दोहींचा अंतर्भाव होतो. कादंबरीकार जगांत वावरतांना डोळे उघडे ठेवून या दोन्ही सृष्टींचें निरीक्षण करील, तरच त्याच्या कल्पनेला विस्तृत क्षेत्र मिळून त्याला मानवी स्वभावाचीं व व्यवहाराचीं सुंदर चित्रें कल्पितां येतील. ' मी ' कादंबरींतील विविध प्रसंग किंवा स्वभावचित्रें पाहिलीं असतां हरिभाऊ जगाचें सूक्ष्म निरीक्षण कसें करतात हें दिसतें. त्याशिवाय त्यांना हे प्रसंग किंवा स्वभाव इतक्या बारकाईनें रंगवितां आले नसते. भाऊचें आंगठ्याचें रसपान व हातावर बसणारी आईची झणझणीत चापटी, आजीजवळ भाऊ निजला असतांना त्याला लोळतांना पाहून, " काय बाई या पोराच्या लोळण्याला आतां करावं ? " हे तिच्या तोंडून निघालेले शब्द, रावजीच्या खोलींतील वस्तूंची यादी, भाऊचें पुस्तकाचें तोस्तान व त्यांतील वस्तू, ॲसिस्टंट मास्तरांच्या विद्यार्थ्यांनीं केलेल्या चेष्टा, विनायकाच्या भांडणानंतर इतर सोबत्यांच्या मध्यस्थीनें भाऊचा व त्याचा झालेला समेट, त्याची पूर्व तयारी, त्याच्या अटी वगैरेंचें वर्णन, सुंदरीच्या आईला मोठा सदरा शिवतांना पाहून भाऊनें केलेलीं प्रश्नोत्तरें, भाऊ शाळेंतून घरीं आल्यावरच्या त्याच्या खोड्या व रेंगाळणें, भाऊच्या आईच्या घेरीनंतरच्या आजाराचें व अंतकालचें वर्णन, शिवरामपंत, भाऊ, ताई वगैरे मंडळी सकाळीं हिंडावयास गेलीं त्याचें वर्णन व त्या वेळचीं भाषणें, आजीचा भाऊनें नवीन ढंग सोडण्याविषयीं आग्रह व त्रागा, भावानंदाच्या अंतकालचें वर्णन, हीं सर्व वर्णनें हरिभाऊंच्या निरीक्षणाची साक्ष देण्यासारखीं आहेत.

आतांपर्यंत निदर्शित केलेले कादंबरीकाराचे गुण कलाकृतींत सत्याभास उत्पन्न करून तिच्यांत कल्पनेनें सौंदर्य व चित्ताकर्षकता आणण्याकरितां लागतात. तथापि कांहीं कादंबऱ्यांत कल्पनेच्या मनोहर

४२३३

खेळांबरोबर उदात्त विचार, तत्त्वज्ञान, शास्त्रीय सिद्धांत इत्यादि ज्ञानप्रद विषय गोंवलेले असतात. काव्यादि ललितवाङ्मयांत ज्ञानप्रद अथवा संस्कृतिजनक विषय यावा कीं नाहीं, हा नेहमींचा वादाचा विषय आहे. त्याचा या ठिकाणीं सविस्तर विचार करणें शक्य नसलें तरी थोडेंसें विवेचन करण्यास हरकत नाहीं.

केवळ कलेकरितांच कला या दृष्टीनें विचार केल्यास, कलाकृतीला एखाद्या तात्विक ज्ञानप्रद विषयाची अवश्यकता मुळींच नाहीं. कालिदासाच्या 'मेघदूता'सारखें सुंदर काव्य पाहिल्यास त्यांतून प्रत्यक्ष अशी कोणती शिकवण किंवा तत्त्व काढणार? तथापि आज तेराशें वर्षें रसिक वाचकवर्ग तें वाचतांना मान डोलवीत आहे. आतां जर इतक्या उत्कृष्ट काव्यांत किंवा कादंबरींत लेखकानें कलाविलासाची यत्किंचित्‌ही हानि न करतां त्यांतील सर्व सौंदर्य कायम ठेवून एखादें तत्त्व वाचकाला अगदीं न कळत ग्रहण करतां येईल अशा कुशलतेनें गोंविलें, तर त्याला प्रत्यवाय कां असावा हें समजत नाहीं. उलट असें म्हणतां येईल कीं, दुधांत साखर या न्यायानें, ती कलाकृति अधिक मनोहर होऊन वाचकाचें मन त्याला न कळतां संस्कृत करण्यास मदत करील. ह्या म्हणण्यावर प्रतिपक्षाचें असें उत्तर येतें कीं, अशा कादंबरीचा वाचक तिच्यांतील तत्त्व किंवा शिकवण ग्रहण करीत असतांना, त्याचें मन द्विधा होऊन त्याला त्या कादंबरीचा रसास्वाद पूर्णपणें अनुभवितां येत नाहीं. या आक्षेपाचें उत्तर वरील वाक्यांतच आहे. तत्त्व किंवा शिकवण कलाकृतींत गोंवावयाची, ती वाचक न जाणतां ग्रहण करील अशा कुशलतेनें गोंविली पाहिजे. तिचा परिणाम वाचकाच्या मनावर अप्रत्यक्षपणें होणार. दुसरें असें कीं, तत्त्व किंवा शिकवण यांचा कादंबरींत बेमालुमपणें अंतर्भाव करणें, हेंही कलेचें एक अंग कां होऊं नये? कला म्हणजे केवळ कल्पनेचा खेळ अशी एखाद्याची समजूत असल्यास, ती सत्याला सोडून आहे. तिच्यांत कल्पनेच्या

खेळाबरोबर कलारूपानें मानवी मनाचें व व्यक्तींचें सत्य स्वरूप दाखविलेलेंच असतें. त्याचाही वाचकाच्या मनावर प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणें परिणाम होत असतो. हीं सत्यें जर कादंबरींत येऊं शकतात व तीं जितक्या मानानें अधिक येतील तितक्या मानानें जर कादंबरी अधिक सरस ठरते, तर शास्त्रीय किंवा तात्त्विक सत्यें कां येऊं नयेत व त्यांच्या योगानें कादंबरी अधिक सरस कां होऊं नये ? ह्या सत्यांच्या योगानें कादंबरींत कांहीं उणीव येत असेल, तर ती कादंबरीकाराच्या कमकुवतपणामुळें; आणि लेखक लायक नसेल, तर तत्त्वविवेचन वगैरे शिकवण नसलेल्या केवळ काल्पनिक कादंबरींतही उणीवा राहतील. दुसरी ही एक गोष्ट विचारांत घेण्यासारखी आहे. ती ही कीं, आजपर्यंत जगांत जे मोठे कवी होऊन गेले, त्यांनीं फार करून कांहीं तरी तत्त्वें किंवा शिकवण योजूनच आपलीं काव्यें केलीं आहेत. जगांत मान्यता पावलेल्या ललितवाङ्मयांत केवळ कलेकरितां लिहिलेले असे किती ग्रंथ सांपडतील ? मराठी कादंबऱ्यांचाच विचार केला, तर हरिभाऊ आपटयांच्या कादंबऱ्या आपलें नांव आज पन्नास वर्षें टिकवून आहेत. असें नांव टिकवून धरणारे मराठींत किती कादंबरीकार सांपडतील ? साधारण अनुभव असा कीं, नव्या कादंबरीचा चार दिवस बोलबाला व्हावा व त्या लेखकाची दुसरी नवीन कादंबरी प्रसिद्ध झाली म्हणजे जनतेला पहिलीचें विस्मरण होऊं लागावें. सारांश, केवळ कलेकरितां कादंबरी लिहितां यावयाची नाहीं असें नाहीं. तिच्यांत तत्त्वविवेचन किंवा शिकवण असलीच पाहिजे असा आग्रह धरण्याचें कारण नाहीं. तरी पण तत्त्वविवेचनाच्या किंवा शिकवणीच्या योगानें कादंबरी अधिक सरस होते यांत शंका नाहीं. अर्थात् ह्या कादंबऱ्यांचें वातावरण उच्च, उदात्त असल्यामुळें असंस्कृत वाचकांस अशा कादंबऱ्या इतर कादंबऱ्यांइतक्या आवडणार नाहींत. ‘ मी ’, ‘ रागिणी ’, ‘ इंदु काळे व सरला भोळे ’ या उच्च दर्जाच्या कादंबऱ्या कांहीं वाचकांचें मनोरंजन

करूं शकत नाहींत. पण त्याकारणानें या कादंबऱ्यांची योग्यता कमी न ठरतां, त्या वाचकवर्गाची संस्कृति व शिक्षण हीं त्यांच्या दर्जाची नाहींत येवढेंच म्हणतां येईल.

हरिभाऊंनीं 'मी' कादंबरींत स्त्रीशिक्षण व देशसेवेला अवश्य वाटणाऱ्या स्वार्थत्यागाचें तत्त्व, व ह्यांच्या अनुषंगानें गृहशिक्षणादि इतर विषय, या सर्वांचा मोठ्या कुशलतेनें अंतर्भाव करून, तिला उच्च दर्जा प्राप्त करून दिला आहे. त्यांनीं ही शिकवण पात्रांच्या मुखीं शुष्क-कंटाळवाणीं व्याख्यानें घालून किंवा निबंधवजा पॅरिग्राफ लिहून दिली नाहीं. तर निरनिराळ्या व्यक्तींची परिस्थिति, त्यांचे स्वभाव, त्यांच्या आयुष्यांत घडून येणारे वृत्तांत ह्यांच्या द्वारें दिली आहे. भावानंद व शिवरामपंत ह्यांच्या मुखांतून निघालेले देशसेवेचे व स्वार्थत्यागाचे विचार वाचतांना आपल्याला ते कंटाळवाणे वाटत नाहींत. ते त्यांच्या चरित्राशीं संकलित झालेले असल्यामुळें त्यांना भावनेची जोड मिळाली आहे. ह्या गुरुशिष्यांचीं हीं भाषणें वाचीत असतांना वाचकाच्या मनांत क्षणभर देशसेवेची स्फूर्ति उत्पन्न होते. या दोघांचें स्वभावनिदर्शन करतांना मागें त्यांच्या भाषणांतील उतारे दिले आहेत. त्यांची आतां पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. दुसरा विषय स्त्री-शिक्षण. शिक्षणाच्या अभावीं स्त्रियांची कशी असहाय दीन स्थिति होते, त्यांचीं मुलें गृहशिक्षणाला कशीं पारखीं होतात, हें हरिभाऊंनीं ताई व तिची आई यांच्या चरित्रानें यथार्थ दाखविलें आहे. त्यांच्या भाषणांतीलहि उतारें मागें आलेच आहेत. ह्या विषयाच्या अनुषंगानें मुलांचें गृह-शिक्षण व शाळेंतील शिक्षण या दोहींचें गुणदोष दाखविले आहेत. ते त्यांनीं सुंदरी, भाऊ व ताई ह्यांच्या घरचीं व भाऊच्या शाळेची एकंदर परिस्थिति दाखवून दाखविले आहेत. हरिभाऊंनीं स्वतः या निरनिराळ्या विषयांवर आपले विचार प्रकट केले नाहींत असें नाहीं. परंतु ते फारच थोड्या वेळीं व थोडक्यांत केले आहेत.

तत्त्वविवेचनाकरितां विशिष्ट विषयांचा अंतर्भाव करण्याशिवाय दुसऱ्याहि एका साधनानें 'मी' कादंबरींत मधून मधून उच्च, उदात्त वातावरण निर्माण केल्यानें कादंबरीच्या सौंदर्यांत भर पडते. एखाद्या स्थलाचें किंवा प्रसंगाचें वर्णन करतांना त्यांत उच्च व उदात्त विचारांचा अंतर्भाव करून सद्विचारनिदर्शक संस्कृत, मराठी, इंग्रजी काव्यांतून आलेल्या कवितांचा उल्लेख करून किंवा सुंदर रूपकें वगैरे योजून हरिभाऊ हें वातावरण निर्माण करतात. पंचेचाळीसाव्या प्रकरणांत शिवरामपंत, भाऊ, ताई, सुंदरी वगैरे मंडळी एक दिवस सकाळीं फर्ग्यूसन कॉलेजकडे हिंडावयास जातात. त्यावेळीं सूर्योदयाचें वर्णन करतांना, "उदये सविता रक्तो इ०"[1] हा श्लोक भाऊला आठवतो असें दाखवून, पुढें त्यावरून उत्पन्न केलेला मोठ्या लोकांच्या स्थितीविषयीं या तरुण मंडळींचा वादविवाद; "कराला देवीचा नवावतार" हें 'मालतीमाधव' नाटकांतील अघोरघण्ट व कपालकुण्डला मालतीला कराला देवीपुढें बलि देण्याला आणतात, त्या प्रसंगाचें अंध रूढीवर योजलेलें दीर्घरूपक; शेवटीं भावानंदाच्या अंतकालीं वाताच्या झटक्यांत त्याच्या मुखावाटें निघणाऱ्या भाषणाच्या शेवटीं घातलेलें लाँगफेलोचें 'जीवनस्तोत्र' (The Psalm of Life) या प्रख्यात कवितेचें कडवें; या निरनिराळ्या अवतरणांनीं हीं वर्णनें विचारपरिप्लुत होऊन उच्च, संस्कृत वातावरण कशीं निर्माण करतात हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

---

१ पृ. २५४.

## भाग पांचवा.

# बाह्यस्वरूप.

प्रतिभेच्या योगानें कादंबरीकाराच्या मनांत कादंबरीची मनोहर काल्पनिक इमारत उभी राहील. परंतु तिला दृश्य स्वरूप दिल्याशिवाय तिचा दुसऱ्याला कांहीं उपयोग नाहीं. ज्याप्रमाणें विचाराचा उच्चार झाला तरच तो दुसऱ्यास कळणार, त्याप्रमाणेंच कल्पनाही कोणत्या तरी साधनानें दृश्य स्वरूपांत आली तरच ती दुसऱ्याला आनंददायक होणार. विचाराचा उच्चार करणें फारसें कठिण नसतें. परंतु कलाकृतींतील कल्पनांना दृश्य स्वरूप देणें अवघड असतें. नभोमंडळांत सायंकाळच्या मावळत्या सूर्याचा रंगीबेरंगी मनोहर देखावा पाहून आपल्याला त्याचें चित्र काढावेंसें किंवा त्यावर सुंदर कविता करावीशी वाटतें. पण, ' दरिद्राणां मनोरथाः ' अशी आपली स्थिति होते. ह्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, कलाकुशल पुरुषांत कल्पनेनें कलाकृति निर्माण करण्याइतकेंच तिला दृश्य स्वरूप देण्याचें कौशल्य असावें लागतें. त्याच्यांत व सामान्य माणसांत मुख्यतः हाच फरक असतो. सामान्य माणसासही थोडीफार कल्पनाशक्ति असतेच. कारण ती तशी असल्याशिवाय त्याला कलाकृतीचा रसास्वादच घेतां येणार नाहीं. काव्याचा रसास्वाद घेण्यास वाचकही अंशतः कवि असावा लागतो. दोघांत फरक इतकाच कीं, एकाला कल्पना सुचून ती दृश्य स्वरूपांत आणतां येते, दुसऱ्यास थोडीफार सुचली तरी ती त्याच्याजवळच पडून रहाते.

**भाषाप्रभुत्व** कल्पनेला व विचारांना वाङ्मयांत दृश्य स्वरूप देण्याचें साधन भाषा. मनांतील कल्पना भाषेंत यथार्थ वठवावयाची झाल्यास लेखकांत भाषाप्रभुत्व हा गुण मुख्यत्वेंकरून असला पाहिजे. कादंबरीकाराला मनांत कल्पिलेले विविध प्रसंग, स्थळें, स्वभाव, भावना इत्यादि गोष्टी आपल्या कादंबरींत मनोहर स्वरूपांत निदर्शित करावयाच्या असतात. त्याला भाषा वाटेल तशी लववितां येत असेल तरच हें साधणार. ‘ मी ’ कादंबरींतील निरनिराळीं वर्णनें पाहिलीं, तर हरिभाऊंना भाषाप्रभुत्व चांगलें साध्य झालें होतें असें दिसतें. कित्येक वेळां त्यांची कल्पना जितकी सुंदर असते, तितकेंच तिचें शब्दचित्रही सुंदर असतें. उदाहरणार्थ, ताईचें लग्न ठरत असतांना एक दिवस सायंकाळीं सुंदरी व ताई बोलत बसल्या होत्या, त्या ठिकाणीं भाऊ येतो, त्या वेळचें पुढील वर्णन पहा. “पुनः माझे डोळे ताईकडे वळले. ती स्तब्ध होती. मी स्तब्ध होतों. सुंदरीही स्तब्ध होती. फार तर काय, मला वाटतें आमच्या स्तब्धतेचें वारें लागून आमच्या भोंवतालचा सर्व प्रांतच स्तब्ध झाला होता. सायंकाळची छाया पडली; तथापि तिघांपैकीं कोणासही तेथून हलण्याची बुद्धि होईना. आम्ही तिघेंही लहान. परंतु ज्या स्थितींत आम्ही उभीं होतों, ती स्थिति संसारचिंतेनें व्यापृत झालेल्या माणसांसही क्वचित् अज्ञात असेल अशी होती. आम्ही मला वाटतें उंबराच्या झाडाखालीं उभीं होतों. त्याचीं फळें एकसारखीं टपटप पडत होतीं. तिकडे मुळीं कोणाचेंही लक्ष्य गेलें नाहीं. तिघेंही आपापल्या विचारांत गर्क. जणूंकाय जगाच्या भावी स्थितीचा भार आमचेवर येऊन पडला आहे, आणि तो कसा सहन करावा ह्याचाच विचार आमच्या मनांत चालला आहे ! ”[1] हें शब्दचित्र किती सुंदर

१ पृ. ११३–११४.

आहे ? हीं तीन मुलें प्रशांत वातावरणांत सचिंत विचार करीत बसल्याचें चित्र किती यथार्थ काढलें आहे ? सायंसंध्येची शांत वेळ, उंबराच्या टप्टप् पडणाऱ्या फळांच्या आवाजानें अधिकच भासमान होणारी शांतता, त्या ठिकाणीं फक्त या तीन मुलांचें अस्तित्व, त्यांच्या चेहऱ्यांवर दिसणारी चिंतेची छाया वगैरे कल्पनेंतील सर्व छटा या लहान लहान छोट्या वाक्यांनीं व भाषेच्या स्वाभाविकपणानें व साधेपणानें किती सुंदर वठल्या आहेत ! याप्रमाणेंच भाऊ बंडगार्डनवर जाऊन एका झाडाखालीं बसल्यानंतर नदीच्या पाण्याकडे पहात असतांना त्याला एकच बारकीशी बोट व एकच वल्हविणारा असें दृश्य दिसतें. त्याची व त्याच्याबरोबर भाऊच्या स्वतःच्या परिस्थितीची तुलना; एकावन्नाव्या प्रकरणाच्या आरंभींच शिवरामपंतांच्या नित्य शांत व गंभीर अशा चेहऱ्याचें " सायंसूर्याच्या आरक्त वर्णच्छटेनें जिकडे तिकडे पडलेल्या किंचित् रक्त प्रकाशांत " दिसणारें दृश्य, अशीं कितीतरी मनोरम शब्दचित्रें पाहण्यास सांपडतील.

शब्दचित्रांप्रमाणें हरिभाऊंनीं निरनिराळ्या प्रसंगांचीं व मनःस्थितींचीं केलेलीं वर्णनेंहि त्यांच्या भाषाप्रभुत्वामुळें सरस उतरलीं आहेत. बाह्य सृष्टीच्या वर्णनापेक्षां अंतःसृष्टीचें वर्णन करणें अवघड असतें. अंतःसृष्टींतील सूक्ष्म व्यापारांची लेखकाला जरी यथार्थ कल्पना आली, तरी तिला भाषेच्या सहायानें दृश्य स्वरूप सर्वच लेखकांना देतां येत नाहीं. हरिभाऊ हीं दोन्ही प्रकारचीं वर्णनें सारख्याच सफाईनें करतात. भाऊचें सदाशिव पेठेंतील घर, लहान मुलांचें भांडण व समेट, समेटाच्या अटी वगैरे, भाऊला पडलेलें सुंदरीच्या विवाहाचें स्वप्न, भाऊचा आजार, प्रातःकाळचें फिरावयास जाणें, भावानंदाचा आजार व मृत्यु, ह्या प्रसंगांचीं वर्णनें सुंदर उतरलीं आहेत. बाह्यसृष्टीप्रमाणें अंतःसृष्टींतील व्यापारहि हरिभाऊंनीं यथार्थ वर्णिले आहेत.

म्हाताऱ्याशीं लग्न ठरल्यावर ताईला होणारें दुःख;[१] 'ताई नवऱ्याच्या घरीं साफ जाणार नाहीं,' असें मामांना निक्षून सांगितल्यानंतर भाऊच्या मनांत आलेली विचार मालिका;[२] त्रेसष्टाव्या प्रकरणांत एक दिवस संध्याकाळीं भाऊच्या मनांत एक तेजस्वी विचार उत्पन्न होतो त्यावेळची त्याची मनःस्थिति;[३] भावानंदाचें मृत्यूपूर्वीचें वाताच्या लहरींतील भाषण[४] वगैरे भाग मनोव्यापारांच्या वर्णनाचे उत्कृष्ट नमुने म्हणून दाखल करण्यास हरकत नाहीं. हीं वर्णनें जशींच्या तशीं येथें उतरून घेण्याचा मोह होतो, परंतु स्थलाभावीं तो आवरलाच पाहिजे. तथापि एक उतारा नमुना म्हणून पुढें दिला आहे.

"एके दिवशीं संध्याकळीं मी या सर्व विचारांनीं व्याप्त होऊन बसलों असतांना एकदम एक तेजस्वी विचार उपजला. ज्याप्रमाणें आकाश कित्येक दिवस ढगांनीं व्यापून जावें आणि तसेंच कित्येक दिवस राहिल्यानें सर्व विश्व उदास व्हावें व एकदम एखादा कोपरा सूर्याच्या दिव्य किरणानें सुप्रकाशित व्हावा त्याप्रमाणेंच ते दिवशीं माझ्या चित्तरूप आकाशाची स्थिति झाली ! एक अत्यंत तेजस्वी कल्पना उभी राहिली. तिच्या तेजानें हलके हलके माझें चित्ताकाश रंजित होऊं लागलें. असलेले ढग दूर पळाले आणि कांहीं थोडेसे उरले असतील ते बाह्याकाशांतल्या ढगांप्रमाणेंच सुप्रकाशित होत जाऊन विशेष शोभा देऊं लागले. त्या विचारानें माझें मला फार समाधान झालें. विचार तर चांगला–अत्यंत योग्य–आर्यांच्या स्त्रीदास–शीलास–अनुसरून. त्या विचारामुळें उत्पन्न झालेल्या संतोषानें मन प्रफुल्लित झालें. मला वाटतें, आज कित्येक दिवसांत जशा तऱ्हेचें आनंदनिर्मित स्मित माझ्या मुखावर कधीं झळकलें नाहीं, तशा तऱ्हेचें स्मित त्यावेळीं झळकलें असावें. कशाला ! झळकलेंच !" ह्या एका उताऱ्यावरून

---

१ पृ. १३०; २ पृ. २०४, २०५; ३ पृ. ३६७, ३६८; ४ पृ. ४१३, ४१५.

सुद्धां हरिभाऊंची प्रतिभा, समरसता, इत्यादि गुण दृष्टीस पडतात, व त्याबरोबरच त्यांचें भाषाप्रभुत्वहि पहावयास सांपडतें.

हरिभाऊंच्या भाषेचा विशेष गुण तिचा स्वाभाविकपणा. त्यांच्या भाषेंत कृत्रिमता क्वचितच दृष्टीस पडते. साधारण-

**भाषेचे गुणविशेष**

पणें त्यांची भाषा पात्राला अनुरूप, शुद्ध व रसाला पोषक अशी असते. तिचा प्रवाह अनवरत चालतो. योग्य प्रसंगीं ती चांगली ओजस्वी असते. पहिल्या प्रकरणांत भाऊ, त्याची आई व आजी यांची, पुढें मुंबईस शिवरामपंतांच्या खोलींत भाऊ गेल्यानंतर तो स्वतः व सुंदरी यांचीं, नादी रावजी, विचारी शिवराम-पंत वगैरे पात्रांचीं भाषणें वाचलीं, म्हणजे हरिभाऊंची भाषा पात्राला अनुरूप कशी असते हें दिसतें. चवथ्या प्रकरणांत भाऊ व सुंदरीची आई; तेराव्या प्रकरणांतील भाऊचे सुंदरीच्या आईला ती शिवीत असलेल्या सद्ऱ्याविषयींचे प्रश्न; भाऊच्या आजीचीं वेळोवेळींचीं भाषणें; विशेषेंकरून भाऊनें आपले ढंग सोडावे म्हणून आग्रहानें त्याला सांगण्याकरितां ती आली असतां, सत्तावन्नाव्या प्रकरणांतील तिचीं रागाचीं व त्राग्याचीं भाषणें; अशीं पात्रानुरूप भाषेच्या स्वाभा-विकपणाचीं किती तरी उदाहरणें देतां येतील. ही भाषा इतकी स्वाभा-विक असते कीं, ती बोलणारी व्यक्ति आपल्या पुढेंच आहे असा भास व्हावा. नमुन्याकारितां पुढें एक दोन उतारे दिले आहेत.

( १ ) **सुंदरीची आई**:–हं, एकून तुम्ही आपलें सयवरच करणार ? बायकोला नवरा आवडतो. नवऱ्याला बायको आवडते. मग काय ? बरं पण तूं इकडे कशाला आला होतास ?

**मी** ( भाऊ ):–कनी ही आमच्या रावजींची खोली बरंका. आमचे रावजी आहेत का तुम्हांला माहिती ?

**सुंदरीची आई**:–( हंसत हंसत ) हो आहेत माहिती. ते या खोलींत रहात होते का ?

मीः—नव्हे, ते रहात नव्हते कांहीं. त्यांचीच मुळीं खोली ही. आणखी मी त्यांचा मुलगा.

सुंदरीची आईः—( विशेषच हंसून ) मग ते आतां कुठें गेले ? आणखी तूं येथें कुठून आलास ?

मीः—ते ? ते बाहेर गेले आहेत कुठें तरी. पण सुंदरीची आई, तुम्हीं येथें कशा आलां हो ? तुम्हीं आमच्या रावजींचं कुलूप कसं काढलं ? तुमच्याजवळ किल्ली आहे ? मी येऊं कां तुमच्या खोलींत ? कनी मी गेलों होतों त्या खोलींत बरं का ! आणखी तिथें मोठी थोरली आग लागली, आणखी एक मला लखोटा हातीं सांपडला. आणखी तो मी हातांत अगदीं गच्च धरला होता. आणखी तो कुठें तरी पडला. आहे काहो तो या खोलींत ?[१]

( २ ) रामानंद भावानंदाच्या अंतकालचें वर्णन करतोः—

" इकडे यांचा ( भावानंदांचा ) वायु ( Delirium ) तर प्रबळा-वत चालला. मध्यरात्रींच्या सुमारास माझें नांव घेऊन त्यांनीं मोठ्यानें हांक मारली, आणि एकदम म्हणतात, " तुला तें अमक्या आयरिश् देशभक्ताचं त्यावेळचं सणसणीत भाषण आठवतं का ? त्यांत त्यानं आपल्या लोकांचीहि खूप कानउघाडणी केली आहे. तें भाषण आठवतं का ? " इतकें म्हणून एक भाषण भडाभडा म्हणण्यास त्यांनीं सुरुवात केली ! हें आहे तरी काय असें मला झालें. त्या भाषणाच्या निर-निराळ्या ठिकाणीं ते उठले काय, उभे राहिले काय, त्यांनीं हातवारे केले काय ! सर्वच प्रकार अगदीं विलक्षण झाला. इतकी शक्ति आली कुठली, असें आश्चर्य करीतच मी उभा राहिलों. तें भाषण झाल्या-नंतर ते हंसले, विलक्षण विकट हंसले. आणि " याचें नांव देशा-भिमानी, " एवढेच शब्द उच्चारून ते धाडकन् खालीं पडले.

---

१ पृ. २३.

त्या म्हणण्याबिणण्यामुळें जे अतिश्रम झाले, त्याचा हा असा परिणाम व्हावयाचाच होता. तो होणार हें मला माहीतच होतें. पुनः मी कांहीं उपाय केले; परंतु त्यांचा कांहीं उपयोग न होतां पुन्हां त्यांना उसळी आली आणि ते लाँगफेलोचें प्रसिद्ध 'जीवनस्तोत्र' इंग्रजींत मोठ्यानें म्हणूं लागले. ही विलक्षण स्मृति त्यावेळीं कशी उत्तेजित झाली आणि काय झालें हें मी डॉक्टरींतला किडा, परंतु माझी अक्कल गुंग झाली; मला कांहीं समजेना. शेवटल्या कडव्याच्या पूर्वी ते मला मोठ्यानें हांका मारून म्हणाले, "म्हण रे म्हण !" आणि मोठ्यानें आवाज काढून आपण म्हणत सुटले:—

Let us then be up and doing
With a heart for any fate.
Still achieving, still pursuing,
Learn to labour and to wait.

शेवटपर्यंत काय त्यांच्या डोक्यांत भ्रमण चाललें होतें हें या दोन गोष्टींवरून चांगलें कळून येणार आहे."[१]

पात्रानुरूप व प्रसंगानुरूप भाषा योजून हरिभाऊ सुंदर शब्दचित्रें कशीं काढतात, हें वरील उताऱ्यांवरून दिसतें. वरील दोन्ही प्रसंग आपल्या डोळ्यांपुढें घडत आहेत असा भास होतो. पहिल्या उताऱ्यांत लहान मुलाची भाषा, त्यांचा स्वभाव व चौकस बुद्धि, दुसऱ्यांत भावानंदाचे ओजस्वी विचार व भावना; ह्या गोष्टी किती यथार्थ निदर्शित केल्या आहेत ? दुसऱ्या उताऱ्यांत भाषेचा ओज व ओघ हे गुण चांगले व्यक्त होतात.

हरिभाऊंची भाषा सामान्यतः नेहमीं साधी असून तिच्यांत स्वाभाविकपणा असतो, असें वर म्हटलें आहे. तथापि क्वचित् प्रसंगीं

---

१ पृ. ४१२,

संस्कृत पद्धतीची प्रौढ रचना, जाडे समास व क्लिष्ट संस्कृत शब्द योजण्याची त्यांना इच्छा होते. ' मी ' कादंबरींत संस्कृत वळणाची प्रौढ भाषा एकदांच आली आहे. ' कराला देवीचा नवावतार ' ह्या एकविसाव्या प्रकरणांत बालिकाविवाहाच्या अनिष्ट रुढीवर एक सुंदर रूपक कल्पिलें आहे. ' मालती-माधव ' या संस्कृत नाटकांतील एका प्रसंगावरून हें रूपक योजिलें असल्यामुळें प्रौढ भाषा येणें अगदीं स्वाभाविक आहे.

शब्द

हरिभाऊंच्या शब्दयोजनेंत निरनिराळे प्रकार दिसून येतात. पुष्कळ वेळां वाक्यांत ते संस्कृत जाडे शब्द घालतात. त्यांच्यायोगानें केव्हां केव्हां विनोद उत्पन्न होतो, परंतु कांहीं वेळां वाक्य विनाकारण बोजड होतें. एकंदर भाषा साधी व सोपी, पण त्यांत असा एखादा शब्द आला कीं, तो ' पेपरवेटा ' प्रमाणें वाटूं लागतो, व कलादृष्ट्या तें वाक्य नीरस ठरतें. हरिभाऊ पुष्कळ वेळां अगदीं नवीन शब्द बनवितात. नामें व विशेषणें घेऊन त्यांचीं क्रियापदें बनविण्याची त्यांची पद्धति तर प्रख्यात आहे. त्यांनीं उपयोगिलेले कांहीं शब्द पुढें दिले आहेत. बनविलेले शब्दः—' कामकराऊ, ' ' चापटाचापटी, ' ' गोळागोळी, ' हस्तशिक्षा, ' ' मारांजळी, ' ' तरकलों, ' ' कंदिल्या गडी, ' परस्पर सुधारक, ' ' छळक, ' ' मठस्व, ' यांपैकीं ' कामचुकाऊ'वरून ' कामकराऊ, ' ' पुष्पांजळी'वरून ' मारांजळी, ' प्रमाणें कांहीं शब्द मराठींत असलेल्या शब्दांवरून बनविलेले आहेत. अशा बनविलेल्या कांहीं शब्दांनीं विनोद उत्पन्न होतो व कांहींच्या योगानें अर्थ यथार्थ व्यक्त होतो. संस्कृत शब्दः—' मी आपल्या शंकास्थानाकडे गेलों, ' ' तिघांचें संरोदन ( सहरोदन ), ' ' समाधानमुद्रा, ' ' हृत्पट्टिका, ' ' बिंबोद्ग्राही मन, ' ' दुरागत ' इत्यादि.

लिहिण्याच्या ओघांत हरिभाऊ कित्येकदां प्रचारांतील म्हणींचा

म्हणी

उपयोग करतात, कित्येकदां ते नवीन शब्दांप्रमाणें नवीन म्हणी तयार करतात. 'मानें खाईना पानें,' 'धीर धरणें कळे, त्याला सारें कांहीं मिळे,' उत्सुकतेची भरभर तेथें शंकेचें माहेरघर,' 'खोटें नव्हे चखोटें,' 'नवा काळ, नवी चाल' वगैरे त्यांच्या म्हणी लक्ष्यांत घेण्यासारख्या आहेत. मोजके शब्द, यमकाची योजना व सर्वसाधारण सिद्धांत हे चांगल्या म्हणीचे विशेष आहेत. सुबक म्हण हा एक भाषेचा अलंकारच होय. हरिभाऊंच्या म्हणींत वरील सर्व गुण असून त्यांच्या योगानें कादंबरीच्या भाषेला अलंकार चढतात असें म्हणण्यास हरकत नाहीं.

अलंकार

हरिभाऊंची भाषा स्वाभाविक असल्यामुळें तिच्यांत अलंकार कमी असतात. परंतु उपमादृष्टांतादि अलंकार येतात त्यावेळीं ते सरस व समर्पक असतात. उदाहरणार्थ, "माझ्या चरित्रांतील गोष्टी जर मी आतांच सांगूं लागलों, तर बिंग समजलेल्या गारोड्याच्या खेळाप्रमाणें माझें सर्व लिहिणें केवळ नीरस होईल;" "सर संतापानें सरड्याच्या गळ्याप्रमाणें आपला डोळा लाल करून म्हणाले"; "मांजरी आपलीं पिलें कोणी नेईल म्हणून जितकी कावरी बावरी होत असते, तितका मी माझ्या त्या कागदांच्या सुरक्षितपणासाठीं कावरा बावरा झालों होतों;" "परंतु बाहेर जाण्याबरोबर जसें एखादें करडूं किंवा वांसरूं वारा लागल्याबरोबर एकदम उल्हसित होऊन उड्या मारूं लागतें, तद्वत् आमचीं मनें उड्या मारूं लागलीं." मधून मधून हरिभाऊ दीर्घरूपकें ( Sustained metaphors ) फार चांगलीं योजितात. 'कराला देवीचा नवावतार' हें रूपक या दृष्टीनें पहाण्यासारखें आहे. हें रूपक सरस वठलें असून बालिकाविवाहदोषदर्शनाच्या दृष्टीनें फार परिणामक झालें आहे. कांहीं दृष्टांत किंवा उपमा हरिभाऊंच्या

आवडत्या दिसतात. या कादंबरींत समुद्राच्या उपमा व दृष्टांत चार पांचदां आले आहेत.

**मथळे**

कादंबरींतील प्रकरणांचे मथळे, त्यांतील संभाषणें व मामांनीं व ताईनें लिहिलेलीं पत्रें यांतहि हरिभाऊंची भाषाकुशलता प्रतिबिंबित झाली आहे. मागील प्रकरणांत प्रस्तुत कादंबरीला सौंदर्य आणण्यास कारणीभूत झालेल्या निरनिराळ्या बाबींचें विवेचन केलें आहे. त्याच प्रमाणें मथळे, संभाषणें व पत्रें यांच्यामुळेंही ही कादंबरी चांगली चित्ताकर्षक होते. 'इहलोकचा स्वर्ग,' 'कराला देवीचा नवावतार,' 'बाबारे! आम्ही घरांत बांधलेलीं मुकीं जनावरें,' 'समुद्र जितका शांत दिसतो तितका तो नसतो,' 'दैवाची वक्रता' हे मथळे कल्पना, सूचकता, भाषा वगैरे दृष्टींनीं पहाण्यासारखे आहेत.

**संभाषणें**

स्वभावानुसार भाषेच्या योजनेनें निरनिराळीं संभाषणें चित्ताकर्षक वठलीं आहेत. त्यांत त्या त्या पात्रांच्या स्वभावाचें यथार्थ चित्र निघालें आहे. पहिल्या प्रकरणांत नानासाहेब व भाऊची आजी, तेराव्या प्रकरणांत भाऊ व सुंदरीची आई, सव्विसाव्या प्रकरणांत रावजी व त्यांची पत्नी, बावन्नाव्या प्रकरणांत आपल्या बायकोला ताईकडून लिहिण्यावाचण्यास शिकवूं इच्छिणारा एक कॉलेजांतील तरुण विद्यार्थी व त्याची आई, छपन्नाव्या प्रकरणांत भाऊ व त्याची आजी, ह्या व्यक्तींचीं संभाषणें हरिभाऊंच्या भाषाप्रभुत्वाच्या दृष्टीनें लक्ष वेधण्यासारखीं आहेत. यांपैकीं एक दोन संभाषणांचे उतारे येथें देतां आले असते, तर बरें होतें. पण जागेच्या अभावीं तसें करतां येत नाहीं.

हरिभाऊंचें पत्रलेखनकौशल्य मामा व ताई यांनीं भाऊला लिहि-

**पत्रें**

लेल्या पत्रांवरून चांगलें दिसून येतें. विचार व भावना यांची योग्य मांडणी, सर्वत्र दृष्टीस पडणारें भाषाप्रभुत्व व स्वभावनिदर्शन या गुणांनीं हीं पत्रें प्रस्तुत कादंबरीचें सौंदर्य वाढविण्यास अंशतः बरींच कारणीभूत झालीं आहेत असें म्हणावें लागतें. पत्रलेखन ही एक कला आहे व ती फार थोड्यांना साधते. वरील पत्रांचे कांहीं उतारे मागील प्रकरणांत दिले आहेत, तेव्हां ते येथें निराळे देण्याचें कारण नाहीं.

## भाग सहावा.

# कादंबरींतील विनोद.

कादंबरीच्या चित्ताकर्षक अंगांपैकीं विनोद हें एक मुख्य अंग आहे. इंग्रजींत ( Humour and Wit ) असे दोन शब्द आहेत. त्यांचा वाङ्मयविवेचन करतांना नेहमीं परामर्ष घेतात. मराठींत या शब्दांना अनुक्रमें विनोद व कोटी असे शब्द योजण्याचा प्रघात आहे. श्री. केळकर ह्यांनीं " सुभाषित आणि विनोद " या पुस्तकांत ह्या शब्दांचें मार्मिक विवेचन केलें आहे. त्याचप्रमाणें श्री. वाग्भट देशपांडे ह्यांनीं " हरिभाऊ आपट्यांची Humour " ह्या विषयावरील व्याख्यानांत ह्या शब्दांची चर्चा केली आहे. त्यांत दोघांनींहि हेच प्रतिशब्द मानले आहेत. कोटि ( Wit ) अर्थनिष्ठ असते, विनोद ( Humour ) स्वभावनिष्ठ असतो. वास्तविक ' Humour ' शब्दाला मराठींत यथार्थनिदर्शक असा शब्द नाहीं. त्याला प्रतिशब्द म्हणून साधारणपणें ' विनोद ' हा शब्द वापरतात. तथापि अर्थाच्या दृष्टीनें पहातां ' विनोद ' शब्दाचा अर्थ व्यापक आहे, ' Humour ' शब्दाचा अर्थ मर्यादित आहे. संस्कृत वाङ्मयांत ' विनोद ' हें नाम किंवा ' विनुद् ' हा धातु यौगिकार्थानें पुष्कळदां वापरतात. मराठींत मात्र हा शब्द विशेषेंकरून एका विशिष्ट अर्थानें उपयोगांत येतो. भाषेच्या द्वारें शाब्दिनिष्ठ कोट्या करून अथवा व्यक्तींचीं किंवा प्रसंगांचीं विनोदी वर्णनें करून मनोरंजन करणें अशा अर्थीं हा शब्द योजतात. तथापि केव्हां केव्हां भाषेचा संबंध यत्किंचितही नसतांना एखादा मनोरंजक

हास्यकारक प्रसंग निर्माण होतो, त्याला 'विनोदस्थल' म्हणण्याचा प्रघात आहे. अशा रीतीनें 'Wit' व 'Humour' ह्या दोन्ही शब्दांचा अंतर्भाव 'विनोद' शब्दांत होतो. 'Humour' शब्द इंग्रजींत स्वभावनिष्ठ विनोदाला लावतात. ह्या शब्दाचे यौगिक अर्थावरून पुढें निरनिराळे निघालेले अर्थ पाहिले म्हणजे मौज वाटते. त्याचा यौगिक अर्थ शरीरांतील रक्तपित्तादि रस किंवा धातु असा आहे. त्यावरून पुढें 'मनःस्थिति' असा दुसरा अर्थ झाला. नंतर प्रसन्न, विनोदी मनःस्थिति हा अर्थ आला. पुढें ज्याच्या योगानें अशी स्थिति प्राप्त होते तो स्वभाव–विनोदी स्वभाव–विनोद, असे अर्थ रूढ झाले.

सामान्येंकरून विनोदाचे तीन प्रकार करतां येतील; स्वभावनिष्ठ, भाषानिष्ठ व प्रसंगनिष्ठ. प्रस्तुत कादंबरींत तिन्ही प्रकारचा विनोद आढळतो. रावजी, सरमास्तर, बाल्यावस्थेंतील भाऊ व सुंदरी ह्यांच्या भाषणांतील विनोद भाषेनें उत्पन्न होत नाहीं; त्यांच्या त्या त्या स्वभावानें होतो. भाऊ व सुंदरीची आई यांच्या भाषणाचा मागें एक उतारा दिला आहे. त्यांत दृष्टीस पडणाऱ्या भाऊच्या बालस्वभावामुळें विनोद उत्पन्न होऊन आपल्याला हंसू येतें. दुसरा एक तसाच उतारा मुद्दाम देतों. त्यांतही असाच स्वभावनिष्ठ विनोद आहेः—

भाऊः—कांहो सुंदरीची आई, तुम्ही मोठा थोरला सदरा कोणाला शिवतां ?

सुंदरीची आई ( गालांतल्या गालांत हंसून ):—कोणाला बरं ?

भाऊः—मला काय ठाऊक बरं ?

सुंदरीः—कनी, तो आमच्या दादांचा आहे सदरा.

भाऊः—तुमच्या दादांचा ? तुमचे दादा कोण ?

सुंदरीः—म्हणजे तुम्हांला आमचे दादा नाहींत ठाऊक ? ते कनी आतां ऑफिसांत गेले आहेत. त्यांचा हा सदरा आहे.

भाऊः—तुझे दादा म्हणजे तुझा बाप होय ?

सुंदरीः—हो, हो, ते कनी हापिसांत गेले आहेत. त्यांचा सदरा.

भाऊः—सुंदरीची आई, त्यांचा सदरा तुम्हींच शिवतां? शिंपी नाहीं शिवीत ?

सुंदरीची आईः—नाहीं शिवीत, मग काय करावं ? नको आपण शिवायला ?

ह्या संभाषणांत लहान मुलांची चौकसबुद्धि, त्यांचें औचित्य-अनौचित्य किंवा मान-अपमान या कल्पनांचें स्वाभाविक अज्ञान, त्यांची बालभाषा इत्यादि विशेष आपण मोठ्या माणसांनीं पाहिले, म्हणजे स्वभाविकच हसूं येतें. रावजींच्या वेळोवेळच्या भाषणांत प्रदर्शित होणारा त्यांचा ज्योतिषावरील विश्वास, स्वतःच्या खोट्या कर्तबगारीचा अभिमान वगैरे स्वभावविशेष विनोद उत्पन्न करणारे आहेत. सरमास्तरांच्या भाषणांतहि असाच स्वभावानिष्ठ विनोद उत्पन्न होतो.

हरिभाऊ भाषानिष्ठ विनोदानें वाचकाचें मनोरंजन फार क्वचित करतात. विशेषतः 'मी' कादंबरींत केवळ भाषानिष्ठ विनोद थोडा आहे. त्यांनीं कोठें शाब्दिक कोट्या केलेल्या नाहींत. नाहीं म्हणायला मधून मधून 'कामकराऊ' सारखे नवीन बनाविलेले शब्द योजून ते थोडासा शब्दचमत्कार करतात. अगदीं क्वचित् सरमास्तरांचा 'मोत्या,' 'नितंबबिंबावरची शिक्षा' असा शाब्दिक विनोद दृष्टीस पडतो. आणि वास्तविक पहातां सहृदय माणसाला शाब्दिक विनोद कमी प्रतीचाच वाटतो. स्वभावनिष्ठ विनोदानें त्याचें जितकें मनोरंजन होतें, तितकें शब्दनिष्ठ विनोदानें होत नाहीं.

प्रसंगनिष्ठ विनोद हा विनोदाचा तिसरा प्रकार. विशिष्ट परिस्थिति किंवा प्रसंग निर्माण करून लेखक हा विनोद उत्पन्न करतो. अशा विनोदी प्रसंगांत फार करून अनपेक्षितपणाचा अंश असतो. शाळेंत वर्गामध्यें भाऊची विनायकाशीं मारामारी चालली असतां, "आतां कां भागूबाई 'सरां'ना हांका मारते ?" असें म्हणून त्याला खालीं

पाडून तो त्याच्या छातीवर बसून त्याला ठोकणार, इतक्यांत त्याच्या पाठीवर दणकन धपाटा बसतो. हा कोणीतरी विनायकाचा मित्र असेल असें समजून, " असा मागून कां? पुढें ये भागूबाई ? " असें म्हणून मागें वळून पहातो तों त्याला त्याचे ' सर ' दिसतात. भाऊवर आलेल्या कवठांच्या चोरीचा आळ व त्यावेळची एकंदर परिस्थिति विनोद उत्पन्न करणारी आहेत. ताई शेजारपाजारच्या स्त्रियांना लिहिण्यावाचण्यास शिकविण्याच्या हेतूनें फिरत असतां तिला आलेल्या अनुभवांत असे कांहीं विनोदी प्रसंग आले आहेत.

केव्हां केव्हां विनोदी वर्णनें करून हरिभाऊ वाचकांचें मनोरंजन करतात. अशा वर्णनांत वर्णिलेल्या गोष्टीची त्यांची कल्पना विनोद-पूर्ण असून कांहीं वेळेला वर्णनाची भाषाहि विनोदी असते. उदा-हरणार्थ, भाऊच्या शाळेंतील हेडमास्तरांचें वर्णन पहाण्यासारखें आहे. भाऊनें त्यांचें वर्णन पुढें दिल्याप्रमाणें केलें आहे. " आमच्या हेड-मास्तरांचें शरीर फार भव्य आणि उदर तर फारच विस्तृत. दोन्ही इतकीं भव्य व विस्तृत असल्यामुळेंच आम्हां लहान मुलांला त्यांच्या ज्ञानाचें, त्यांच्या ताठ्याचें व त्यांच्या भयंकर रागीटपणाचें आश्चर्य वाटत नसे. कारण इतकें अगाध ज्ञान व या इतर सर्व गोष्टी यथा-स्थितपणें राहण्यास मुबलक जागा तरी आहे असें वाटे. त्यांचा चेहरा फार उग्र असे आणि त्यांतल्या त्यांत डोळे एका सरळ रेषेंत नसल्या-मुळें व एक अतिशय लाल असल्यामुळें ते केवळ नरसिंहाचा अवतार दिसत आणि खरोखरी आम्हांला ते तसे भासतहि—नव्हे पुष्कळ वेळां अनुभवालाही येत. त्यांचा वर्ण अतिशय काळा, इतका कीं एक वेळ आमच्या वर्गांतल्या एका मुलाला त्यांनींच ' अंधेराचा रंग कसा असतो ? ' म्हणून विचारलें, तेव्हां त्या मुलाला दुसरी कांहीं उपमा न सुचून तो बिचारा साहाजिक ' सर, तुमच्या अंगासारखा ! ' असें म्हणाला, ते दिवशीं खरा खरा नरसिंह अवतार आम्हांला दिसला.

अरे बापरे ! ते दिवशीं आमच्या ' तात्यांनीं ' ( त्यांना ह्या नांवाची फार चीड असे हो ! ' सर ' ज्या मुलानें म्हटलें नाहीं, त्याची कंबख्तीच भरली म्हणून समजावी ) त्या अपराध्याला तर यथास्थित शिक्षा ठोठावलीच म्हणा; परंतु आम्ही चौघे पांचजण सहज हंसलों त्या आमची पण यथास्थित कणिक तिंबली गेली. आमच्या ' सरां'ची ख्याति छड्या मारण्यापेक्षां दुसऱ्या कांहीं शिक्षा करण्याबद्दल फार होती. त्यांनीं ' विंचू डसवितों ' म्हटलें कीं, मुलानें आज आपलें मरण आलें म्हणून समजावें. अशीं कांहीं वेडीवांकडीं बोटें करून व तीं एकमेकांवर चढवून ते जांघेजवळ चिमटा घेत कीं, त्याचा वण निदान एक महिनाभर रहायचा ! ते ' छडी मारतों, ' ' चिमटा घेतों, ' ' कान उपटतों, ' ' घोडीवर देतों, ' असें कधींच म्हणायचे नाहींत. ' दम धर अं, आतां लाही फोडतों ' असें त्यांच्या तोंडून निघालें कीं, कुठें तरी अंगावर फोड आला म्हणून समजावें. इ. इ."[1] सुंदरीच्या घरीं जाऊन बसल्याबद्दल भाऊला त्याची आई मार देते. नंतर त्याचें रडें थांबून तो हळू हळू चळवळ करूं लागतो. ह्या संबंधींचें वर्णन फार मनोरंजक व विनोदी असून त्यावरून हरिभाऊंचें बालस्वभावाचें ज्ञान व सूक्ष्म निरीक्षण हीं चांगलीं दृष्टोत्पत्तीस येतात.[2] त्याचप्रमाणें शाळेंतील मुलांशीं भाऊची भांडाभांडी, सर मास्तरांचा आसिस्टंट मास्तरांवर राग, भांडणानंतर भाऊचा व विनायकाचा समेट, समेटाच्या अटी वगैरें वर्णनेंचीं अत्यंत स्वाभाविक व विनोदी आहेत.

हरिभाऊंचा विनोद उच्च दर्जाचा असतो. शब्दनिष्ठ विनोदावर त्यांचा फारसा भर नाहीं. ' मी ' कादंबरींत त्यांचा विनोद सात्त्विक, न बोंचणारा व व्यक्तींविषयीं सहानुभूति उत्पन्न करणारा असा आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, ते केवळ विनोदाकरितां म्हणून पात्रें घालीत

---

१ पृ. ४५; ४६; २ पृ. २८.

नाहींत. हीं पात्रें कथानकाशीं एकजीव झालेलीं असतात. यास्तव त्यांच्यामुळें उत्पन्न होणाऱ्या विनोदांत स्वाभाविकपणा असतो, कृत्रिमता नसते. मुंबईचे नानासाहेब, लहानगीं भाऊ व सुंदरी, रावजी मास्तरद्वय वगैरे सर्व व्यक्तींचा कथानकाशीं थोडाफार परंतु जरूरीचा संबंध आहे. विनोद न बोंचणारा असला म्हणजे त्यापासून शुद्ध आनंद अनुभवितां येतो. सर मास्तर ही व्यक्ति वगळली म्हणजे बाकीच्या प्रत्येक व्यक्तीविषयीं वाचकाच्या मनांत सहानुभूति उत्पन्न होते. सर मास्तरांच्या वर्तनांत उत्पन्न होणारा विनोद बोंचक नाहीं असें नाहीं. तथापि त्यांचा निर्दयपणा, असिस्टंट मास्तरांसंबंधींचें नीच वर्तन, राक्षसी शिक्षापद्धति यांमुळें त्यांच्याविषयीं आपल्या अंतःकरणांत सहानुभूतीचा ओलावा असणें संभवत नाहीं. याकारणानें त्यांच्या वर्णनाला आक्षेप घेण्याची इच्छाहि होत नाहीं.

# भाग सातवा.

# समाज व शिकवण.

“सामाजिक व राजकीय बंधनांचें शैथिल्य संपादन करण्यासाठीं लागणाऱ्या प्रयत्नांपैकीं मुख्य प्रयत्न एकीकडून समाजाच्या व दुसरीकडून सरकारच्या अज्ञानाचा नाश करण्यासंबंधाचा. समाजदृष्ट्या हें अज्ञान दोन प्रकारचें. एक शिक्षणाच्या अभावामुळें उत्पन्न झालेले व दुसरें परंपरागत रूढीच्या अभिमानानें उत्पन्न झालेलें. राजकीय दृष्टयाही हें अज्ञान दोन प्रकारचें. एक लोकस्थिति कशी जाणावी याचें शिक्षण नसल्यानें उत्पन्न झालेलें आणि दुसरें अधिकारमदानें उत्पन्न झालेलें.”

—कादंबरीकर्त्यांचे पहिल्या आवृत्तीचे “दोन प्रास्ताविक शब्द.”

समाजांतील अनेक कारणांनीं उत्पन्न झालेले दोष निदर्शित करून व ते घालविण्याचे मार्ग दाखवून समाजसुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीनें हरिभाऊंनीं आपल्या सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. ह्या सर्व कादंबऱ्यांत त्यांनीं आपली सामाजिक विचारांची प्रणालिका वाचकांपुढें मांडली आहे. त्या सर्व विचारांचें विवेचन या ठिकाणीं करण्याचें कारण नाहीं. प्रस्तुत कादंबरींत त्यांनीं कोणचे विचार प्रदर्शित केले आहेत येवढाच विचार कर्तव्य आहे. ह्या कादंबरीच्या प्रस्तावनेंतील वर उद्धृत केलेल्या उताऱ्यांत त्यांनीं सामाजिक व राजकीय बंधनांचा उल्लेख केला आहे. तथापि प्रस्तुत कादंबरींत त्यांनीं सामाजिक बाबींचा जितका व्यापक समावेश केला आहे, तितका राजकीय

बाबींचा केला नाहीं. त्यांचा मधून मधून क्वचित् उल्लेख मात्र होतो येवढेंच. सामाजिक दोषांचें विस्तृत आविष्करण करून ते घालविण्याचे उपायही त्यांनीं दाखविले आहेत. अशा रीतीनें राजकीय दोषांना त्यांचा हात लागला नाहीं. या कारणास्तव त्यांनीं उल्लेखिलेल्या ‘चतुष्कोण अज्ञाना’ च्या दोन कोनांचाच आपल्याला विचार करावयाचा आहे. हे दोन कोन म्हणजे शिक्षणाचा अभाव व रुढीचा अभिमान. या कादंबरींत दृष्टीस पडणाऱ्या समाजाचित्रांत हरिभाऊंनीं हे दोन्ही दोष चांगले दाखविले आहेत.

शिक्षणासारखा विषय कादंबरींत कुशलतेनें गोंविला असतां तिची सौंदर्यहानि होत नाहीं हें मागें दाखविलें आहे. असे विषय प्रसंगानुसार स्वाभाविकपणें आणून कादंबरींतील कथानकाशीं एकजीव केल्यास त्यांचा रुक्षपणा नाहींसा होतो; इतकेंच नव्हे तर त्यायोगें कथानकाला स्वाभाविकपणा येऊन कादंबरीला ‘वास्तविक’ ( Realistic ) रूप देण्याला मदत होईल. प्रस्तुत कादंबरींत बालशिक्षण व स्त्रीशिक्षण या दोहींचा विचार झाला आहे. बालशिक्षणांत गृहशिक्षण व शालेय शिक्षण यांचा अंतर्भाव होत असल्याकारणानें हरिभाऊंनीं हीं दोन्ही निदर्शित केलीं आहेत.

**गृहशिक्षण**

भावानंदाचें आत्मचरित्र कादंबरींत रेखाटल्यानें त्याच्या बालवयांतील चरित्राचा भाग तिच्यांत येणें अवश्य होतें. यामुळें हरिभाऊंना बालशिक्षणाचा विषय अगदीं स्वाभाविकपणें आणतां आला. त्याचप्रमाणें सुंदरीचें चरित्रहि बालपणापासून दाखविल्यामुळें ह्या विषयाला अधिकच वाव मिळाला. शिवाय हीं दोन मुलें भिन्न भिन्न परिस्थितींत वाढत असल्यामुळें त्यांना मिळणाऱ्या गृहशिक्षणांतील फरक दाखवितां आला. मुलांचें शील बनविण्याच्या कामीं शाळेंतील शिक्षणापेक्षां गृहशिक्षणाचा अधिक उपयोग होत असल्यामुळें हरिभाऊंनीं कादंबरींत या विषयाचा

बराच सविस्तर विचार केला आहे. लहान मुलांना योग्य वळण लावून त्यांना सच्छील करण्यास लागणारें शिक्षण देण्याची पात्रता केवळ वयाधिक्यामुळें येत नाहीं. वडील माणसें स्वतः सुशिक्षित व सच्छील असून त्यांना बालमनाचें ज्ञान असावें लागतें. योग्य गृहशिक्षणाच्या अभावीं लहान मुलांची कशी स्थिति होते हें भाऊच्या उदाहरणावरून चांगलें दिसतें. भाऊची सुंदरीच्या आईची गांठ पडते त्यावेळची त्याची स्थिति कशी होती हें आपल्याला माहीत आहे. त्याला लिहितांवाचतां कांहीं येत नव्हतें. सुंदरीच्या आईशीं बोलण्यांत त्याचा अजागळपणा दिसून येतो. हट्ट करणें, ताईशीं भांडणें या गोष्टींपलीकडे त्याला कांहीं येत नाहीं. त्याच्या मनाचा व बुद्धीचा अद्यापि विकास कसा तो झालाच नव्हता. तीच त्याच्यापेक्षां तीन वर्षांनीं लहान असलेली सुंदरी आपल्या आईजवळ ‘ इसापनीति ’ वाचूं शकते व तिला लहानसहान कामांत मदत करते. भाऊच्यापेक्षां ती अधिक समंजस व चुणचुणीत आहे. ह्या दोघांतील फरकाचें कारण स्पष्ट आहे. गृहशिक्षणाला पारखा होऊन एकाला आईचे कठोर शब्द नेहमीं ऐकावे लागतात व मार खावा लागतो. त्याला सहानुभूतीचा व प्रेमाचा ओलावा केव्हांच मिळत नाहीं. दुसरीला शिवरामपंतांसारखे वडील व त्यांच्या शिक्षेखालीं तयार झालेली तिची आई, या उभयतांच्या प्रेमळ सच्छिक्षणाचा लाभ होतो.

मुलांना घरीं शिक्षण कसें दिलें पाहिजे हें हरिभाऊंनीं शिवरामपंत व त्यांची पत्नी यांच्या उदाहरणांनीं चांगलें दाखविलें आहे. दोघांना आपल्या मुलांविषयींच्या कर्तव्याची जाणीव आहे. दोघेंहि प्रेमळ असून बालमन व बालस्वभाव कशीं असतात हें जाणतात. मुलांना शिक्षा केव्हां करावी व त्यांना जवळ केव्हां करावें हें त्यांना कळतें. दोघेंहि आपआपली जबाबदारी ओळखून असतात. भाऊ सुंदरीबरोबर शिवरामपंतांच्या घरीं शिकूं लागला, तेव्हांपासून त्यांनीं त्याला

हाताशीं धरलें. ते प्रेमानें त्याचे धडे त्याला समजावून देत व अभ्यासाची चवकशी करीत. मुलाची शाळेंतील फी दिली म्हणजे आपलें कर्तव्य संपत नाहीं हें वडील माणसांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. शिवरामपंतांच्या गृहशिक्षणपद्धतीविषयीं लिहितांना भाऊ म्हणतो, " वाचकहो, आपल्या मुलाच्या रोजच्या धड्याची किंवा त्याच्या एकंदर घरांतल्या व बाहेरल्या वागणुकीची खरोखर मनापासून काळजी घेणारे असे बाप आढळण्यांत किती आले आहेत ? महिन्या दोन महिन्यांनीं एकदां सहज जेवतां जेवतां, मुलगा कोठें दांडगाई करतांना आढळला म्हणजे सहजीं त्याला त्याचा वर्गांतील नंबर विचारला, आणि तो खालीं आहे असें ऐकलें म्हणजे त्याच्यावर संतापून रागावून त्याला शिव्या द्याव्या, अगर यथास्थित झोडपावें, याच्या पलीकडे कोणी आपल्या मुलाची काळजी घेतो काय ? आणि कोणी घेत असले तरी अशी मनापासून मुलांच्या शारीरिक व मानसिक शिक्षणाची काळजी घेणाऱ्यांचें शेकडा प्रमाण काय बसेल ? "[१] भाऊच्या किंवा सुंदरीच्या हातून कांहीं आगळीक घडली, तर शिवरामपंत किंवा त्यांची पत्नी त्यांना कठोरपणानें कडक शिक्षा न करतां प्रेमळ शब्दांनीं त्यांची कानउघाडणी करीत. एके दिवशीं भाऊनेंच स्वतः एका मुलाची कांहीं आगळीक करून त्याला मार बसविला. त्यावेळीं तो खोटें बोलल्याचें शिवरामपंतांच्या लक्ष्यांत येतें. त्यावेळीं त्याला त्याची ओळख न देतां खोटें बोलणें फार वाईट व नुकसानकारक आहे, खोटें बोलणाऱ्या मुलाचा संबंध नको म्हणून मी सुंदरीला फार जपतों, असें सांगून व त्याच्याकडे चमत्कारिक नजरेनें पाहून अप्रत्यक्ष रीतीनें त्याची कानउघाडणी करतात. कवठांच्या चोरीच्या आळाच्या वेळीं व गार्फिल्डचें चरित्र वाचण्याकरितां भाऊ शाळा चुकवितो, तेव्हांही त्यांची प्रेमळ

---

१ पृ. ८५.

व सुज्ञपणाची शिकवण पहाण्यासारखी आहे. शिवरामपंत भाऊच्या घरांत रहावयास आल्यावर एकदोनदां भाऊ व सुंदरी यांची भावी नवराबायको म्हणून थट्टा झाली. परंतु अशी थट्टा नेहमीं होणें इष्ट नाहीं असें वाटून शिवरामपंत ती थांबण्याची तजवीज करतात.

गृहशिक्षणाची दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे वडील माणसांचें स्वतांचें वर्तन. त्यांची स्वतःची वागणूक जर आदर्शनीय नसेल तर केवळ शाब्दिक उपदेशानें किंवा धाकदपटशानें मुलांच्या मनावर कांहीं एक परिणाम होणार नाहीं. तीच त्यांची वर्तणूक योग्य असेल तर मुलांच्या मनांत त्यांच्याविषयीं आदर उत्पन्न होऊन तीं आज्ञाधारक व सच्छील निपजतील. याविषयीं भाऊ एकदां प्रसंगोपात्त म्हणतो, " मुलांकडून आज्ञाधारकत्व संपादावयाचें तें केवळ धाकदपटशानें कधींहि संपादलें जात नाहीं. संपादलें गेलेंच, तर तें तेवढ्या वेळेपुरतें संपादलें जातें. ती वेळ निघून गेली कीं झालें. "[1] शिवरामपंतांच्या वागणुकीचा भाऊवर किती उत्कृष्ट परिणाम झाला हें स्पष्ट दिसतेंच आहे. विद्यार्थिदशेंत शिवरामपंतांचा नियमितपणा वाचनव्यवसाय, लेखनक्रम वगैरे गोष्टी नेहमीं त्याच्या डोळ्यांसमोर असल्याकारणाने त्यालाहि त्याच संवयीं जडल्या. पुढें प्रौढ वयांत त्यांचा विचारानुसार आचार पाहून तर त्याच्या मनांत त्यांच्याविषयीं आदर उत्पन्न होऊन तो त्यांना गुरुस्थानीं मानूं लागला. शिवरामपंतांच्या पत्नीच्या उदाहरणावरूनही हरिभाऊंनीं गृहशिक्षणाचा कित्ता वाचकांपुढें ठेवला आहे. तिच्या स्वभावनिदर्शनांत या गोष्टीचा उल्लेख आलाच आहे.

बालशिक्षणाचें दुसरें अंग शालेय शिक्षण. हें हरिभाऊंच्या काळांत

---

१ पृ. १२७;

**शालेय-शिक्षण**

कशाप्रकारचें असे, त्याचें चित्र भाऊची शाळा व तेथील शिक्षकद्वय ह्यांच्या वर्णनांत चांगलें उतरलें आहे. ह्या काळांत बालशिक्षणाची फार अनास्था होत होती. त्या काळीं शिक्षणाचें शास्त्र आहे, ह्याची जाणीव खुद्द सरकारी विद्याधिकाऱ्यांना बेताचीच होती. मग खासगी शाळा व शाळामास्तर ह्यांची गोष्ट बोलावयासच नको. शिक्षणशास्त्राचा अभ्यास नाहीं, बालमन व बालस्वभाव ह्यांचें ज्ञान नाहीं, जबाबदारीची जाणीव नाहीं, अशा परिस्थितींत शाळा कोंडवाडे बनल्यास नवल काय ? भाऊच्या सरमास्तरासारख्या अरेरावी व निर्दय शिक्षकाशीं गांठ पडल्यास लहान मुलें किती आनंदानें शाळेंत जाणार ? भाऊचे हे सरमास्तर त्या काळचे अपवाद म्हणून मानण्याचें कारण नाहीं. त्याचप्रमाणें लहान अर्भकांना किंवा मोठ्या मुलांना द्यावयाच्या शिक्षाही सरमास्तरांच्या शिक्षांइतक्या निर्दयपणाच्या असत. असे मास्तर हल्लींच्या शाळांतून दोन दिवस टिकणार नाहींत. हरिभाऊंसारख्या विचारी गृहस्थास ही बालशिक्षणाची शोचनीय स्थिति पाहून काय वाटत असेल, हें त्यांनीं केलेल्या वर्णनावरून चांगलें लक्ष्यांत येण्यासारखें आहे. सुदैवानें हल्लीं बालशिक्षणपद्धतींत अनेक सुधारणा झाल्या आहेत. अगदीं भिकार शाळा घेतली तरीसुद्धां पूर्वींच्या शाळांपेक्षां ती कितीतरी चांगली ठरेल ?

**स्त्री-शिक्षण**

बालशिक्षणाप्रमाणें हरिभाऊंनीं प्रस्तुत कादंबरींत स्त्री-शिक्षणाचा विषय आणला आहे. स्त्री–शिक्षणाच्या अभावीं पुष्कळ वेळां स्त्रियांचें जीवित कसें कष्टमय होतें, बुद्धिमान् व कर्तृत्ववान् स्त्रियांचे गुण मोतीमोल ठरतात, त्याचप्रमाणें शिक्षण मिळून त्यांच्या बुद्धीचा व मनाचा योग्य विकास झाला असल्यास त्यांना आपलें जीवित स्वतःच्या व समाजाच्या दृष्टीनें सार्थकीं कसें लावतां येतें, किंवा विपन्नावस्थेंत आपल्या यातना त्यांतल्या त्यांत कशा कमी करतां येतात, हें ताईच्या आईच्या

व स्वतः ताईच्या चरित्रांत चांगलें दर्शविलें आहे. शिक्षणाच्या अभावीं स्त्रियांच्या स्वतःच्या नुकसानाशिवाय समाजाचेंही फार नुकसान होतें. अर्धा समाज अशिक्षित राहिल्याकारणानें समाजाच्या प्रगतीला अडथळा होतो. स्त्रियांना आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष्य देतां येत नाहीं, त्यांची रूढीवरील अंधश्रद्धा कमी होत नाहीं व त्यामुळें सामाजिक प्रगतीचें पाऊल पुढें पडत नाहीं. शिवरामपंत व त्यांचे तरुणपणांतील स्नेही ह्यांच्या मनांत हे विचार नेहमीं येत असत, परंतु अनेक अडचणींमुळें त्यांना आपल्या बायकांना शिक्षण देणें अशक्य झालें होतें. याविषयीं बोलत असतां शिवरामपंतांचा स्नेही त्यांना म्हणतो, " माझी बायको शिकलेली हुशार नसली, तरी तिला विद्येची गोडी काय हें कळत असलं, म्हणजे मोठं काम झालं असें मी समजतो. मला जर मुलगी झाली तर, तिला मात्र मी चांगली शिकवीन. तिचं लग्न लवकर करणार नाहीं, किंबहुना तिला जितके दिवस लग्नावांचून राहतां येईल, तितके दिवस राहण्याविषयीं तिच्या मनांत भरवीन. आणखी लग्न करून संसारांत पडण्यापेक्षां अविवाहित राहून घरोघर जाऊन बायकांना शिकविण्याच्या व परोपकार करण्याच्या कामांत आयुष्य घालवावें हा उपदेश तिच्या मनावर ठसवीन. "[१] पुढें हा गृहस्थ मरण पावल्यानंतर शिवरामपंत आपल्या मुलीला हेंच ध्येय पुढें ठेवून शिक्षण देतात व समाजकार्याला लावतात. याप्रमाणें स्त्रीशिक्षणाचें महत्त्व हरिभाऊंनीं चांगलें दाखविलें आहे. ताई व सुंदरी विशेष समाजकार्य करतांना ह्या कादंबरींत दिसत नाहींत, परंतु पुढें दुसऱ्या एका कादंबरींत त्यांचें हें कार्य चांगलें दृष्टीस पडतें.

सामाजिक अज्ञानाचा दुसरा कोन म्हणजे परंपरागत रूढींचा अभि-

१ पृ. २९१.

**रूढीचें अंधानुकरण.**

मान. रूढीच्या अंध अनुकरणाचे दोन प्रकार हरिभाऊंनीं या कादंबरींत दाखविले आहेत.

**१. स्त्रीशिक्षणाला विरोध**

पहिला स्त्रियांना शिक्षण न देण्याचा प्रचार व दुसरा बालविवाह. पहिला ताईच्या व सुंदरीच्या चरित्रांत निदर्शित केला आहे. ताईच्या शिकण्याला कितीतरी अडचणी येतात. लहानपणीं ताईनें आपण होऊन शिकण्याची व शाळेंत जाण्याची इच्छा दर्शविली असतां तिची आई तिच्या अंगावर खेकसून म्हणते, "कांहीं नको शिकाबिकायला. माझ्याजवळ नाहीं असलें चालायचें ! हीं असलीं नकोत चारगट लक्षणंन् भिकार चाळे." ताईला आपल्या पत्राचे कागद वाचतांना पाहून भाऊला आश्चर्य वाटतें. पुढें सुद्धां ताईला कोणाचें न ऐकतां वाचनाचा क्रम चालू ठेवावा लागतो. सुंदरीच्या शिक्षणाचीही गोष्ट अशीच. तिचीं मातापितरें शिक्षणाला अनुकूल, परंतु समाजाकडून तिला कसा त्रास होतो त्याचें वर्णन हरिभाऊंनीं चांगलें केलें आहे. शिवरामपंतांसारखे विचारी, दृढनिश्चयी वडील तिला लाभले होते, म्हणूनच तिचें शिक्षण पार पडलें.

**२. बालविवाह**

बालविवाहाच्या अनिष्ट अंधरूढीनें लहान मुलींवर कशा आपत्ती कोसळतात ह्याचें अत्यंत हृदयस्पर्शी असें चित्र ताईच्या चरित्रांत आलें आहे. मुलींचें लग्न एका विवक्षित वयोमर्यादेच्या आंत न केल्यानें तें धर्मानें अविहित:असें वर्तन होतें, अशी त्याकाळीं समजूत असल्यामुळें आईबाप डोळ्यांवर कातडें ओढून मुलींचें लग्न मिळेल त्या मनुष्याशीं करून टाकीत. याविषयीं स्वतः त्या मुलीला काय वाटतें तें ताईच्या शब्दांनीं चांगलें व्यक्त होतें. ताई सुंदरीजवळ आपलें मन उघडून बोलत असतांना तिचे शब्द ऐकले म्हणजे आपलें अंतःकरण पिळवटून जातें. "बाबारे ! आम्ही घरांत बांधलेलीं मुकीं जनावरें." या तिनें भाऊ-

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत

जवळ काढलेल्या एका हृदयद्रावक उद्गारांत तिच्या मनाचें किती यथार्थ चित्र उतरलें आहे ! अशा स्थितींत किंवा नवरा सद्गुणी मिळता तर कांहींतरी बरें होतें. पण व्यसनी मनुष्याशीं गांठ पडल्यामुळें तिला कशा यातना सोसाव्या लागतात, हें पाहिलें म्हणजे या बालविवाहाच्या रूढीचा कोणत्याही समंजस गृहस्थास तिटकारा व त्वेष आल्यावांचून रहाणार नाहीं. ‘ कराला देवीचा नवा अवतार या प्रकरणांत हरिभाऊंचा याविषयींचा तीव्र संताप चांगला निदर्शित ’ होतो. या अंधरूढीमुळें होत असलेली कसाबाची करणी म्हणजे ‘ मालती-माधवांतील ’ अघोरघंट-कपालकुंडलांच्या दिवसांतील नरमेधांची आठवण व्हावी यांत नवल नाहीं. याच अंधरूढीच्या विचारपरंपरेला अनुसरून ताईला नवऱ्याच्याच घरीं राहण्याबद्दल तिचे मामा, वडील व आजी आग्रह करतात. तिचा पति घरांत बाजारबाया आणून तिचा अपमान व हाल करतो. तिला त्या ठिकाणीं राहणें दुःसह होतें. पण त्यांना त्याचें कांहीं वाटत नाहीं. स्त्रियांची ही कष्टप्रद स्थिति हल्लींहि सर्वस्त्रीं सुधारली आहे असें नाहीं. तथापि वयोमर्यादेच्या बाबतींत तरी पुष्कळ सुधारणा झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**सामाजिक कार्य**

बालशिक्षण व स्त्रीशिक्षण यांशिवाय या कादंबरींत लोकहिताच्या व समाजसुधारणेच्या दृष्टीनें आणखी कांहीं प्रश्न आले आहेत. सामाजिक कार्याचें क्षेत्र, त्याचा आरंभ, त्याची वांटणी इत्यादि प्रश्न निरनिराळ्या ठिकाणीं ओघानुसार विचारांत घेतले आहेत. पूर्वीं सामाजिक सुधारणा अगोदर किंवा राजकीय सुधारणा अगोदर, हा वाद नेहमीं माजत असे. ह्या वादाला शिवरामपंतांच्या भाषणांत चांगलें उत्तर मिळालें आहे. ते भाऊला म्हणतात, “ भाऊ, तूं सर्व बाजूंनीं उद्योगाला लाग. आधीं राजकीय कीं, आधीं सामाजिक, हा प्रश्न ज्यांना कांहीं करायला नको त्यांचा. ज्यांना उद्योग करावयाचा, त्यांनीं जे हातून

होईल तें करण्याचा सपाटा चालवावा. ज्या कोणच्या बाबतींत कांहीं आपल्या हातून होईल त्या बाबतींत कायावाचामनानं शिकून तें काम करावं...........आधीं तें, आणखी मग हें, आधीं अमुक सुधारा, आणखी मग तमुक सुधारा असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं."[1] याच विषयासंबंधीं पुढें एकदां ते भाऊला म्हणतात, "आधीं राजकीय कीं सामाजिक हा प्रश्न काय? अरे दोन्ही एकदम. जें ज्याला पटेल तें त्यानें करावें; राजकीय बाबतींत लोकांच्या गरजा जबर आहेत, त्यांचा आधीं विचार केला पाहिजे; त्या राजकीय गरजा त्यांना चांगल्या भासतात; कारण त्यांचा पोटाशीं संबंध आहे; त्या त्या गरजांचा तुम्हीं विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणें दुसऱ्याही पुष्कळ गरजा आहेत. त्या लोकांना जरी प्रत्यक्ष भासत नाहींत, किंबहुना जरी त्या गरजा नाहींतच असें त्यांना वाटत आहे, तरी पण आपण त्यांच्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे."[2]

समाजसुधारणेसंबंधीं दुसरा एक विचार समंजस मनुष्याच्या मनांत येत असतो. त्याचा उल्लेख आला आहे. तो विचार हा कीं, "स्त्रिया सुशिक्षित नसल्याकारणानें त्यांना या सुधारणेला हातभार लावतां येत नाहीं. स्त्रिया सुशिक्षित झाल्यास त्या कार्यक्षम व कर्तृत्ववान् होऊन समाजसेवेच्या व्यापक क्षेत्रांत पुरुषांना मदत करूं शकतील व त्यायोगें पुरुषांना राजकीय गोष्टींकडे लक्ष्य देण्यास वेळ मिळेल." हे विचार भाऊंनीं आपल्या एका शिवरामपंतांनीं दिलेल्या उत्तरांत प्रदर्शित केले आहेत.[3]

गृहसुधारणा

"भाऊ, सगळ्या समाजसुधारणेचा पाया गृहसुधारणा होय. मला जर कोणीं असें विचारलें कीं, अमुक देश सुधारलेला म्हणाल कीं गैरसुधारलेला म्हणाल? तर मी त्याला म्हणेन, मला त्या देशांतल्या गृह-

१ पृ. २९२; २ पृ. २३७; ३ पृ. २९३.

व्यवस्थेची माहिती द्या आणि आईचें मुलांवर किती वजन आहे तें सांगा, म्हणजे मी तुमच्या प्रश्नाचें उत्तर देईन. ज्या कल्पना, जे विचार, ज्या कोणच्याही गोष्टी राष्ट्रांतील श्रेष्ठ वर्गांत चांगल्या तऱ्हेनें पसराव्या असें वाटत असेल, त्या कल्पना, त्या गोष्टी राष्ट्रांतील स्त्रियांच्या डोक्यांत शिरल्या पाहिजेत. त्यांच्या दुधांतून त्या मुलांच्या मनांत उतरतात, ही गोष्ट कधींहि विसरूं नये. बापाचा आणि मुलांचा संबंध फार थोडा. आई ती आई. ज्याप्रमाणें जन्माची, त्याचप्रमाणें सद्विचारांची व सत्कर्मांची दात्री ती."[1] या शिवरामपंतांच्या भाषणांत हरिभाऊंनीं सामाजिक प्रगतीचें एक फार महत्त्वाचें तत्त्व निदर्शित केलें असून त्याबरोबर स्त्रीशिक्षणाची महती वर्णिली आहे.

ही समाजसुधारणा कोणत्या बिकट परिस्थितींत करून घ्यावयाची आहे हें शिवरामपंतांच्या व भावानंदांच्या शब्दांनीं हरिभाऊंनीं चांगलें व्यक्त केलें आहे. या बिकट परिस्थितींत काम करणाऱ्या समाजसेवकांस निरनिराळ्या प्रकारचा स्वार्थत्याग केला पाहिजे. ह्या विचाराचा नमुना म्हणून एका वर्तमानपत्र काढण्याची इच्छा असलेल्या गृहस्थास उद्देशून केलेलें भाऊचें भाषण वाचण्यासारखें आहे. आपलें पत्र नुकसानींत येऊं नये, अशी त्या गृहस्थानें इच्छा दर्शविल्यावरून भाऊ त्यांस म्हणतो, " त्याचा काय नेम आहे ? आज जे विचार लोकांना अगदीं नवें, लोकांना ज्यांचा तिटकारा, असले नवे विचार धिटाईनें लोकांच्या पुढें मांडायचे हा आमचा मुख्य हेतु. राजकीय बाबतींत काय, सामाजिक बाबतींत काय, नेभळेपणा जो आज दिसतो आहे तो अगदीं बरा नाहीं. लोकांना आणखी सरकारलाही केवळ स्तुति करून घेण्याचीच चटक लागली आहे. जुन्या चाली मग त्या बऱ्या असोत, वाईट असोत, त्यांची स्तुति केली कीं, लोक खुष होतात. सरकारी अधि-

१ पृ. २९५.

कार्‍यांचीं कृत्यें बरीं असोत, वाईट असोत, तीं वाखाणलीं, इंग्रजी राज्याचे दोष न दाखवितां नुसते पोवाडे गायिले कीं, सरकार खुष ! इ०इ."[1] हे विचार वाचले म्हणजे प्रख्यात समाजसुधारक कै. आगरकर ह्यांनीं आपलें 'सुधारक' पत्र चालवितांना आपल्यापुढें ठेवलेलें ध्येय व त्या पत्राकारितां स्वतःच्या पदराला लावून घेतलेला खार, हा इतिहास मनांत येतो.

हरिभाऊंनीं आपले सामाजिक व राजकीय सुधारणेचे विचार या कादंबरींत मांडले आहेत. त्यावरून त्यांच्या मनाचा समतोलपणा, तळमळ व दूरदर्शित्व हे गुण स्पष्ट दिसतात. सुंदरीला शिवरामपंतांनीं शाळेंत घातली त्यावेळीं त्यांचा उपदेश व भाऊच्या मामांनीं आपल्या पत्रांत दर्शविलेले विचार हे हरिभाऊंच्या समतोल मनाचे निदर्शक आहेत. राजकीय सुधारणा व सामाजिक सुधारणा हीं समाजसुधारणेचीं दोन्ही चाकें एकाच वेळीं फिरली पाहिजेत. अगोदर एक व मागाहून दुसरें, असें उपयोगी नाहीं. कोणतें अगोदर व कोणतें मागाहून हा वाद शुष्क आहे. हें तत्त्व हरिभाऊंनीं 'मी' कादंबरींत प्रतिपादिलें आहे. तथापि एकाच कादंबरींत दोन्ही सुधारणांचा उहापोह होणें शक्य नसल्याकारणानें राजकीय सुधारणेचा केवळ उल्लेख करून सामाजिक सुधारणेचा प्रश्न बराच सविस्तरपणें विवेचिला आहे.

**सद्विचार**

आतांपर्यंत सांगितलेल्या प्रस्तुत कादंबरींतील निरनिराळ्या प्रकारच्या शिकवणींनीं व मतनिदर्शनानें वाचक उदात्त व सुसंस्कृत वातावरणांत फिरत रहातो. तिच्यांत मधून मधून सद्विचार प्रदर्शित केल्यामुळें हेंच वातावरण अधिक सुसंस्कृत, उदात्त व शिक्षणप्रद होतें. असे सद्विचार तरुणांनीं मनन करण्यासारखे असल्यामुळें त्यापैकीं कांहीं मुद्दाम नमुन्यादाखल पुढें दिले आहेतः—

**आपल्याला जें कांहीं काम करायचं आहे तें आपल्या जातींत,**

1 पृ. २४४.

आपल्या धर्मांत राहून केलं पाहिजे. विद्येचा आणि धर्माचा अर्थो-अर्थी संबंध नाहीं. ( पृ. १७९. )

चांगल्या गोष्टी आपल्या कर्तव्याआड येऊं लागल्यां म्हणजे नुकसान हें व्हावयाचें. ( पृ. १८५. )

परोपकार करावयाचा त्याला द्रव्याची अपेक्षा नाहीं. ( पृ. २१५. )

विचार करायला वेळ नाहीं असं कधींच होत नाहीं; वेळ नाहीं म्हणून विचार न करतांच एखादी गोष्ट करणें बरं नाहीं. ( पृ. २४१ )

कोणची गोष्ट सुधारावयाची म्हटली म्हणजे ती अगदीं अंतर्भागापासून सुधारली पाहिजे. ( पृ. १८८. )

माणसांना आपले हक्क, आपलें कर्तव्य, आपली ताकद समजून आली पाहिजे. राजा व सरकार हे लोकांच्या सुखाकरितां, लोक त्यांच्या सुखाकरितां नव्हेत; रीतीभाती, आचारविचार हे लोकांच्या सुखाकरितां, लोक त्या रीतीभाती व ते आचारविचार यांकरितां नव्हेत; धर्म हाही लोकांकरितां, लोक धर्माकरितां नव्हेत; कोणचेंहि सरकार, कोणचाहि राजा, कोणच्याही रीतीभाती, आचारविचार किंबहुना धर्मसुद्धां लोकांच्या सुखाआड येऊं लागला कीं, त्यांत फरक झालाच पाहिजे. ( पृ. ३५३. )

मृत्यु येऊन व्यक्तीचें शरीर पतन पावतें. त्याचा आत्मा व त्या आत्म्याचे विचार बरबरच जातील. ( पृ. ३८१. )

एक माणूस गेला म्हणून काय झालं ? एक शिपाई पडला, तर दुसऱ्यानं लगट केली पाहिजे. ( पृ. ४१५. )

# भाग आठवा.

# कांहीं इतर प्रश्न.

'मी' कादंबरीचा कांहीं भाग 'वास्तविक स्वरूपा'चा ( Realistic ) व कांहीं 'ध्येयपर' ( Idealistic ) आहे. भाऊ व ताई यांच्या बालपणापासून तों तीं पुढें देशकार्य अंगीकृत करीपर्यंतचा भाग मुख्यत्वेंकरून वास्तविक स्वरूपाचा आहे. भाऊचें शिक्षण, ताईचा विवाह व कष्टमय वैवाहिक जीवित, ह्या बहिणभावंडांच्या आईबापांचें चरित्र, भाऊचा शिवरामपंतांच्या कुटुंबाशीं झालेला परिचय, शिवरामपंतांनीं त्याला वेळोवेळीं केलेले उपदेश, सुंदरीचें व ताईचें शाळेंतील शिक्षण इत्यादि सर्व भाग 'वास्तविक' आहेत. भाऊ व ताई पुढें देशकार्य अंगावर घेऊन तें पार पाडण्याचा प्रयत्न करतात, तो सर्व भाग ध्येयपर आहे. कादंबरींतील सर्व पात्रांत मुख्यत्वेंकरून शिवरामपंत हे ध्येयवादी गृहस्थ आहेत. त्यांनीं निरनिराळ्या प्रसंगीं स्त्रीशिक्षण, सामाजिक सुधारणा, राजकीय सुधारणा वगैरे विषयांवर प्रदर्शित केलेले विचार; स्त्रीशिक्षण समाजोपयोगी होण्याच्या दृष्टीनें सुंदरीच्या शिक्षणाचा आंखलेला मार्ग; भाऊ, ताई व सुंदरी ह्यांना दाखवून दिलेली समाजकार्याची दिशा, व त्यांनीं आयुष्यभर विचार करून योजलेल्या कार्याच्या स्वरूपाचें त्यांना एखाद्या 'पंथा' इतकें वाटणारें महत्त्व; ह्या गोष्टींचा विचार केला म्हणजे त्यांचा ध्येयवाद किती उत्कट स्वरूपाचा होता हें दिसतें. या थोर, ध्येयनिष्ठ पुरुषाच्या शिक्षेंत वाढलेलीं भाऊ व ताई तितकींच ध्येयनिष्ठ बनून समाजकार्याला लागतात यांत नवल तें काय ?

शिवरामपंतांच्या ध्येयांत एक विशेष असा आहे कीं, तें व्यवहार्य आहे, अव्यवहार्य नाहीं. त्यांच्या ध्येयमार्गांत आतांच्यापेक्षां अधिक अडचणी होत्या हें खरें. तथापि चिकाटीनें व कळकळीनें काम करणाऱ्या समाजसेवकास तो मार्ग आक्रमिणें कठिण नव्हतें. ताईला व सुंदरीला सेवासदनासारख्या संस्थेचें बीजारोपण करून शिवरामपंतांचें स्त्रीशिक्षणाचें ध्येय व्यवहारांत आणतां येतें. त्याचप्रमाणें भाऊलाहीं व्याख्यानें व वर्तमानपत्र यांच्या द्वारानें समाजांत ज्ञानप्रसार व स्वार्थत्याग करून समाजकार्य करण्याविषयीं रामानंदासारख्या तरुणांचीं मनें वळवून आपल्या पंथाची व त्याच्या मठाची स्थापना करतां येते, व ' Servants of India Society ' सारख्या संस्थेचा पाया घालतां येतो, ह्याचेंही कारण हेंच. ताई, भाऊ आणि त्यांचे फलद्रूप प्रयत्न कादंबरीच्या काल्पनिक सृष्टींतील आहेत; असें कोणीं म्हटलें, तरी त्याच ध्येयाचीं प्रत्यक्ष फळें म्हणून ' सेवासदना ' सारख्या स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं झटणाऱ्या व पुण्याच्या ' Servants of India Society ' सारख्या स्वार्थत्यागाच्या पायावर उभारलेल्या यशस्वी संस्था आज आपण प्रत्यक्ष पहात आहों व त्यांचीं मधुर फळें चाखीत आहों.

शिवरामपंत, भाऊ व ताई ह्यांचीं ध्येयें अशा रीतीनें व्यवहार्य असल्यामुळें हरिभाऊंना कादंबरीच्या ' वास्तविक ' व ' ध्येयपर ' अशा दोन भागांचा बेमालुम मिलाफ करतां आला. किंबहुना असेंही म्हणण्यास हरकत नाहीं कीं, कादंबरीचा हा ध्येयपर भाग ' वास्तविक ' भागांतून उत्क्रांतच झाला आहे. भाऊ व ताई ह्या बहीणभावंडांची व शिवरामपंतांची गांठ पडून त्यांच्या शिक्षेंत तीं वाढल्यामुळें त्यांच्या भोंवतीं लहानपणापासूनच जी परिस्थिति निर्माण झाली व जी परिणामकारक होण्यास त्यांची घरची परिस्थिति व ताईचें अनिष्ट व यातनामय वैवाहिक जीवित ह्यांनीं मदत केली, त्या परिस्थितीचा

परिणाम म्हणजेच त्यांच्या ध्येयवादित्वाचा आरंभ, विकास व फलप्राप्ति असें म्हणण्यास हरकत नाहीं.

श्री. वाग्भट नारायण देशपांडे आपल्या "हरि नारायण आपटे यांच्या आठवणी व कादंबऱ्या" ह्या सुंदर पुस्तकांत, "हरिभाऊंच्या सर्व सामाजिक कादंबऱ्या काल्पनिक प्रसंगावर उभारलेल्या नसून खुऱ्याखुऱ्या घडलेल्या गोष्टींवरूनच त्या सुचल्या आहेत," असें विधान करतांना त्याच्या समर्थनार्थ स्वतः हरिभाऊंचेंच याविषयींचें म्हणणें त्यांनीं दिलें आहे. हरिभाऊंनीं त्यांना एकदां स्पष्ट बोलून दाखविलें कीं, "माझ्या कादंबऱ्यांत एकही पात्र असें नाहीं कीं, जें व्यवहारांत मी प्रत्यक्ष पाहिलें नाहीं."[1] पुढें "मी" कादंबरीविषयीं प्रश्न विचारतां त्यांनीं त्यांना असें उत्तर दिलें कीं, "'मी'मध्यें काल्पनिक भाग असा फारच थोडा, शेवटचा मठस्थापनेचा आहे. बाकीच्या बहुतेक कथानकाला वस्तुस्थितीचा आधार आहे. 'मी' मधील नायक भाऊ, शिवरामपंत, ताई, सुंदरी, भाऊचे ज्योतिषी वडील रावजी, हीं सर्व पात्रें खरीं आहेत. भावानंदाच्या मतांची व देशसेवेच्या कल्पनेची जी पुढें उत्क्रांति झालेली दाखविली आहे, ती मात्र आपले एक मृत स्नेही विष्णु बळवंत पंडित ह्यांच्याशीं झालेल्या अनेक वादविवादांचें फळ आहे."[2] भाऊच्या शाळेचें व मास्तरांचें वर्णन आपण स्वतः लहानपणीं मुंबईस जात असलेल्या शाळेचें वर्णन असल्याबद्दल हरिभाऊंनीं सांगितलें, असें श्री. देशपांडे म्हणतात, व मास्तरांचें वर्णन त्यांना संस्कृत शिकविण्यासाठीं ठेवलेल्या शास्त्रीबुवांचें आहे असें सांगतात. भावानंदाचें बालचरित्र कांहींसें हरिभाऊंच्या चरित्रांशीं व प्रौढ चरित्र त्यांच्या विचारसरणीशीं जुळतें आहे. भाऊचे वडील रावजी यांचें चित्र हरिभाऊंच्या आत्या-

१ पृ. १६; २ पृ. १९.

बाई बयाताई यांच्या पतीच्या चरित्रावरून घेतलें आहे, असें कु० वेणूताई पानसे आपल्या हरिभाऊंच्या चरित्रांत सांगतात.[1] त्यांना ज्योतिषाचा नाद लागून त्यांनीं आपली नोकरी सोडली होती. घरांतील भांडींकुंडी दागदागिने विकण्याचा त्यांनीं सपाटा चालविला व त्यांच्या पत्नीस आपले बंधु नानासाहेब यांच्या घरीं मुलांबाळांना ठेवावें लागलें. भावानंदाच्या शाळेसंबंधीं लिहितांना कु. वेणुबाई लिहितात, "शनीच्या पाराजवळ असलेल्या ठोसरांच्या वाड्यांतील तात्या० पंतोजीची गंमत पहाण्यास ते मित्रमंडळीसह मुद्दाम जात असत. या तात्यापंतोजींचें सुंदर विनोदी चित्र त्यांनीं पुढें 'मी' कादंबरींत रेखाटलें आहे."[2] अशा रीतीनें सत्यसृष्टींत पाहिलेल्या व अनुभविलेल्या व्यक्ति, स्थळें व प्रसंग कादंबरींत कल्पिल्याकारणानें, तिच्या वास्तवस्वरूपांत पूर्ण सत्याभास उतरला आहे.

'मी' कांदबरींतील गुणांचे विवेचन केलें. तिच्यांतील दोषांचा विचार करतां ते इतके लहानसहान व थोडे आहेत कीं, कादंबरी वाचण्याच्या भरांत वाचकाला त्यांची जाणीवही होत नाहीं. 'एकोहि दोषो गुणसंनिपाते । निमज्जतींदोः किरणेष्विवांकः' या संस्कृत सुभाषिताप्रमाणें हे दोष कादंबरीच्या गुणसमूहांत लुप्त होतात. हे बारीक सारीक दोष उत्पन्न होण्याचीं कारणें हरिभाऊंचा स्वभाव, मनोरचना व विविधव्यवसाय हीं असावींत. या गोष्टींचा या ठिकाणीं सविस्तर विचार करण्याचें कारण नाहीं. परंतु त्यांचें चरित्र वाचल्यास या तीन कारणांमुळें कादंबऱ्यांच्या ठाकठिकीकडे व कलासौंदर्याकडे पुरेसें लक्ष कां गेलें नाहीं त्याचा उलगडा होतो. त्यांना एकच ग्रंथ लिहिण्यास घेऊन पुरा करावा अशी संवय नव्हती. शिवाय 'करमणूक' पत्राकरितां या कादंबऱ्या लिहिल्यामुळें, त्या हप्त्याहप्त्यांनीं दर आठ

१ पृ. २३. २ पृ. ३१.

वळ्यास आयत्या वेळीं लिहून झालेल्या आहेत. अर्थातच पाठीमागचा पुढचा संबंध, विचारांची पुनरुक्ति व रेखीवपणा या बाबींकडे लक्ष देण्यास अवसर नसे. दुसरें असें कीं, त्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांचें स्वरूप अंशतः ध्येयपर आहे व हें ध्येय-लोकहिताचें ध्येय-त्यांच्या मनांत सतत वावरत असल्याकारणानें, त्यांचें लक्ष कलासौंदर्यापेक्षां ध्येयनिदर्शनाकडे अधिक असतें. याचें आणखी एक कारण असें कीं, हरिभाऊंचे व्यवसाय अनेक असत. विविधप्रकारच्या लेखनव्यवसाया-शिवाय, सामाजिक कार्यांतील पुढारीपणा, नियतकालिकांचें संपादकत्व; म्युनिसिपल अध्यक्षांचें काम इत्यादि अनेक कामें त्यांना करावीं लागलीं. किंबहुना त्यांचीं हींच कामें अधिक महत्त्वाचीं असत. लेखनव्यवसायाचें काम दुय्यम प्रकारचें असें. अशा निरनिराळ्या कारणांमुळें 'मी' कादं-बरींत विचारांची पुनरुक्ति, पाल्हाळाचीं वर्णनें वगैरे कांहीं दोष निर्माण झाले आहेत. भाऊच्या लहानपणची लखोट्याची हकीगत, सर-मास्तरांचें वर्णन, सुंदरीला लिहिलेल्या पत्राचे हरवलेले कागद व त्यामुळें भाऊवर आलेला चोरीचा आळ वगैरे कांहीं प्रकरणें कांहींशीं पाल्हाळित झालीं आहेत. तथापि कादंबरी चरित्रस्वरूपाची असल्या-कारणानें या भागांत स्वाभाविकपणा आला आहे. शिवाय ते मनोरंजक वठले आहेत, यामुळें त्यांच्यांतील पाल्हाळ सहज भासमान होत नाहीं. शिवरामपंतांचें पात्र कलेच्या दृष्टीनें सदोष आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे. कु. वेणुबाई पानसे शिवरामपंतांविषयीं लिहितांना म्हणतात, "या पात्रांत एकही दोष दाखविला नसल्यानें तें अतिमानुष वाटून तितकेंसें आकर्षक होत नाहीं."[1] परंतु आम्हांस तसें वाटत नाहीं; शिवरामपंत ध्येयनिष्ठ आहेत. त्यांचा नित्य जीवनक्रम व त्यांचे विचार ध्येयनिष्ठ पुरुषाला शोभतील असे आहेत. त्यांच्या बोलण्याचाल-

१ चरित्र पृ. १९९.

ण्यांतील गंभीरपणाहि तसाच आहे. परंतु तर्कशुद्ध उच्च विचार व देशोन्नतीची कळकळ यांच्यामुळें त्यांचें अंतःकरण भावनाशून्य झालेलें नाहीं. भाऊला व ताईला ते हाताशीं धरतात, तें केवळ ध्येयप्राप्ती-करितां नाहीं. या असहाय व दीन बहीणभावंडांच्याविषयीं त्यांच्या अंतःकरणांत सहानुभूति व प्रेम आहे. एकंदर वागण्यांत जरी त्यांची वृत्ति नेहमीं गंभीर असते, तरी आपल्या पत्नीविषयीं व सुंदरी-विषयीं स्नेहयुक्त शब्द त्यांच्यामुखावाटे बाहेर पडतात. सुंदरीला भाऊच्या हातीं निरवितांना, त्यांच्या मनाची झालेली स्थिति पाहिली म्हणजे वाचकाचेंही अंतःकरण भरून येतें. या गोष्टी ते 'अतिमानुष' होते असें दाखवीत नाहींत. उलट त्या इतर चार माणसांप्रमाणें त्यांनाही स्नेह, वात्सल्यादि भावना आहेत, हेंच सिद्ध करतात.

# भाग नववा.

# हरिभाऊंची योग्यता.

विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर व टिळक या थोर पुरुषांचे अलौकिक गुण, उदात्त विचार, ओजस्वी लिखाण यांनीं महाराष्ट्रांत उत्पन्न झालेल्या वातावरणाचा तत्कालीन तरुण विद्यार्थिवर्ग व सुशिक्षित जनता यांच्यावर परिणाम झाला होता. हरिभाऊ आपटे यांच्यावरही असाच परिणाम झाल्यामुळें त्यांच्याहि लिखाणांत व जीवनक्रमांत सुसंस्कृत उदात्त विचारसरणी, समाजसुधारणेविषयींची तळमळ, लोककार्याची हौस हे गुण कसे वास करीत होते, हें त्यांचें चरित्र वाचल्यास चांगलें समजून येतें. हरिभाऊंचा लेखनव्यवसाय विविधप्रकारचा होता, तथापि कादंबरीकार म्हणून त्यांनीं चांगलें नांव मिळविलें. आतांपर्यंत त्यांच्या इतका थोर कादंबरीकार महाराष्ट्रांत झाला नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कादंबरीचा मोठेपणा तिच्या बाह्यस्वरूपापेक्षां अंतःस्वरूपावर अधिक अवलंबून असतो. अंतःकरणांतील भावना व मनांतील विचार यांचें मनोहर शब्दचित्र काढून त्याच्या द्वारानें मानवी जीविताच्या अर्थाची फोड ज्या कादंबरींत झाली असेल, ती कादंबरी श्रेष्ठ होय. अशा कादंबरीचें वाचन मनोरंजक, हितकर व मनाला पुष्टि देणारें असतें. या दृष्टीनें विचार केल्यास ' मी ' कादंबरीचा श्रेष्ठ दर्जा सहज लक्ष्यांत येण्यासारखा आहे. अशी सरस ओजस्वी कादंबरी लिहिण्यास तिच्याच तोलाचा लेखक मिळावा लागतो.

'मी' कादंबरीच्या आतांपर्यंत केलेल्या निरीक्षणावरून हरिभाऊंच्या अंगचे वाङ्मयलेखकाचे गुण चांगले व्यक्त होतात. ह्यांपैकीं कांहीं विशिष्ट गुणांमुळें त्यांची योग्यता फार मोठी ठरते. त्यांचा पहिला गुण सदभिरुचि. हरिभाऊ हे अभिजात लेखक असल्यामुळें ते आपल्या कादंबरींत सदभिरुचीचें अतिक्रमण होऊं देत नाहींत. अश्लील भाषा किंवा विचार दूरच राहोत, पण त्यांत ग्राम्यपणासुद्धां फारसा दिसत नाहीं. ह्या कारणानें त्यांच्या कादंबऱ्या लहानापासून थोरापर्यंत कोणीही वाचाव्यात. हल्लींच्या कित्येक लेखकांनीं हा धडा घेण्यासारखा आहे. सदभिरुचीला धरून अभिजात वाङ्मय निर्माण झाल्याशिवाय मराठी साहित्याची खरी प्रगति होणार नाहीं. साहित्याची प्रगति काव्य, कादंबरी, लघुकथा इत्यादिकांच्या ग्रंथसंख्येवरून अजमावयाची नसते, तर ती त्यांचा अभिजातपणा, त्यांतील सद्विचार ह्यांवरून ठरत असते. 'मी' कादंबरींत श्रृंगाररसाला स्थान नाहीं, खलपुरुषाचीही योजना केलेली नाहीं. असें असून सुद्धां हरिभाऊंनीं आपल्या उच्च प्रतिमेच्या सहाय्यानें ह्या कादंबरीला मनोरंजक स्वरूप दिलें आहे.

हरिभाऊंचा मोठेपणा विशेषेंकरून कादंबऱ्यांच्या द्वारें समाजाला योग्य वळण लावण्यांत आहे. त्यांनीं आपल्या सामाजिक कादंबऱ्यांत समाजांतील दोष दाखवून सुशिक्षित वाचकवर्गात जागृति उत्पन्न केली. आगरकरांनींही हेंच काम केलें. दोघेहि समाजसुधारक, पण दोघांचे मार्ग भिन्न. एकानें जें काम कठोर, हृदयभेदक शब्दांनीं केलें, तेंच दुसऱ्यानें मधुर शब्दांनीं मनोरंजन करून केलें. साजाजिक सुधारणेच्या बाबतींत दिसून येणारी जागृति व प्रगति यांना दोघांचेंही सारखेंच साह्य झालें आहे. तसे प्रसंग आले म्हणजे हरिभाऊंची लेखणी आगरकरांच्या इतकीच ओजस्वी व प्रोत्साहक असे. 'मी' कादंबरींतील भावानंद व शिवरामपंत ह्यांच्या भाषणांवरून ह्याचा प्रत्यय येईल.

आगरकर व हरिभाऊ यांनीं सामाजिक दृष्टीनें मध्यम वर्गाचा–ब्राह्मण-वर्गाचा–विचार केला. त्यांचे विचार त्याकाळीं खालच्या वर्गातील अशिक्षित वाचकांस कळण्यासारखे नव्हते. त्यांनीं ब्राह्मणवर्गास योग्य वळण लावण्याचा प्रयत्न केला व त्यांत त्यांना पुष्कळ यश आलें हें आजची स्थिति पाहतां सिद्ध होतें. गृहशिक्षण, शिक्षणप्रसार, स्त्री-पुरुषांत सामाजिक व राजकीय सुधारणांच्या कार्याची वांटणी, आत्म-त्यागाची आवश्यकता वगैरे विषय त्यांनीं मोठ्या कुशलतेनें कादंबरीच्या कथानकाशीं इतके एकजीव करून सांगितले आहेत कीं, ते वाचकांच्या मनावर परिणाम केल्याखेरीज रहात नाहींत. ह्या विषयांच्या विवेचना-वरून हरिभाऊंनीं ह्या विषयांचा किती खोल विचार केला होता हें चांगलें दिसून येतें. ह्या एकट्याच कादंबरीचा विचार केला तरीसुद्धां तिच्यांत व्यक्त होणाऱ्या अनेक गुणांमुळें हरिभाऊ श्रेष्ठ दर्जाचे कादंबरीकार ठरतात. कादंबरीच्या उत्तरभागांतील शिवरामपंतांचें व भावानंदाचे ओजस्वी विचार म्हणजे हरिभाऊंच्या मनाचें प्रति-बिंबच. त्यांतील कांहीं वाक्यें निदर्शित करून आपण जेव्हां या गुरु-शिष्यांचे गुण गातों, तेव्हां एका दृष्टीनें आपण हरिभाऊंचेच गुण गातों. त्याचप्रमाणें भावानंदाचे शेवटचे वाताच्या लहरींतील विचार, आयरिश देशभक्ताचें भाषण आवेशानें पाठ म्हणणें, जीवनस्तोत्राचें कडवें स्वतः म्हणत असतां रामानंदास म्हणावयास सांगणें, 'एक माणूस गेला म्हणून काय झालं ? एक शिपाई पडला, तर दुसऱ्यानं लगट केली पाहिजे,' हा अंतसमयीं रामानंदाला सांगितलेला संदेश इत्यादि प्रसंगांत आपल्याला हरिभाऊंचे अनेक गुण दिसत नाहींत असें कोण म्हणेल ? भावानंदाचें तें आत्मचरित्र जरी हरिभाऊंच्या जीवनक्रमांत प्रत्यक्ष घडून आलेल्या कृतींशीं जुळतें नसलें, तरी तें त्यांच्या अंतःसृष्टीचें प्रतिबिंब आहे ह्यांत शंका नाहीं. इतकें पूर्ण साम्य

नसतें, तर त्यांना भावानंदाच्या भूमिकेशीं समरस होऊन ती इतकी सरस रंगवितांच आली नसती.

हरिभाऊ गाजावाजा न करतां कोणतेंही काम करीत असल्या-कारणानें, त्यांची विद्वत्ता, देशहिताची कळकळ, समाजसुधारणेचा ध्यास, वगैरे गुण त्यांच्या हयातींत लोकांच्या निदर्शनास तितकेसे आले नाहींत. परंतु त्यांच्या पाठीमागें ते हळूं हळूं स्पष्ट दिसूं लागून जनतेला त्यांची योग्यता समजून आली. त्यांच्यासारखे विद्वान् सद्-भिरुचीचे अभिजात लेखक हेच तरुणपिढीचे खरे मार्गदर्शक, हेच खरे शिक्षक. "यांच्यासारखे (शिवरामपंतांसारखे) मुकाट्यानें उन्नति करणारे लोक जगावर किती थोडे असतील ? यांच्यासारख्यांच्या हातून काय काय गोष्टी होतात, आणखी किती किती फायदा होतो याची कांहीं कल्पना तरी जगाला आहे काय ? कुठली येणार ? हे खरे शिक्षक. हेच खरे कर्ते. यांच्या एका वाक्यानें जें कार्य होतें, तें इतर बड-बड्यांच्या लाखों वाक्यांनीं होणार नाहीं," हे भावानंदानें आपल्या गुरुविषयीं काढलेले उद्गार हरिभाऊंच्या विषयींहि काढल्यास अवा-स्तव ठरणार नाहींत.

REFBK-0005233

५२३३

समाप्त.

# प्रो. गोपाळ विष्णु तुळपुळे, एम्.ए.

## यांनीं लिहिलेलीं पुस्तकें.

| | | कि. |
|---|---|---|
| १ | ग्रीक पौराणिक कथा (पृष्ठसंख्या २७९) | १॥ रु. |
| २ | सामराज 'रुक्मिणीहरण' (संपूर्ण आवृत्ति) | १। रु. |
| ३ | सामराज 'रुक्मिणीहरण' (शालोपयोगी आवृत्ति) | -॥- |

'मति-विकास' मासिकाचे पहिल्या तीन

**वर्षांचे सुटे अंक.**

प्रत्येक वर्षाच्या १२ अंकांस आठ आणे.

तिन्ही वर्षांच्या सर्व अंकांस १ रु.

सर्व पुस्तकांस ट. ख. निराळा पडेल.

व्यवस्थापक, 'मतिविकास-माला'

५८० अ, सदाशिव, पुणें २

आयुर्वेद-महाविद्यालय, पुणें, यांचे नेतृत्वाखालील

# आयुर्वेद-रसशाळा

डेक्कनजिमखाना, पुणें नं. ४

आमचा च्यवनप्राश हा अत्यंत शास्त्रोक्त रीत्या बनविला असल्यानें विश्वासार्ह पौष्टिक आहे.

**सर्व आयुर्वेदीय औषधें बनविणार.**

आमचे वज्रदंतीनें दांत स्वच्छ व कठिण होतात. पायोरिया-नाशक द्रव्यें यांत मुख्य आहेत.

आमचें सुखसारकचूर्ण, ब्राह्मी तेल, सूतशेखर इत्यादि प्रख्यात औषधें मागवा.

आमचें मुख्य दुकानः—लक्ष्मीरोड, गणपति-चौक, पुणें २

**अधिकारी वैद्य, आयुर्वेद रसशाळा, पुणें ४**

## आमचा पत्ता आपले लक्ष्यांत असूं द्या!

आम्ही सर्व प्रकारचीं जुनीं पुस्तकें ( शालोपयोगी, कॉलेजास लागणारीं, मनोरंजक, धार्मिक, कादंबऱ्या इत्यादि ) योग्य किंमतीस विकत घेतों व नवीं पुस्तकें योग्य कमिशननें विकतों.

दी न्यू पूना बुकडेपो,
आप्पाबळवंत-चौक, पुणें नं. २

---

श्री.

हरतऱ्हेचें कापड स्वस्त मिळण्याचें

एकच ठिकाण

# गोरे आणि मंडळी

## कापडाचे व्यापारी

८६६ सदाशिव पेठ, रे मार्केट-रोड,
पुणें शहर.

महाराष्ट्राच्या औद्योगिक उन्नतीकरितां

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि.

११ बुधवार, पुणें शहर.

या खास महाराष्ट्राच्या कंपनींत

**आपला विमा काढा**

व

३० एप्रिल १९३५ वर्षाअखेर व त्यापुढील

व्हॅल्युएशनमध्यें उत्तरोत्तर वाढणाऱ्या

नफ्यांत भागीदार व्हा.

विम्याबाबत अगर एजन्सीच्या शर्तींबाबत समक्ष भेटा

अगर लिहा.

अभ्यंकर देशपांडे आणि कं.

मॅनेजिंग एजन्ट्स्

# लाँग-लाइफ इन्शुरन्स कं. लि.

या पूर्ण स्वदेशी कंपनींत आपला विमा
उतरून हरएक प्रकारच्या सवलतींचा
फायदा घ्या.

**स्त्री, पुरुष, गरीब व श्रीमंत,**
या सर्वांच्या सोईच्या विशिष्ट प्रकारच्या
विम्याच्या योजनांच्या
सविस्तर माहितीसाठीं खालील पत्त्यावर लिहा.

मॅनेजिंग एजंट्स्,
लाँग-लाइफ इन्शुरन्स कं. लि.
पोस्ट बॉक्स नं. २८, पुणें २


---


प्रकाशक–प्रो. गो. वि. तुळपुळे, एम्. ए.
५८० अ, सदाशिव पेठ, पुणें.

मुद्रक–गोपाळ बळवंत जोशी,
आनंद मुद्रणालय
१९६/४६ सदाशिव पेठ, पुणें.